# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# मराठ्यांचा वारसा

**(Legacy of the Marathas)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-106 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
**द्वितीय आवृत्ती :** २०१९
तृतीय आवृत्ती : २०२१
सुधारित आवृत्ती : २०२२
एम. ए. भाग – १ करिता (मराठ्यांचा वारसा)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-938801-5-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**■ इतिहास अभ्यासमंडळ समन्वयक ■**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२२-२३ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**मराठ्यांचा वारसा**' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०२२-२३ या वर्षात तयार केले. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

मराठ्यांचा वारसा या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये राजकीय, सामाजिक व धार्मिक वारसा, लोककलेचा वारसा, कला, वास्तूरचना आणि ऐतिहासिक स्थळे इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. व्ही. पी. पवार**

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डॉ. व्ही. पी. पवार**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १ |
| **प्रा. आर. के. देशमुख**<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज, पाचवड | २ |
| **प्रा. डॉ. अजितकुमार दादासो जाधव**<br>आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. जि. सातारा | ३ |
| **प्रा. डॉ. शिवाजी जाधव**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ४ |

■ संपादक ■

**प्रा. डॉ. व्ही. पी. पवार**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय | १ |
| २. | सामाजिक व धार्मिक वारसा | २४ |
| ३. | लोककलेचा वारसा | ४४ |
| ४. | कला, वास्तूरचना आणि ऐतिहासिक स्थळे | ६९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक –१

# राजकीय

## (Political)

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषयविवेचन

  १.२.१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा वारसा

  १.२.२ छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची तत्वे

  १.२.३ मराठा इतिहास लेखनशास्त्र आणि राष्ट्रवादाचा उदय

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.

- छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती स्पष्ट होईल.
- छत्रपती शिवरायांचे स्वराज्याविषयक विचार समजतील.
- स्वराज्य स्थापनेमागचे उद्देश, हेतू समजतील.
- स्वराज्याच्या माध्यमातून शिवाजी महाराजांनी भावी पिढीला दिलेला वारसा लक्षात येईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची तत्त्वे स्पष्ट होतील.
- मराठा इतिहासलेखनशास्त्रावर प्रकाश टाकता येईल.
- इतिहास लेखनशास्त्रातून राष्ट्रवादाचा उदय कसा झाला ते स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

सतरावे शतक महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्वाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र मराठा सत्तेची स्थापना केली. शिवरायांच्या कुशल नेतृत्वाखाली मराठी सत्तेचे साम्राज्यात रुपांतर झाले. कालांतराने याच मराठी सत्तेने दिल्लीपती बादशाहीचे काहीकाळ रक्षण केले. मराठ्यांच्या इतिहासाशिवाय भारताचा इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. स्वराज्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांनी खूप मोठा वारसा भावी पिढीस बहाल केला.

छत्रपती शिवरायांनी केवळ स्वराज्याची स्थापना केली असे नाही तर ते स्वराज्य दीर्घकाळ टिकावे यासाठी उत्तम प्रकारची प्रशासनव्यवस्थाही निर्माण केली. स्वराज्याचे प्रशासन उत्कृष्टरीत्या पार पाडण्यासाठी काही ध्येयधोरणे, तत्वे निश्‍चित केलेली होती. त्यानुसारच प्रशासन चालविले जात होते. परिणामी ही प्रशासन व्यवस्था नंतरच्या कालखंडात अनेकांना मार्गदर्शक ठरली.

एकोणीसाव्या शतकापर्यंत भारतीयांना इतिहास लेखनकला ज्ञात नव्हती असा एक सर्वसाधारण समज सर्वदूर पसरलेला होता मात्र हे विधान वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे होते. मराठी सत्तेच्या उदयाने शिवाजी आणि शिवकाल याविषायाकडे अनेक इतिहासकारांचे लक्ष वेधले गेले. पूर्वीच्या इतिहासाला छेद देऊन राष्ट्रवादी दृष्टीकोनातून इतिहासाची पुनर्मांडणी केली गेली. या शतकात अनेक इतिहासकारांनी मोलाचे कार्य केले.

## १.२ विषय विवेचन :

मराठ्यांच्या सत्तेचा राजकीय वारसा अभ्यासत असताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना, स्वराज्य स्थापनेमागची कारणे, हेतू किंवा उद्देश, स्वराज्याची संकल्पना, त्याची ध्येयधोरणे या घटकांचा आढावा घेणे उदबोधक ठरेल. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या प्रशासन व्यवस्थेच्या माध्यमातून राज्यकारभाराचा गाडा व्यवस्थितपणे सांभाळला. तर मराठ्यांच्या इतिहासकारांनी राष्ट्रीय दृष्टीकोनातून मराठी सत्तेचा मागोवा घेतल्याने भावी इतिहासकारांना त्यातून मार्गदर्शन झाले.

### १.२.१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा वारसा :

फाल्गुन वद्य तृतीया शालिवाहन शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर भोसले कुळात शिवाजीराजांचा जन्म झाला. बालशिवाजीस मातोश्री जिजाबाई व पिताश्री शहाजीराजे यांच्याकडून राजनीतीचे धडे मिळाले. पुणे-सुपे-चाकण-इंदापूर या शहाजीराजांच्या मूळ जहागिरीचा समृद्ध वारसा त्यांच्याकडे चालत आला. याशिवाय शहाजीराजांनी भोसले कुळाला मिळवून दिलेली प्रतिष्ठा, लष्करी सामर्थ्य, शौर्य व धाडस याबाबीही स्वराज्य स्थापनेच्या कार्यास शिवरायांना उपयुक्त ठरल्या. शहाजीराजांनी शिवाजीस उत्तमोत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. शिवाजीराजांना कोणकोणत्या विद्या अवगत होत्या यासंदर्भात माहिती देताना कवी परमानंद आपल्या शिवभारत या ग्रंथात म्हणतात की, ''श्रुती, स्मृती, पुराणे, भारत, राजनीती, सर्व शास्त्रे, रामायण, महाभारत, व्यायाम,

वास्तुविद्या, फलज्योतिष, धनुर्वेद, अनेक भाषा, हत्ती, घोडे, रथ यावरून सवारी, दांडपट्टा, तलवारबाजी, दुर्ग अभेद्य करणे, संकटावर मात करणे, इंगित जाणणे, रत्नपरीक्षा या सर्व विद्या, शास्त्रे व कला यामध्ये राजे प्रवीण झाले.'' शिवाजीराजांना शहाजीराजांकडून पुण्याची जहागिरी मिळाली तसेच प्रामाणिक अधिकारी वर्ग, फौजफाटा, खजिना व भोसल्यांची प्रतिष्ठा व शौर्याची परंपराही मिळाली. यासंदर्भात कवी परमानंद आपल्या शिवभारत या ग्रंथाच्या दहाव्या अध्यायात म्हणतात की, ''शहाजीराजांनी जिजाऊसोबत बालशिवाजीस पुणे प्रांती पाठवले. सोबत हत्ती, घोडे, पायदळ, पिढीजात विश्वासू अमात्य, विख्यात अध्यापक, बिरुदे, उंच ध्वज व विपुल द्रव्ये दिले.'' स्वराज्य उभारणीत शिवाजी राजांना उपरोक्त बाबी अत्यंत उपयुक्त ठरल्या.

मातोश्री जिजाबाई यांना दक्षिणेच्या राजकारणाची व राजनीतीची चांगली जाण होती. निजामशाहीतील कटकारस्थानातून आप्तेष्टांचे झालेले खून, आदिलशाही दरबाराच्या रोषामुळे आपल्या पतीला झालेली कैद यासारख्या सासर- माहेरच्या कितीतरी कटू घटना त्यांनी प्रत्यक्ष अनुभवल्या होत्या. इस्लामी राज्यकर्त्यांचे सर्वसामान्य प्रजेवर होणारे अन्याय, अत्याचार त्यांनी अनुभवले होते. या सर्वांवर त्यांना एकच उपाय दिसत होता आणि तो म्हणजे स्वराज्य होय.

इ.स. १६३० ते १६३६ या काळात जिजाबाईंना बालशिवाजीस घेऊन मोठी धावपळ करावी लागलेली होती. इ.स. १६४१ मध्ये शहाजीराजांनी बंगळूरहून जिजाबाई व शिवाजीराजांची पुणे प्रांती रवानगी केली. बालशिवाजीस शेजारी बसवून जिजाबाई जहागिरीचा कारभार पाहू लागल्या. त्या अनेक तंट्याचा निकाल देत. जिजाबाईंनी दिलेल्या पत्रावर जिजाआऊ वालीदा इ राजा शिवाजी असे लिहिलेले असे. छत्रपती शिवाजी महाराज मोहिमेवर जातेवेळी राज्यकारभाराची सर्व सूत्रे जिजाबाईकडे देत असत. महाराजांच्या अनुपस्थितीत स्वराज्याची घडी जराही विस्कटली नाही. मातोश्री जिजाबाईंकडे असणाऱ्या राज्यकारभार कौशल्याचा वारसा राजांना मिळाला. शिवाजीमहाराज ही आपल्या यशाचे श्रेय आपल्या मातेला बहाल करताना म्हणतात की, ''मी अनेक संकटातून मार्ग काढून स्वराज्य स्थापन करू शकलो याच्या पाठीशी देवी तुळजाभवानीची कृपा व मातोश्री जिजाबाईंचे आशीर्वाद होते.'' तर जिजाबाईंच्या कार्याचे मूल्यमापन करताना न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणतात की, ''जिजाबाई म्हणजे शिवाजी महाराजांची मार्गदर्शक व संरक्षक देवता होय.''

- **राजा कालस्य कारणम:**

महाभारताच्या उद्योगपर्वात राजा व त्याची कर्तव्ये याची सविस्तर माहिती दिली आहे.त्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे,

**कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम।**

**इति ते संशयो माभूत, राजा कालस्य कालकारणम।।**

म्हणजेच राजा हा काळाचा प्रतिनिधी असतो. आपल्या प्रजेचे रक्षण करणे, अन्यायाविरोधात प्रतिकार करणे,समाजहित जोपासणे, मुलकी व लष्करी सेवा संघटीत करणे, योग्य न्यायनिवाडा करणे आणि जनतेच्या कल्याणार्थ राज्यकारभार करणे ही राजाची आद्य कर्तव्ये होती. स्वराज्याच्या स्थापनेसाठी

शिवाजी महाराजांनी महाभारतातील याच राजनीतीचा आदर्श घेतल्याचे दिसते.

● **स्वराज्याची शपथ :**

शिवाजीराजे पुणे जहागिरीचा कारभार पाहू लागले परंतु त्यांच्या स्वातंत्र्याच्या विचाराला सुलतानांची वतनदारी आड येत होती. शिवाजीराजे आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पुण्याच्या नैऋत्येला असलेल्या रायरेश्वराच्या मंदिरात आले. याठिकाणी राजांनी आपल्या मनातील निश्चय सवंगड्याना बोलून दाखविला. राजे सवंगड्याना म्हणाले, ''शहाजीराजे विजापूरची सरदारकी सांभाळत आहेत.पुणे जहागीरीचाही राज्यकारभार योग्य प्रकारे चालू आहे मात्र मला हे योग्य वाटत नाही.सुलतानांच्या वतनदारीवर आपण किती काळ संतुष्ट राहायचे? त्यांच्यामध्ये सततची युद्धे चालू आहेत.प्रचंड जीवित व वित्त हानी होत आहे. कुटुंबेच्या कुटुंबे नाहक देशोधडीला लागतात.मुलुखाची धूळधाण होते.आणि एवढे सोसूनही याचा परिणाम काय तर गुलामगिरी.आपण हे किती दिवस सहन करायचे ? किती दिवस खपायचे? तुम्हीच सांगा देशमुखी वतनाच्या लोभाने असेच चालू द्यायचे काय?

राजांनी सांगितलेल्या या विचाराने सारेच सवंगडी अवाक झाले. त्यांनीही तुम्ही सांगाल ती जबाबदारी पार पाडण्यास व त्यासाठी बलिदान करण्यास तयार असल्याचे सांगितले. मावळ्यांनी दिलेल्या विश्वासाने राजांना अधिकच स्पुर्ती मिळाली. राजे म्हणाले, सवंगड्यानो आपले ध्येय ठरले त्यासाठी आपण झटायचे, खपायचे प्रसंगी प्राणही द्यायचे ते ध्येय म्हणजे तुमचे माझे आपणा सर्वांचे हिंदवी स्वराज्य स्थापन करायचे. चला उठा, रायरेश्वराला साक्ष ठेऊन आपण स्वराज्य स्थापण्याची प्रतिज्ञा करू. आशा रीतीने सन १६४५ मध्ये वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी शिवाजी राजांनी आपल्या सवंगड्याना बरोबर घेऊन रायरेश्वराच्या साक्षीने स्वराज्य स्थापण्याची प्रतिज्ञा केली. सुलतानांच्या गुलामगिरीचा त्याग करून, स्वातंत्र्याचा नवा विचार घेऊन राजे स्वराज्याच्या कार्यास लागले. सन १६४६ मध्ये तोरणा जिंकून त्यांनी स्वराज्याचे तोरण बांधले.

● **स्वराज्य स्थापनेमागील उद्देश :**

महाराष्ट्राची नैसर्गिक, भौगोलिक ठेवण, महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परस्थिती मराठी माणसांची स्वभाव वैशिष्ट्ये, मराठी भाषेमुळे लोकांची जागृत झालेली अस्मिता, विविध संतांच्या कामगिरीमुळे सैल झालेले जातीयतेचे बंध, वाढीस लागलेला धर्माभिमान, महाराष्ट्रातील विविध ग्रामीण संस्था, संघटनांनी केलेले कार्य, परधर्मियांकडून होणाऱ्या छळाची प्रतिक्रिया, महाराष्ट्र धर्माबद्दलची विचारसरणी, मराठे पुरस्कृत गनिमी कावा युद्धपध्दती, मातोश्री जिजाबाई व शहाजी राजांचे योगदान आणि सर्वात महत्वाचे शिवाजी राजांचे असामान्य व्यक्तिमत्त्व अशा अनेकविध कारणांच्या समुच्चयातून मराठा सत्तेने आकार घेतला. शिवरायांनी अत्यंत नियोजनपूर्वक व्यापक व दूरदृष्टीचा विचार करून स्वराज्याची स्थापना केली होती.शिवरायांच्या स्वराज्याची ध्येयधोरणे स्पष्ट करताना रामचंद्रपंत अमात्य आपल्या आज्ञापत्र या ग्रंथात म्हणतात की, ''लोकांचे रक्षण करणे, सार्वजनिक हिताची कामे करणे, कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करणे, देशाच्या रक्षणाकरिता लष्कर व मुलकी सेवा संघटीत करणे व जनतेच्या कल्याणाचे

संवर्धन करणे हे राजांचे स्वराज्य स्थापनेमागील उद्देश होते.'' एकूणच शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेमागील उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) स्वतंत्र राज्याची स्थापना :**

तत्कालीन काळचा विचार करता महाराष्ट्र अनेक इस्लामी सत्तांच्या वर्चस्वाखाली होता. या इस्लामी सत्तांनी आपल्या सरदारांना काही वतने, जहागीर देऊ केली. वतनाच्या लोभापायी अनेक मराठे सरदार स्वाभिमान विसरून गेले होते. मात्र शिवरायांच्या राज्याविषयीच्या कल्पना स्वतंत्र होत्या. त्यांना महाराष्ट्रावरती हिंदवी म्हणजे ऐतद्देशियांचे राज्य निर्माण करावयाचे होते.

**२) स्वधर्म रक्षण :**

छत्रपती शिवाजी महाराज हिंदूधर्मीय होते. प्राचीन काळापासूनचा गौरवशाली इतिहास त्यांना माहित होता. देवगिरीच्या यादवांचे राज्य, विजयनगरच्या साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाच्या पाउलखुणा प्रत्येक मराठी माणसाच्या मनात घर करून होत्या. जुलमी इस्लामी राज्यकर्त्यांमुळे लोकांना आपला धर्म आचरता येईनासा झाला होता. ऐतद्देशियांच्या सण, समारंभावर अनेक प्रकारचे निर्बंध लादले होते. म्हणून शिवाजी राजांनी सर्वसामान्य रयतेला आपल्या धर्माचे पालन करता यावे, आपली संस्कृती आचरता यावी यासाठी स्वराज्याची स्थापना केली.

**३) धर्मातीत राज्याची निर्मिती:**

शिवाजी राजे हिंदूधर्मीय होते.त्यांना आपल्या धर्माविषयी अभिमान होता. इतर धर्माविषयी त्यांना सहानुभूती होती. एकूणच धर्माविषयीची त्यांची भूमिका ही सहिष्णूवृत्तीची होती. मुस्लीम राज्यकर्त्यांकडून हिंदूधर्मीय रयतेवर अन्याय, अत्याचार केले जात होते म्हणून त्यांनीही मुस्लीम धर्मीय सर्वसामान्य रयतेवर अन्याय, अत्याचार केला नाही. परधर्मियांच्या पवित्र धर्मग्रंथांना, स्थळांना उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली. इस्लाम धर्मीय लोकांनाही स्वराज्याच्या सेवेत काम करण्याची संधी दिली. थोडक्यात सर्वधर्मसमभावाचे, धर्मातीत राज्याचे स्वप्न राजांनी प्रत्यक्षात साकार केले.

**४) व्यक्तीगुणांना संधी :**

इस्लाम सत्ताधीशांच्या पदरी सेवा बजावत असताना मराठी माणसाने कितीही शौर्य गाजवले, पराक्रम केला तरी त्यास प्रतिष्ठा मिळत नव्हती. मात्र शिवाजी महाराजांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना समान संधी बहाल केली मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो. त्यामुळेच अनेक सर्वसामान्य लोक आपल्याकडे असलेल्या गुणसमुच्चयाव्दारे लष्करी व मुलकी कामगिरी सिद्द करू शकले.

**५) राज्यकर्त्यांच्या छळाची प्रतिक्रिया :**

याकाळात अल्पसंख्य असलेले मुस्लीम राज्यकर्ते बहुसंख्य हिंदू प्रजेवर राज्य करत होते. त्यांच्याकडून

हिंदूची मंदिरे उद्ध्वस्त करणे, सक्तीने धर्मांतरास भाग पाडणे असे अनेक अन्याय अत्याचार होत होते. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या पदरी अनेक हिंदू सरदार होते मात्र स्वहितासाठी ते याविरोधात एक शब्दही काढत नव्हते. यातूनच लोकांच्यात जुलमी, अत्याचारी राज्यकर्त्यांच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. प्रतिकार करण्याची उमेद लोकांमध्ये वाढीस लागली. या घटकास योग्य वळण देऊन शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली.

**६) रयतेची मुक्तता :**

रयत हा स्वराज्याचा कणा असलातरी तो या काळात दुर्लक्षित घटक होता. अनेक राज्यकर्ते आले आणि गेले तरी रयतेच्या जीवनमानात फारसा फरक पडला नाही. जमीन महसुलाचे अनिश्चित दर, महसूल वसुलीची अन्यायकारक पध्दती, जमिनदार व वतनदारांकडून होणारी पिळवणूक अशा चक्रव्यूहात सर्वसामान्य रयत अडकलेली होती. त्यांचे जीवन कष्टप्रद बनले होते. यातून त्यांना सुटका हवी होती. त्यासाठी स्वराज्याची आवश्यकता होती. शिवरायांनी स्वराज्याची स्थापना करून रयतेची वरील जाचातून मुक्तता केली. स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून त्याची प्रतवारी केली. निश्चित असा महसूल ठरवला. वसुलीसाठी निश्चित नियम केले. महसूल वसुलीची मक्तेदार पद्धत बंद करून पगारी नोकर नियुक्त केले. निश्चित केलेल्या महसुलापेक्षा जास्त महसूल वसूल केला जाणार नाही तो सर्वस्वी सरकारी तिजोरीत भरला जाईल याची व्यवस्था केली. रयतेची पुत्रवत काळजी घेतली परिणामी रयत सुखी झाली व राज्याविषयी आपुलकी बाळगू लागली.

**७) कायद्याचे राज्य :**

शिवपूर्व काळात एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जात होत्या. प्रत्येक धर्म व जात यानुसार त्यामध्ये भिन्नता होती. कायदा सर्वांसाठी समान नव्हता. या सर्व गोष्टींना पायबंद घालण्याचा एकच उपाय म्हणजे स्वशासन होय. स्वराज्याच्या संकल्पनेतून त्यांनी सर्वांना समान कायदा लागू केला. गुन्ह्याच्या प्रमाणात शिक्षा देऊ केली. त्यामधून कोणासही सुट दिली नाही.

**८) लोककल्याणकारी राज्य :**

स्वराज्य संकल्पनेच्या माध्यमातून शिवाजीराजांनी लोककल्याणकारी राज्याचा आदर्श निर्माण केला. निश्चित शेतसारा आकाराला, शेतकऱ्यांना बि-बियाणे, बैलजोडी खरेदीसाठी तगाई स्वरूपात सरकारी कर्ज देऊ केले. शेतीसाठी पाण्याची सोय केली, रयतेस कसलाही उपद्रव होणार नाही याची खबरदारी घेतली. वतनदार पद्धतीस आळा घातला. प्रशासनामध्ये शिस्त निर्माण केली. राज्याची आर्थिक स्थिती सुधारली. आज्ञापत्राचे लेखक रामचंद्रपंत अमात्य यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ''राजांनी नूतन सृष्टीच निर्माण केली.'' इतिहासकार शेजवलकर शिवाजीराजांच्या स्वराज्याविषयी टिप्पणी करताना म्हणतात की, ''शिवाजीराजांची स्वराज्य व राज्याभिषेकाची कल्पना अतिशय व्यापक व प्रभावी होती. या कल्पनांमुळे निर्विकार पडलेल्या मराठी माणसाला चेतना मिळाली. चेतना मिळालेल्या माणसाला स्फुर्ती प्राप्त झाली व स्फुर्ती असणाऱ्यांच्या अंगी शक्ती आली आणि या शक्तिमान व्यक्तीच्या हातून शिवाजीराजांनी अद्वितीय

पराक्रम घडवून आणले.''

● **राजमुद्रेतून जनतेस दिलेला विश्वास :**

स्वराज्याच्या कारभाराची ध्येयधोरणे विशद करणारी शिवाजी महाराजांची राजमुद्रा त्यांच्या एका पत्रातील उल्लेखानुसार १६४६ पूर्वीच अस्तित्वात असल्याचे दृष्टोत्पतीस येते. राजमुद्रेमधील आशय पुढीलप्रमाणे–

**''प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता।**
**शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।''**

उपरोक्त राजमुद्रेचा असा अर्थ ध्वनित होतो की, ''प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढणारी, वर्धमान आणि वर्धिष्णू अशी विश्वाने वंदिलेली शहाजीपुत्र शिवाजी यांची ही राजमुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी विलसित आहे.'' शिवाजी महाराजांच्या या राजमुद्रेविषयी रियासतकार गो.स.सरदेसाई म्हणतात की, ''ही मुद्रा सार्थ असून ती मराठी राज्याची गुरुकिल्लीच आहे असे म्हणता येईल. ही सुंदर मुद्रा म्हणजे मराठ्यांचा सारभूत इतिहास व शिवचरित्राचे मुख्य रहस्य दाखवते. या मुद्रेचा काळ हाच शिवाजीच्या उद्योगाचा आरंभ असे नि:संदिग्ध म्हणता येते. सारांश सन १६४७ पासून शिवाजी महाराजांचा हा उद्योग लोकांच्या मनात चांगला भरून त्यांच्या कर्तृत्वाविषयी आदरभाव उत्पन्न झाला की, आदिलशाही मुलखाच्या मानाने मावळातील लोकांस वित्त-जीविताची जास्त शाश्वती वाटू लागली.''

● **हिंदवी स्वराज्याची राज्यबंधारणा :**

हिंदवी स्वराज्याची राज्यबंधारणा इतिहासकार वा.सी.बेंद्रे यांनी विशद केली आहे. ते म्हणतात की, ''शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य हे केवळ महाराष्ट्रीयांकरिता नव्हते. त्यात हिंदू धर्माची जोपासना करून स्थानिक हिंदुत धार्मिक व सामाजिक बाबतीत ऐक्य राखण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच परधर्मीय स्थानिक लोकांचीही तितक्याच सुरक्षिततेची व्यवस्था केली. आचारधर्माचे स्वातंत्र्य दिले. राजनिष्ठा व देशनिष्ठा यावर भर दिला.राज्यकारभारातील व व्यवहारातील धार्मिक भेदभाव दूर केला.''

● **स्वराज्याचा आचारधर्म :**

इतिहासकार वा.सी.बेंद्रे यांनी शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा आचारधर्म सांगितलेला आहे. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची केलेली स्थापना म्हणजे त्यांच्या दूरदृष्टीचा विचार होता. या माध्यमातून त्यांनी आदर्श राज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारली. या स्वराज्याचा आचारधर्म पुढीलप्रमाणे असल्याचे दिसते.

१) सर्व धर्मांना समानतेची वागणूक म्हणजेच सर्वधर्मसमभाव

२) प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य

३) विद्यार्जनाचा जातीयतेशी संबंध नाही

४) कर्तव्य व निष्ठेसह नोकरीमध्ये सर्व जातीधर्मांना समान संधी

५) बाटवण्यास विरोध व बाटवलेल्याना पुन्हा धर्मात घेण्यास मान्यता

६) स्त्रिया व लहान मुले यांचे संरक्षण

७) साधूसंतांचा आदर

८) गुलामांच्या खरेदी विक्रीला आळा

९) लष्करी मोहीम व छावणी याठिकाणी स्त्रियांना बंदी

१०) खेडेगावांना स्वायत्तता व समानता

११) लष्कर सरकारच्या मालकीखाली

१२) आरमारास बळकटी व व्यापारवाढीस प्रोत्साहन

१३) राज्य व्यवहाराला शिस्तबद्ध वळण

१४) लुटीच्या वेळेस पाळावयाचे निर्बंध

१५) कला शास्त्रांना उत्तेजन

१६) राजपदास प्रजेची मान्यता

अशा रीतीने छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली स्वतंत्र हिंदवी राज्याची स्थापना, त्याची ठरवलेली ध्येय धोरणे, स्वधर्माचे केलेले रक्षण, धर्मातीत राज्याची केलेली निर्मिती, व्यक्तीगुणांना प्राप्त करून दिलेली संधी, राज्यकर्त्याच्या छळाच्या प्रतिक्रियेतून मुस्लीम सत्ताधीशांना दिलेले प्रत्युत्तर, जुलमी राज्यकर्त्यांच्या जाचातून रयतेची केलेली मुक्तता, निर्माण केलेले कायद्याचे राज्य आणि स्वराज्याचा कल्याणकारी हेतू आदी गोष्टी म्हणजे छत्रपती शिवाजीराजांनी स्वराज्याच्या माध्यमातून भावी पिढीस दिलेला दैदिप्यमान असा वारसा होता.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) ''जिजाबाई म्हणजे शिवाजी महाराजांची मार्गदर्शक व संरक्षक देवता होय.'' असे ........... यांनी म्हटले.

अ) जदुनाथ सरकार ब) न्या. रानडे क) गो. स. सरदेसाई ड) सेतू माधवराव पगडी

२) शिवभारत हा ग्रंथ ............. यांनी लिहला.

अ) केशव भट्ट ब) रामचंद्र पंत अमात्य

क) कवी परमानंद ड) कृष्णाजी अनंत सभासद

३) छ. शिवाजी राजांनी स्वराज्याची शपथ ............ मंदिरात घेतली.

अ) रायरेश्वराच्या ब) सोमेश्वराच्या क) यवतेश्वराच्या ड) कुरणेश्वराच्या

४) 'राजांनी नूतन सृष्टीच निर्माण केली' असे ............ नी म्हटले आहे.

अ) रघुनाथ पंत हनुमंते ब) धुंडीराज लक्ष्मण व्यास

क) कवी परमानंद ड) रामचंद्र पंत अमात्य

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा कोणत्या वर्षी केली?

२) आज्ञापत्र हा ग्रंथ कोणी लिहला?

३) हिंदवी स्वराज्याची राज्यबंधारणा कोणी विषद केली ?.

### १.२.२ छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची तत्त्वे :

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व त्यांनी निर्माण केलेल्या प्रशासन व्यवस्थेला द्यावे लागेल.कारण ज्या अस्थिरतेच्या काळात महाराजांनी राज्यकारभाराची व्यवस्था उभारली त्या काळची परस्थिती पाहता या कार्याचे महत्त्व समजते. मराठ्यांनी आदिलशाही, मुघल, निजामशाही, सिद्धी, पोर्तुगीज व इंग्रज या परकीय सत्तांशी संघर्ष करत मराठा राज्यास आकार दिला. मुस्लीम सत्तांच्या पदरी असताना मराठ्यांनी मोठा पराक्रम केला. त्यांना लष्करी शिक्षणाचे धडे मिळाले. त्याचाच फायदा शिवाजीराजांना आपल्या लष्करी प्रशासनासाठी झाला. अर्थात ही झाली मराठ्यांची एक बाजू. मराठ्यांची दुसरी बाजू म्हणजेच प्रशासनाची बाजू तितकीशी सकारात्मक नव्हती. शिवजन्मावेळची महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती तर भयावह होती. इस्लाम धर्मीय सैन्यांनी महाराष्ट्रातील अनेक प्रदेश उध्वस्त करून टाकलेला होता. सततच्या लढाया, युद्धमोहीमा यामुळे या प्रदेशात शांतता, सुव्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. सर्वत्र अराजकतेची परिस्थिती होती. शत्रुसैन्याच्या अत्याचारास कंटाळून रयत परागंदा होऊ लागलेली होती. अनेक जहागीरदार, वतनदार यांच्यामध्ये सत्तेसाठी, वतनासाठी संघर्ष, मारामाऱ्या सुरू होत्या. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिवरायांनी स्वराज्य स्थापन करून प्रशासनाची व्यवस्थित घडी बसवली, अर्थात हे काम सोपे नव्हते. साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर करून त्यांनी हे साध्य केले होते. तेव्हा त्यांच्या राज्यकारभाराची, त्यांच्या व्यवस्थापनाची कोणती वैशिष्ट्ये, तत्त्वे होती हे पाहत असताना त्यांच्या प्रशासन व्यवस्थेची मुलकी प्रशासन व्यवस्था व लष्करी प्रशासन व्यवस्था आशा दोन प्रकारात विभागणी करणे उचित ठरेल. एकूणच शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन तत्त्वाचा सारांश रूपाने आढावा पुढीलप्रमाणे-

**अ) मुलकी प्रशासन :**

स्थापन केलेल्या स्वराज्याचा कारभार व्यवस्थितपणे पार पाडता यावा यासाठी महाराजांनी स्वराज्याचे

चार मुख्य विभाग केले होते. पहिल्या विभागात उत्तर कोकण, साल्हेर ते पुण्यापर्यंतच्या प्रदेशाचा समावेश होता. या प्रदेशाची सरसुभेदार म्हणून जबाबदारी मोरो त्रिंबक पिंगळे यांच्याकडे सोपवलेली होती. दुसरा विभाग पुणे ते बेळगाव, धारवाडपर्यंतच्या प्रदेशाचा होता. याची जबाबदारी दत्ताजी त्रंबक वाकनीस यांच्याकडे सोपवलेली होती. दक्षिण कोकण व कारवार बेदनूरपर्यंतच्या किनारपट्टीचा समावेश तिसऱ्या विभागात होत होता. या प्रदेशावर आण्णाजी दत्तो यांची सरसुभेदार म्हणून नेमणूक केली होती. तर शेवटचा चौथा विभाग म्हैसूर व तमिळनाडूतील प्रदेशाचा होता व त्याची जबाबदारी हरजी महाडिक यांच्याकडे होती.

स्वराज्याचे जे चार मुख्य विभाग होते त्याला सरसुभा म्हणत व सरसुभेदार हा त्याचा प्रमुख होता. सरसुभा अनेक सुभे एकत्र येऊन होत. सुभ्याच्या प्रमुख अधिकाऱ्यास सुभेदार म्हणत. सुभ्यामध्ये अनेक परगणे असत त्याच्या प्रमुखाला सरहवालदार म्हणत. परगण्यात अनेक महाल किंवा तर्फ असे. त्यावरती हवालदार नावाचा अधिकारी होता. महालामध्येही अनेक लहान गट होते. त्याच्या प्रमुखास कमाविसदार म्हणत. खेडे हा प्रशासनाचा शेवटचा घटक होता त्यास ग्राम, देहे, मौजा या नावांनी संबोधले जाई. पाटील,कुलकर्णी हे खेडेगावचे प्रमुख वतनदार होते. खेडे मोठे असल्यास त्यास 'कसबा' तर बाजारपेठ असल्यास त्यास 'पेठ' म्हणत. शेटे, महाजन हे त्याचे प्रमुख वतनदार म्हणून काम पाहत होते.

**छत्रपती किंवा राजा :** मराठे काळात राज्याची सर्वसत्ता व अधिकार छत्रपतींच्या हाती एकवटलेले होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी अष्टप्रधान मंडळ नेमले असले तरी अंतिम अधिकार हे छत्रपतींकडे होते. प्रधानांनी दिलेला सल्ला मानावयाचा किंवा नाही हे सर्वस्वी छत्रपतींवर अवलंबून होते. मुलकी व लष्करी प्रशासनातील अधिकारी छत्रपतीमार्फत निवडले जात होते. प्रधान व अधिकारी यांना छत्रपतींच्या आदेशानुसार आपापल्या खात्याचा कारभार पार पाडावा लागत असे. असे असले तरी महाराजांनी काही प्रमाणात सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. म्हणजेच त्यांनी कल्याणकारी राजेशाहीचा प्रयोग यशस्वीरीत्या अमंलात आणलेला होता.

**अष्टप्रधान मंडळ :** अंतीम सत्ता छत्रपतींच्या हाती केंद्रीभूत असली तरी प्रशासनात सहाय्य करण्यासाठी अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते. अष्टप्रधान मंडळातील पंडितराव व न्यायाधीश वगळता उर्वरित सर्व प्रधानांना प्रसंगी लष्करी मोहिमांवरती जावे लागे. अष्टप्रधान मंडळातील प्रधान, त्यांची नावे व कामे पुढीलप्रमाणे–

**अष्टप्रधान मंडळ**

| पद | नाव | कामे |
|---|---|---|
| मुख्यप्रधान | मोरो त्रिंबक पिंगळे | सर्वसाधारण प्रशासन पाहणे |
| अमात्य | रामचंद्र नीलकंठ मुजुमदार | राज्याच्या जमाखर्चावर नियंत्रण व देखरेख |
| सेनापती | हंबीरराव मोहिते | सैन्यासंदर्भात सर्व कार्यभार |
| सचिव | अण्णाजी दत्तो | पत्रव्यवहार पाहणे |

| | | |
|---|---|---|
| मंत्री | दत्ताजी त्र्यंबक वाकनीस | राजदरबारातील दैनंदिन नोंदी व व्यवस्था |
| पंडितराव | रघुनाथपंत | धार्मिक बाबतीत न्यायदान |
| सुमंत | रामचंद्र त्रिंबक डबीर | परराष्ट्र व्यवहार पाहणे |
| न्यायाधीश | निराजी रावजी | राज्याचा सर्वोच्च न्यायाधीश |

याशिवाय अष्टप्रधान मंडळाच्या देखरेखीखाली लहान लहान खाती,विभाग निर्माण करण्यात आले होते, ज्यास कारखाना अथवा महाल असे म्हणत. स्वराज्यात असे कारखाने व महाल होते. प्रत्येक कारखान्यावर, महालावर स्वतंत्र अधिकारी, त्या खात्याचा हिशोब ठेवणारे कारकून व त्यांना मदत करणारे सेवक यांची नेमणूक केलेली होती. याशिवाय राजांचा खास पत्रव्यवहार पाहणारा चिटणीस, वतनपत्रे, दानपत्रे तयार करणारा फडणीस असे अधिकारीही नियुक्त केले जात.

**महसूल व्यवस्था :** शेतसारा किंवा जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत होता. निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याच्या महसूल व्यवस्थेच्या धर्तीवर शिवरायांनी आपली महसूल व्यवस्था राबवली. शिवकाळात एकूण तीन वेळा जमिनीची मोजणी करण्यात आली. जमिनीची मोजणी करण्यासाठी 'शिवशाही काठीचा' वापर केला जात होता. जमीन मोजणीनंतर विविध घटक विचारात घेऊन तिची अव्वल, दुम, सीम व चारहम अशा प्रकारात वर्गीकरण केले जाई. जमीन निहाय पिकपाहणी करून महसुलाचे दर निश्चित केले जात. महसूल रोख रक्कमेत किंवा वस्तूंच्या स्वरूपात सरकारकडे जमा करण्याची मुभा होती. एकूण उत्पन्नाच्या २/५ हिस्सा शेतसारा म्हणून वसूल केला जाई. महसूल वसुलीची मक्तेदारी पद्धत बंद करून पगारी नोकर नेमले. मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्तीप्रसंगी शेतसाऱ्यात सूट दिली जाई. याशिवाय जकात कर,अबकारी कर, सागरी व्यापार, जंगल खात्याचे उत्पन्न, टांकसाळ व युद्धातील लुट इत्यादी मार्गांनी राज्याच्या महसुलात भर पडत होती.

**ब) लष्करी प्रशासन :**

मुलकी प्रशासन व लष्करी प्रशासन ही राज्यशकटाची दोन चाके असतात या तत्त्वानुसार शिवरायांनी मुलकी प्रशासनाला लष्करीप्रशासनाचे पाठबळ निर्माण केले. शिवपूर्वकाळात लष्करी व्यवस्थेत अनेक दोष होते ते दोष दूर करण्याचा शिवरायांनी प्रयत्न केला. स्वराज्याचे लष्कर उभारताना त्यांनी संरजामशाही पद्धतीचा त्याग केला व त्याऐवजी स्वत:चे पगारी स्वतंत्र्य लष्कर उभारले. या लष्कराने केलेल्या शौर्यामुळे महाराज अनेक पराक्रम करू शकले. शुक्रनीतीतील ''सैन्यद्विना नैव राज्य, न धनं, न पराक्रम'' म्हणजेच सैन्यावाचून राज्य,धन व पराक्रम यांना काहीच अर्थ उरत नाही या वचना प्रमाणे त्यांनी लष्कराचे महत्व ओळखले होते. शिवकालखंडातील सर्वसाधारण लष्करी प्रशासन पुढीलप्रमाणे–

**१) राजाचे शरीरसंरक्षक दल :**

सैन्यामधील जी व्यक्ती अत्यंत विश्वसनीय, एकनिष्ठ, लढवय्या व शूर असेल अशा व्यक्तीची महाराजांच्या शरीरसंरक्षक दलात निवड केली जाई. ज्या ज्या वेळी महाराज मोहिमेवर जात त्यावेळी हे

सैनिक महाराजांच्या संरक्षणासाठी कार्यरत असत.

**२) घोडदळ :**

शिवकाळात घोडदळाचे प्रामुख्याने बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार होते. बारगीर म्हणजे ज्यास सरकारतर्फे घोडा व हत्यारे पुरवले जाई असा घोडेस्वार होय तर स्वत:चा घोडा व हत्यारांनिशी सरकारी सेवा बजावणारा घोडेस्वार म्हणजे शिलेदार होय.

**३) पायदळ :**

घोडदळाप्रमाणे महाराजांनी पायदळाकडेही विशेष लक्ष पुरवलेले होते. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता घोडदळाहून पायदळ विशेष उपयुक्त होते. पायदळातील बहुसंख्य सैनिकांची भरती ही मावळे व हेटकरी या समाजातून केली जाई. मराठ्यांच्या लष्करातील सैन्यसंख्येविषयी मतभेद असले तरी साधारणपणे महाराजांच्या अखेरच्या काळात दोन ते तीन लाख इतके सैनिक महाराजांच्या पदरी असल्याचे आढळते.

मराठ्यांच्या लष्करातील साधेपणा, कठोर शिस्त, त्यांच्याकडील विविध शस्त्रास्त्रे, त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण, त्यांची रचना, त्यांना वेळच्यावेळी दिले जाणारे रोख स्वरूपातील वेतन, मराठ्यांकडील गनिमी काव्याचे युद्दतंत्र, सोबतीला कार्यक्षम हेरव्यवस्था आदी बाबींचा विचार करता सैनिकांकडून अतिशय जलद हालचाली होत होत्या. याबळावरच अनेक वेळा त्यांनी विजयश्री खेचून आणली.

**४) आरमार दल :**

स्वराज्याच्या नियंत्रणाखालील सागरी किनारपट्टीच्या संरक्षणासाठी, परकीय शत्रूंना शह देण्यासाठी महाराजांनी प्रबळ आरमाराची उभारली केली. आरमारात गुराब, गलबत, शिबाड, तरांडी, तारू, पगार, तीरकाठी, माचवा इत्यादी प्रकारची जहाजे होती. दर्यासारंग व मायनाईक अशी दोन अधिकारपदे आरमारात निर्माण केली. आरमारामध्ये साधारणत: ७०० जहाजे होती. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नदुर्ग, पद्मदुर्ग इ. जलदुर्गांची बांधणी करण्यात आली. त्याद्वारे स्वराज्यास बळकटी प्राप्त झाली.

- **शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची तत्त्वे :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकूणच व्यवस्थापनाची तत्वे आपणास पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**१) राज्याची विभागणी :**

छत्रपती हे राज्याचे सर्वोच्च प्रमुख असले तरी एकट्याने संपूर्ण राज्याचा कारभार करणे अशक्यप्राय होते. परिणामी राज्यकारभाराच्या सोयीसाठी स्वराज्याची चार मुख्य विभागात विभागणी केली होती. त्या प्रत्येक विभागावर सरसुभेदाराची नियुक्ती केली होती. त्याच्याकडे त्या प्रदेशाच्या राज्यकारभाराची जबाबदारी सोपवलेली होती.

**२) कामाची विभागणी :**

स्वराज्याचा कारभार सुरळीतपणे चालवा यासाठी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली. अष्टप्रधान मंडळात मुख्य प्रधान, अमात्य, सेनापती,सचिव, मंत्री, पंडितराव, सुमंत व न्यायाधीशअशा पदांची निर्मिती केली. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे, प्रधानांकडे स्वतंत्रपणे त्याच्या खात्याची जबाबदारी सोपवली. अर्थात ते सर्वजण छत्रपतींना जबाबदार होते. थोडक्यात अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून शिवरायांनी काही प्रमाणत सत्तेचे विकेंद्रिकरण केले.

**३) लष्करी कामगिरी अनिवार्य :**

समकालीन कालखंडाचा विचार करता तो काळ अतिशय धामधुमीचा, युद्धमोहीमांचा होता. नवीन प्रदेशाची प्राप्ती, रयतेचे व स्वप्रदेशाचे रक्षण यासारख्या गोष्टी अत्यावश्यक होत्या. त्यामुळे अष्टप्रधान मंडळातील पंडितराव व न्यायाधीश वगळता उर्वरित सर्व प्रधानांना प्रसंगी युद्दमोहिमांचे नेतृत्व करावे लागे.

**४) मुलकी कामाचा लष्करी कामाप्रमाणे दर्जा :**

शिवाजी महाराज जसे महान सेनानी होते तसेच ते कुशल प्रशासकही होते. एखाद्या प्रदेशावर वर्चस्व प्राप्त करताच तेथे तत्काळ आपला मुलकी अंमल निर्माण करत. लष्करामध्ये शौर्य, पराक्रम गाजवून आपल्या लौकिकात भर घालावी असा प्रत्येकाचा मनोदय असे. त्याप्रकारच्या संधीही त्यांना प्राप्त करून दिल्या जात. त्याचबरोबर महाराजांनी मुलकी कामासही लष्करी कामाइतकेच महत्व दिले. कार्यक्षमपणे प्रशासकीय कामगिरी पार पडणाऱ्या प्रधानांचा त्यांनी यथोचित सन्मान केला. अशा रीतीने त्यांनी दोन्ही कामाचा दर्जा एकसारखाच मानला होता.

**५) कोणतेही पद वंशपरंपरागत नाही :**

शिवाजी महाराजांनी मुलकी प्रशासन व लष्करी प्रशासनातील कोणतीही पदे वंशपरंपरेने दिली नाहीत. जोपर्यंत त्या व्यक्तीच्या ठिकाणी स्वराज्याबद्दलची तळमळ, प्रामाणिकपणा व कर्तव्यदक्षता असेल तोपर्यंतच ती व्यक्ती त्या पदावर राहत होती. अकार्यक्षम व्यक्तींस पद सोडावे लागत होते.

**६) जहागिरीऐवजी रोख पगार :**

जहागीर प्रथा ही सरंजामशाहीचे मूळ आहे. राज्यावरील संकटसमयी जहागीरदार बंड करून स्वत:चा सवता सुभा थाटतात. हा संभाव्य धोका ओळखून शिवरायांनी कोणत्याही अधिकाऱ्यास व सैन्यास जहागीर दिली नाही. त्यानेकेलेल्या स्वराज्याच्या सेवेच्या मोबदल्यात त्यास त्याच्या श्रेणीनुसार, कार्यानुसार रोख पगार देऊ केला. परिणामी प्रत्येकजण स्वत:ला प्राणपणाने स्वराज्याच्या कार्यात झोकून देऊ लागला.

**७) राज्यकारभाराची संयुक्त जबाबदारी :**

संयुक्त जाबाबदारी हे एक महाराजांच्या व्यवस्थापनाचे मुख्य तत्व होते. राज्यकारभार करताना प्रत्येकामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी राजांनी काही दंडक घालून दिलेले होते.

प्रधानांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रत्येक कागदपत्रावर त्यांना आपली मुद्रा उमटवावी लागे. त्यामुळे प्रत्येकाच्या ठिकाणी संयुक्त जबाबदारीची जाणीव प्रगल्भ झाली. त्यातूनच कारभारात कार्यक्षमता आली. हेन्री ऑक्झिंडेन म्हणतो की, ''छत्रपती शिवाजी महाराज व इंग्रज यांच्यात जो व्यापारी करार झाला त्यावर महाराजांच्या अनेक मंत्र्यांनी आपल्या मुद्रा केल्याचे दिसून आले.''

**८) अकार्यक्षम प्रधानांची पदावरून हकालपट्टी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अकार्यक्षम व्यक्तीस पदावर फार काळ ठेवले नाही. तुकोजी चोर,माणकोजी दहातोंडे आदी व्यक्ती अकार्यक्षमतेमुळे आपापल्या पदावर फार काळ काम करू शकले नाहीत. तर उद्धटपणामुळे नेताजी पालकरासही अल्पावधीत आपले सेनापतीपद गमवावे लागले होते.

**९) धार्मिक सहिष्णुता :**

सर्व धर्मियांप्रती बाळगलेली सहिष्णुता ही महाराजांच्या व्यवस्थापनाचे महत्वाचे वैशिष्ट्य होते. मुस्लीम राज्यकर्ते हिंदुंवर अन्याय, अत्याचार करत होते म्हणून महाराजांनी मुस्लीम धर्मियांवर अन्याय, अत्याचार केले नाहीत. उलट स्वराज्यात सर्वांना आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले. थोडक्यात त्यांनी सर्वांप्रती सर्वधर्मसमभावाचे धोरण राबवले. त्यामुळेच मुस्लीम धर्मीय लोकही स्वराज्यकार्याचा एक भाग झाले.

**१०) अधिकाऱ्यांची गुणवत्तेवर निवड :**

प्रशासनातील अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांची निवड करण्याचा अधिकार छत्रपतींकडे होता. त्यांची निवड करताना इतर कोणत्याही बाबींपेक्षा त्याच्याठिकाणची कार्यक्षमता, गुणवत्ता, स्वराज्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आदी गुणांचा विचार केला जाई. डॉ. बाळकृष्ण म्हणतात, ''महाराजांच्या फौजेतील सैनिकांची निवडही ते स्वत: करत असत.'' कारण यामुळे त्यांना त्याच्या ठिकाणच्या गुणांचे दर्शन होई. तसेच एखाद्या अधिकाऱ्याचे एकाच ठिकाणी गैरसंबंध निर्माण होऊ नयेत म्हणून अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या केल्या जात होत्या.

**११) सर्व जातीजमातींचा राज्यकारभारात समावेश :**

शिवाजी महाराजांनी जात, धर्म, वंश, पंथ याचा विचार न करता सर्वांना आपल्या राज्यकारभारामध्ये सहभागी होण्याची संधी दिली. प्रत्येक जाती जमातींच्या ठिकाणी असलेल्या गुणवैशिष्ट्यांनुसार त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. मराठा, ब्राम्हण, हेटकरी, रामोशी, मांग, भिल्ल, कोळी, भंडारी याप्रमाणे मुसलमान जातीजमातीतील लोकांनाही त्यांनी स्वराज्यकार्यासाठी जुंपले. थोडक्यात, त्यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना आपापल्या कार्यकर्तृत्वाप्रमाणे प्रशासनात स्थान दिले.

**१२) कायद्यापुढे सर्वसमानता :**

शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये जात, धर्म, वंश, पंथ असा भेदभाव न करता सर्वांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. कायदा हा सर्वांसाठी समान असेल असे धोरण त्यांनी राबवले. गुन्हेगार

मग कोणीही असो त्याला माफ नाही, अशी न्यायनिष्ठुरता त्यांनी दाखवली.त्यामुळेच राज्यामध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित होऊ शकले.

**१३) लोककल्याण :**

छत्रपती शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. रयतेची त्यांनी पुत्रवत काळजी घेतली.योग्य शेतसारा आकारला. शेतकऱ्यांना तगाई स्वरुपात सरकारी कर्ज देऊ केले. पाणीपुरवठ्याच्या योजना राबवल्या. संकटप्रसंगी सारा माफ केला. व्यापार वाढीस प्रोत्साहन दिले. यासर्वापाठीमागे जनतेचे कल्याण व्हावे हाच मुख्य उद्देश होता. यादृष्टीने त्यांना बहाल केलेली रयतेचा राजा ही उपाधी सर्वार्थाने सार्थ ठरते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) परगण्याच्या प्रमुखास ............... असे म्हटले जाई.

अ) हवालदार ब) सरहवालदार क) कमाविसदार ड) सुभेदार

२) पंचक्रोशीतील मोठ्या खेड्यास .............. असे संबोधले जाईल.

अ) कसबा ब) मौजा ड) देहे ड) पाडे

३) अष्टप्रधान मंडळातील ........... व ........... वगळता सर्वांना लष्करी कामगिरी अनिवार्य होती.

अ) पंडितराव व सुमंत ब) न्यायाधीश व सुमंत
क) पंडितराव व न्यायाधीश ड) अमात्य व सचिव

४) राज्याचा जमाखर्च पाहणे हे काम ........... चे होते.

अ) सचिव ब) मंत्री क) सुमंत ड) अमात्य

५) परराष्ट्र व्यवहार पाहणे हे काम ........... चे होते.

अ) अमात्य ब) सुमंत क) सचिव ड) मंत्री

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) छ. शिवाजी महाराजांनी म्हैसूर व तामिळनाडू प्रदेशावर सरसुभेदार म्हणून कोणाची नियुक्ती केली?

२) शिवराज्याभिषेकावेळी मंत्रीपदावरती कोण कार्यरत होते?

३) शिवकाळात कृषी उत्पन्नाच्या किती टक्के हिस्सा शेतसारा म्हणून वसूल केला जाई?

४) 'सैन्याद्विना नैव राज्य, न धनं, न पराक्रम' हा विचार कोणत्या ग्रंथात आला आहे?

### १.२.३. मराठा इतिहासलेखनशास्त्र आणि राष्ट्रवादाचा उदय :

इतिहास लेखनकला किंवा पद्धती ही भारतीयांना पाश्चिमात्य लोकांकडून मिळालेली देणगी आहे तसेच एकोणीसाव्या शतकापर्यंत भारतीय लोकांना इतिहास लेखनाची कला अवगत नव्हती असाच समज पाश्चात्त्य विद्वानांमध्ये पसरलेला होता. अर्थात उपरोक्त विधाने अर्धसत्यावर आधारलेली आहेत. कारण आधुनिक दृष्टीकोनातून शास्त्रीय पद्धतीनुसार ज्यास इतिहास म्हणता येईल अशा स्वरुपात भारतीयांनी घडलेल्या घटनांच्या नोंदी केल्या नसल्या तरी त्या घटना लिहून ठेवण्याची एक विशिष्ट पद्धत भारतीयांनी आत्मसात केलेली होती. त्याआधारेच भारतीय लोक गतकालीन घडामोडी लिहून ठेवत होते. भारतात परकीय सत्तांचा प्रवेश होण्यापूर्वीच त्यांनी इतिहास लेखन पद्धतीत बरीचशी प्रगती केलेली होती. याचाच अर्थ भारतीयांना इतिहास लेखन फार प्राचीन काळापासून माहित होते, हे पुढील आढाव्यावरून सिद्ध होते.

- **प्राचीन कालखंड :**

प्राचीन काळचा विचार करता भारतीय लोक इतिहासाला पाचवा वेद मानत होते. म्हणजेच भारतीयांचा प्राचीन इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन किती विशाल होता हे दिसून येते. बाराव्या शतकातील काश्मिरी पंडित कल्हण याने लिहिलेला राजतरंगीणी हे त्याचे उत्तम उदाहरण होय. हा शास्त्रशुद्ध इतिहास ग्रंथच होय. आधुनिक काळातील इतिहासलेखन शास्त्राच्या निकषावर जरी त्याची रचना झालेली नसली तरीही समकालीन कालखंडातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, तत्त्वज्ञान व कला आदी विविध क्षेत्रात लोकांनी केलेल्या प्रगतीची, विकासाची जाणीव अशा प्रकारच्या विविध ग्रंथातून होते. कौटिल्यकृत अर्थशास्त्र हा ग्रंथ तत्कालीन राज्यव्यवस्थेची कारणमीमांसा करतो. रामायण, महाभारत यासारख्या महाकाव्याच्या निर्मितीमधून भारतीयांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक बाबींचे सखोल ज्ञान असल्याचे दिसते. बाणभट्टाचे हर्षचरित्र, विशाखादत्ताचे मुद्राराक्षस, कालिदासाचे रघुवंशम, शाकुंतल, शुद्रकाचे मृच्छकटिक यासारखे अनेक ग्रंथ प्राचीन भारतीय जीवनाची माहिती प्राप्त करण्यासाठी उपयुक्त ठरतात. चरक संहितेसारखा ग्रंथ वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीची माहिती देतो. तर आर्यभट्टचा सूर्य सिद्धांत हा ग्रंथ भारतीयांची विज्ञान क्षेत्रातील प्रगती विशद करतो. उपरोक्त विवेचनावरून भारतीयांची इतिहास विषयक दृष्टी, इतिहास लेखन कला स्पष्ट होते.

- **मध्ययुगीन कालखंड :**

साधारणपणे नवव्या शतकानंतर भारतीयांची इतिहास लेखनाबाबतची जाणीव अधिक प्रगल्भ, विकसित होत गेली. त्याकाळी मुस्लीम राज्यकर्त्यांच्या पदरी असलेल्या इतिहासकारांनी घटनांची केलेली वर्णने अधिक तंतोतंत व सत्याधारित असत. मुघल कालखंडातील इतिहासकार झियाउद्दीन बरनी, अब्दुल हमीद लाहोरी, अबुल फजल यांनी इतिहासलेखनात उल्लेखनीय कार्य केले. मध्ययुगीन इतिहासकारांच्या लेखनांबद्दल प्रो.मोहिबुल हसन आपल्या "Historian of Medieval India" या ग्रंथात म्हणतात की, ''मध्ययुगीन इतिहासकार प्रत्येक घटनेचा कारक परमेश्वर आहे असे मानतात.'' असे असले तरी त्यांचे इतर घटनांकडे दुर्लक्ष झालेले नव्हते. भारतीय इतिहासलेखनावर धर्मशास्त्राचा फार मोठा पगडा होता.अबुल फजलने मात्र

मोगलांचा इतिहास लिहिताना तो धर्मशास्त्राऐवजी तत्त्वज्ञानास जवळचा असल्याचे दाखवून दिले आहे. मुस्लीम प्रभावामुळेच भारतात 'तवारीखा' लिहण्याचा प्रघात सुरु झालेला दिसतो.

● **आधुनिक कालखंड :**

भारतामध्ये शास्त्रशुद्ध इतिहास लेखनाची पद्धती ब्रिटीशांच्या आगमनानंतर सुरु झाली. व्यापारी म्हणून भारतात प्रवेश केलेल्या इंग्रजांनी हळूहळू भारतभर आपली सत्ता प्रस्थापित केली. ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या सूचनेनुसार भारतातील सर्व इंग्रज अधिकाऱ्यांना आपल्या सभोवार घडणाऱ्या घटनांच्या नोंदी करून त्या आवश्यक त्या ठिकाणी पाठवाव्या लागत होत्या. उपरोक्त सूचनेचे इंग्रज अधिकाऱ्यांनी कटाक्षाने पालन केल्याने तत्कालीन भारतीय परिस्थितीची माहिती देणारी शेकडो कागदपत्रे इंग्लडमध्ये प्राप्त होतात. परिणामी ब्रिटीश इतिहासकारांना त्यांच्या भारतातील आगमनापासून ते भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यंत भारताचा सुसंगतवार इतिहास लिहिणे शक्य झाले. ब्रिटीशांनी राजकीय इतिहासाबरोबरच सामाजिक, आर्थिक, धार्मिक बाबींच्याही नोंदी केल्या आहेत. १७८४ मध्ये बंगालमध्ये सर विल्यम जोन्स यांनी एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल ची स्थापना केली. विविध ब्रिटीश अधिकारी व व्यक्तींनी भारतीय संस्कृती, इतिहास, चालीरीती, रूढी परंपरा जाणून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला दिसतो. त्यासाठी आवश्यक असलेली संस्कृत भाषाही परिश्रमपूर्वक आत्मसात केली. पाश्च्यात्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांतून भारतीयांना आपला प्राचीन इतिहास व संस्कृतीविषयी माहिती मिळाली. आता भारतीयांनाही आपल्या गौरवशाली भूतकाळाचा, इतिहासाचा सार्थ अभिमान वाटू लागला.

● **मराठा कालखंड :**

भारतीय लोकांनी विशेषता राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या मराठ्यांनी खूप मोठा इतिहास घडवला असला तरी तो शब्दबद्ध करण्याची फारशी तसदी घेतली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात आदिलशाही, निजामशाही, मुघल, कुतुबशाही आदी सत्तांशी संघर्ष करत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. दरम्यानच्या काळात इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज या परकीय सत्ताही भारतात आपले बस्तान बसवू लागल्या होत्या. त्यांच्याशीही मराठ्यांचे संघर्ष झाले. या सर्व गोष्टींमधून महाराष्ट्रात एक प्रकारची राजकीय जागृती घडून आली. लोकांमध्ये निर्माण झालेल्या जागृतीचा शिवरायांनी स्वराज्यासाठी योग्य उपयोग करून घेतला. परिणामी दीर्घकाळापर्यंत मराठ्यांची सत्ता अबाधित राहिली. अखेर मराठ्यांमधील दुहीचा फायदा घेऊन इंग्रजांनी या सत्तेचा शेवट केला. या प्रदीर्घ काळात घडलेल्या घटनांचे दस्तावेज पुरेशा प्रमाणत उपलब्ध होत नाहीत. त्यामुळेच याकाळातील इतिहासलेखनात फारशी प्रगती झाली नाही. महाराष्ट्रात ब्रिटीशांनी आपली सत्ता स्थापन केल्यानंतर मात्र इतिहासलेखनास चालना मिळाली. इतिहासाविषयी आत्मीयता असणारा मुंबई प्रांताचा गव्हर्नर लॉर्ड माउंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन याला मराठ्यांचा पराक्रम ज्ञात होता. तेव्हा मराठ्यांचा इतिहास सुसंगतवार लिहला जावा अशी त्याची इच्छा होती.त्यामुळेच त्याने जेम्स कॅनिंगहम ग्रँड डफ याची सातारा येथे राजकीय एजंट म्हणून नेमणूक केली. ग्रँड डफला सातारा याठिकाणी जी कागदपत्रे उपलब्ध झाली त्याआधारे त्याने आधुनिक पद्धतीने मराठ्यांचा इतिहास लिहण्याचा प्रयत्न

केला. इ.स. १८२६ मध्ये त्याने "History of the Marathas" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या धर्तीवरच विल्किन्सनने म्हैसूरचा, टॉडने राजस्थानचा, एल्फिन्स्टनने अफगाणचा तर माल्कमने मध्ययुगीन भारताचा इतिहास लिहिला. याच दरम्यान भारतात झालेल्या शिक्षणप्रसारामुळे लोकांच्यात जाणीवजागृती होऊ लागली.आपल्यात असलेल्या कमतरता, उणीवा याची त्यांना कल्पना येऊ लागली. त्याचा परिणाम असा झाला की, पाश्चात्त्य इतिहासकारांनी ज्या दृष्टिकोनांतून इतिहासलेखन केले होते त्यातील उणिवांची कल्पना भारतीय लोकांना आली. अशा जागृत झालेल्या लोकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक काळ, वेळ, पैसा खर्च करून ऐतिहासिक साधनांची जमवाजमव करण्यास सुरवात केली. या साधनांच्या आधारे राष्ट्रवादी दृष्टीकोनातून इतिहासलेखनाची एक परंपरा विकसित झाली. या कार्यात नीलकंठ जनार्धन कीर्तने, मोडक,साने, चिपळूणकर, वि.का.राजवाडे, डॉ. बाळकृष्ण, पारसनीस, वासुदेव खरे, न्या.म.गो.रानडे, गो.स.सरदेसाई, सेतू माधवराव पगडी, वा.सी.बेंद्रे, न.र.फाटक, डॉ.आप्पासाहेब पवार इत्यादींचे मराठ्यांच्या इतिहासासंदर्भातील कार्य मोलाचे आहे. या सर्वांनी कागदपत्रांच्या सहाय्याने आधुनिक इतिहास लेखन पद्धतीच्या आधारे मराठ्यांचा इतिहास लिहिला. या इतिहासलेखानातून स्वत्व हरपलेल्या लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना मूळ धरू लागली.

- **इतिहासलेखनातून राष्ट्रवादाचा उदय :**

इतिहासाविषयी टिप्पणी करताना अमेरिकन इतिहासकार कार्ल बेकर म्हणतात की, इतिहासातील अत्यंत आकर्षक विषय हा इतिहासाचा अभ्यास नसून इतिहासलेखनाच्या इतिहासाचा अभ्यास हा आहे.सतराव्या शतकातील मराठ्यांच्या इतिहासलेखन पद्धतीचा आढावा घेत असताना उपरोक्त विधानाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. अनेक समकालीन बखरकार, कवी, लेखक यांनी मराठ्यांचा इतिहास अत्यंत रंजक पद्धतीने रेखाटला आहे. मुस्लिमांच्या तवारीखांमध्येही मराठ्यांच्या संदर्भातील नोंदी आढळतात. अनेक परकीय प्रवाशांनी आपल्या प्रवासवृत्तांतात मराठ्यांबद्दल काही माहिती लिहून ठेवलेली आहे. पोर्तुगीज क्रोस्मो- द- ग्वार्द, ब्रिटीश इतिहासकार रॉबर्ट आर्म, स्कॉट वेअरिंग, जर्मन इतिहासकार स्प्रेंग्लर यांनीही मराठ्यांची योग्य ती दखल घेतली आहे. महाराष्ट्रात प्रशासन करताना माउंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन, जेम्स कनिंगहम ग्रँड डफ आदी प्रशासकांनी सभोवतालच्या परिस्थितीचा वेध घेत दैनंदिन घटनांच्या नोंदी केल्या. उपरोक्त सर्वांच्या प्रयत्नातून मराठ्यांचा इतिहास स्वकीयांना समजला. असे असले तरी त्या इतिहासातून मराठ्यांच्या सत्य इतिहासाचे दर्शन होत नाही कारण प्रत्येकाने आपल्याला सोयीस्कर होईल अशा दृष्टीकोनातून तो इतिहास लिहला होता.याकाळचा विचार करता सर्वसाधारणपणे इतिहासकार सांगतो तो इतिहास अशी समाजाची धारणा बनलेली होती.मात्र ही धारणा वस्तुस्थितीवर आधारलेली नव्हती. कारण इतिहासकाराने लिहिलेला इतिहास हा सत्यावर आधारलेला आहे की पुर्वग्रहावर आधारलेला आहे हे पाहण्यासाठी इतिहासलेखनशास्त्र पद्धती समजून घेणे गरजेचे ठरते. तेव्हा आपल्या इतिहासाचा शोध आपणच घेतला पाहिजे, आजपर्यंत झालेल्या इतिहासलेखनाचे पुनर्लेखन झाले पाहिजे या दृष्टीकोनातून अनेक एतद्देशीयांनी यामध्ये पुढाकार घेतला.असंख्य संकटाचा सामना करत संदर्भ साधनांचे संकलन केले. त्याआधारे मराठ्यांचा सत्य इतिहास राष्ट्रवादी दृष्टीकोनातून जगासमोर आणला. या इतिहासलेखनामधून

हळूहळू प्रत्येकाच्या मनात आपला धर्म, आपली संस्कृती, आपला प्रदेश, व स्वजन याविषयी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून जिंजी याठिकाणी सन १६९४-९७ याकाळात शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. याच दरम्यान पोर्तुगीज वृत्तांत लेखक क्रोस्मी-द-ग्वार्द याने "Life of the Celebrated Shivaji" या नावाने १६९५ मध्ये महाराजांचे चरित्र लिहिले आणि परकीय भाषेमध्ये शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्याचा पहिला मान त्याने प्राप्त केला. अर्थात ते त्याच्या मृत्यूनंतर सन १७३० मध्ये प्रसिद्ध झाले. ब्रिटीश इतिहासकारात ग्रँड डफने १८२६ साली लिहिलेला "History of the Marathas" हा ग्रंथ आजही मराठ्यांच्या इतिहासावरील संपूर्ण माहिती देणारा आद्य ग्रंथ म्हणून ओळखला जातो. यामध्ये त्याने मराठी सत्तेविषयी आपले विचार मांडले आहेत. मराठी सत्तेच्या उदयासंदर्भात तो म्हणतो की, ''महाराष्ट्रातील वृच्छंखल'' आणि लुटारू वृत्तीचे हिंदू काही काळ दडपले गेले असले तरी यांच्या ठिकाणी सुप्तपणे जिवंत असलेली आग त्यांच्यावर राज्य करणाऱ्या मुस्लीम राज्यकर्त्यांमधील भांडणांनी हडबडून जागी झाली व सह्याद्रीच्या रानात वाळलेले गवत ज्याप्रमाणे पेटावे त्याप्रमाणे हिंदू वाढत्या ज्वालानिशी भडकून उठले आणि दूरचे लोक त्या वणव्याचे आश्चर्य करू लागले. अर्थात मराठ्यांच्या सत्तेच्या उदयासंदर्भातील हा वणव्याचा सिद्धांत वस्तुस्थितीवर आधारलेला नव्हता. तर तो दिशाभूल करणारा होता हे न्या.म.गो.रानडे यांनी सन १९०० साली लिहिलेल्या "Rise of the Maratha Power" या ग्रंथात दाखवून दिला आहे. ते म्हणतात की, मराठी सत्तेचा उदय हा सह्याद्रीत अचानक पेटलेला वणवा नसून तो गेल्या चार पाचशे वर्षापासून विकसित झालेल्या परिस्थितीचा परिपाक होता. तर न.र.फाटक, सदाशिवराव आठवले, सेतू माधवराव पगडी यासारख्या इतिहासकारांनी स्वराज्यस्थापनेचे महान कार्य केवळ शिवरायांमुळे घडले असे ठामपणे सांगितले. रियासतकार गो.स. सरदेसाई यांनीही मराठी रियासतीच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांची जगभरातील महनीय व्यक्तिमत्वाशी तुलना करून शिवरायांचे व्यक्तिमत्त्व राष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यास कसे प्रेरक होते याचे अप्रतिम वर्णन केले आहे. सन १९०६ मध्ये कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी 'क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' लिहून ते केवळ स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्फुर्तीदायी आहे असे नव्हे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही यांसारख्या तत्त्वप्रणालीवर आधारित नव समाजाच्या निर्मितीसाठीही प्रेरक असल्याचे प्रतिपादन केले. बंगाली इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी "Shivaji and His Time, House of Shivaji" यांसारख्या ग्रंथाच्या माध्यमातून मराठ्यांचा राष्ट्रवादी इतिहास रेखाटण्याचा प्रयत्न केला. ते एके ठिकाणी म्हणतात की, ''राष्ट्रनिर्माता म्हणून मान्यता पावणे यासारखे मनुष्याच्या आयुष्यात कोणतेही विधिलिखित असू शकत नाही. नेमके हेच महत्कृत्य शिवाजीने करून दाखवले आहे. शिवाजी झाला नसता तर मराठी माणसांच्या आयुष्याची दिशा वेगळ्याच दिशेने मार्गक्रमण करत गेली असती आणि आजच्या भारताच्या इतिहासाला एक वेगळेच वळण लागले असते, हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही.'' छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या एकूणच कार्याचे वर्णन करताना इतिहासकार त्र्य. शं. शेजवलकर म्हणतात की, ''पण शिवाजीने यापुढे जाऊन हिंदू समाजाचा सुकत असलेला वृक्ष पुनरुज्जीवित केला,ही त्यांची याहून मोठी व

अखिल भारतखंडास अभिमानास्पद कामगिरी घडली असे इतिहासावरून दिसते.यवनी राजांच्या हिंदू प्रजेने परराज्य होऊनही परधर्माचा प्रवेश आपल्या आचरणात, विचारसरणीत, ग्रंथातव शास्त्रात कोठे होऊ दिला नव्हता. पण अनेक शतके ज्या सामाज्याचे वर्तन कासवाप्रमाणे आपले हातपाय व डोके कवचाखाली लपवून सरासरी जिवंत राहण्यासारखे झाले होते,त्याला शिवाजीने मान ताठ करून व हातपाय हालवून निर्भयतेने बदललेली परस्थिती लक्षात घेण्यास उद्युक्त केले. स्वसंरक्षणाचा खात्रीचा मार्ग शत्रूवर चढाई करण्यातच असतो, हे राजनैतिक व लष्करी तत्त्व अमलात आणून शिवाजीने सर्व हिंदू लोकांसमोर ठेवले.''

अशा रीतीने परकीयांनी त्यांच्या दृष्टीकोनातून मराठ्यांचा जो इतिहास शब्दांकित केला त्याला शह प्रतिशह देण्याच्या प्रयत्नातून एतद्देशियांनी जो मराठ्यांचा सत्याधारित इतिहास रेखाटला त्यातून महाराष्ट्रीयन जनतेमध्ये राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) माऊंड स्टुअर्ड एल्फिन्स्टन याने सातारचा पोलिटिकल एजंट म्हणून ........ ची नेमणूक केली.

अ) रॉबर्ट आर्म  ब) ग्रँड डफ  क) स्कॉट वेअरिंग  ड) सर विल्यम जोन्स

२) 'House of Shivaji' हा ग्रंथ ............... यांनी लिहला.

अ) न्या. रानडे  ब) गो. स. सरदेसाई  क) जादुनाथ सरकार  ड) वा. सी. बेंद्रे

३) एशियाटीक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना ............. नी केली.

अ) रॉबर्ट आर्म  ब) ग्रँड डफ  क) एल्फिन्स्टन  ड) सर विल्यम जोन्स

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'Historian of the Medieval India' हा ग्रंथ कोणी लिहला?

२) ग्रँड डफचा 'History of the Marathas' हा ग्रंथ कोणत्या वर्षी प्रसिद्ध झाला?

३) बारगीर व शिलेदार हा कशाचा प्रकार आहे?

४) छ. शिवाजी महाराजांचे परकीय भाषेत प्रथम चरित्र कोणी लिहले?

५) 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ कोणी लिहला?

## १.३ सारांश :

कोणत्याही प्रकारची परिस्थिती अनुकूल नसताना स्वकीय व परकीयांशी सतत संघर्ष करत शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची केलेली स्थापना ही अत्यंत महत्वपूर्ण अशी घटना होती. पिताश्री शहाजीराजे व मातोश्री जिजाबाई यांच्याकडून राजांना राजनीतीचे बाळकडू मिळाले. मावळ

खोऱ्यातील सवंगड्यांना सोबतीला घेऊन त्यांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली.विविध कारणांसह सर्व साथीदारांच्या पराक्रमाने व शिवाजी राजांच्या अलौकीक व्यक्तिमत्त्वाने मराठी सत्तेचा उदय झाला.स्वराज्याच्या माध्यमातून त्यांनी आपल्या रयतेची परकियांच्या शतकानुशतकांच्या गुलामगिरीतून मुक्तता केली आणि लोककल्याणकारी राज्याचा आदर्श घालून दिला.

शिवाजी महाराजांनी दूरदृष्टीचा विचार करून अत्यंत उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था निर्माण केली. मुलकी प्रशासन व्यवस्थेला लष्करी प्रशासन व्यवस्थेचे पाठबळ निर्माण करून उत्तमोत्तम प्रशासन व्यवस्था अंमलात आणली. विविध तत्त्वाधारे राज्यास सर्वधर्मीयांचा पाठींबा मिळवला व त्याआधारे राज्यास बळकटी प्राप्त केली. परिणामी पुढील काळत मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले.

प्राचीन काळापासून भारतीय लोक व त्यांच्या इतिहासाबद्दल परकियांच्या मनात असलेल्या समजाला छेद देऊन अनेक एतद्देशीयांनी मराठ्यांच्या इतिहासलेखनात मोलाचे कार्य केले. एकोणिसाव्या, विसाव्या शतकात मराठांच्या इतिहासासंदर्भात संदर्भ साधनांचे संकलन करून त्याआधारे वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाची एक परंपराच निर्माण झाली. या परंपरेतून झालेल्या इतिहासलेखनातून मराठ्यांच्या मनात आपला इतिहास, संस्कृती, प्रदेश, स्वधर्म व स्वजन याविषयी एक प्रकराची आपुलकीची, राष्ट्रीयत्वाची भावना अधिकच प्रबळ बनत गेली. अशारीतीने शिवाजी महाराजांचा स्वराज्याचा वारसा, त्याच्या व्यवस्थापनाची विविध तत्वे व मराठ्यांसंदर्भात झालेले इतिहास लेखनातून झालेला राष्ट्रवादाचा उदय इत्यादी गोष्टी मराठ्यांच्या सत्तेने भावी पिढीस दिलेला वैभवशाली वारसा होता.

### १.४ पारिभाषिक शब्द व अर्थ :

| | |
|---|---|
| तगाई | : सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज |
| राज्यबंधारणा | : स्वराज्याचा आचारधर्म |
| वस्तुनिष्ठता | : वास्तवता |
| मुलकी प्रशासन | : नागरी प्रशासन |
| इतिहासलेखनशास्त्र | : इतिहास लेखनाचा इतिहास |
| वणव्याचा सिद्धांत | : ग्रँड डफने मराठी सत्तेच्या उदयासंदर्भात मांडलेला सिद्धांत |

## १.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) - अ) न्या. रानडे

२) - क) कवी परमानंद

३) – अ) रायरेश्वराच्या

४) – ड) रामचंद्र पंत अमात्य

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा १६४५ मध्ये केली.

२) आज्ञापत्र हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहला.

३) हिंदवी स्वराज्याची राज्यबंधारणा वा. सी. बेंद्रे यांनी विशद केली.

- **१ स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) – ब) सरहवालदार

२) – अ) कसबा

३) – क) पंडितराव व न्यायाधीश

४) – ड) अमात्य

५) – ब) सुमंत

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) छ. शिवाजी महाराजांनी म्हैसूर व तामीळनाडू प्रदेशावर सरसुभेदार म्हणून हरजी राजे महाडीक यांची नियुक्ती केली.

२) शिवराज्याभिषेकावेळी मंत्रीपदावर दत्ताजी त्र्यंबक वाकणीस हे कार्यरत होते.

३) शिवकाळात कृषी उत्पन्नाच्या ४०% हिस्सा शेतसारा म्हणून घेतला जाई.

४) 'सैन्याद्विना नैव राज्य, न धनं, न पराक्रम' हा विचार शुक्रनीती या ग्रंथात आला आहे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) – ब) ग्रँड डफ

२) – क) जदुनाथ सरकार

३) – ड) सर विल्यम जोन्स

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) Historian of the Medieval India हा ग्रंथ प्रो. मोहिबुल हसन याने लिहला.

२) ग्रँड डफचा 'History of the Marathas' हा ग्रंथ १८२६ मध्ये प्रसिद्ध झाला.

३) बारगीर व शिलेदार हा घोडदळाचा प्रकार आहे.

४) छत्रपती शिवाजी महाराजांचे परकीय भाषेत प्रथम चरित्र क्रोस्मी-द-ग्वार्द याने लिहले.

५) 'मराठा सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ न्या. म. गो. रानडे यांनी लिहला.

**१.६ सरावासाठी स्वाध्याय:**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.(दीर्घोत्तरी प्रश्न)**

१) शिवाजी महाराजांचा स्वराज्याविषयक वारसा स्पष्ट करा.

२) शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापनाची तत्त्वे विशद करा.

३) मराठ्यांच्या इतिहास लेखनातून कशा प्रकारे राष्ट्रवादाचा उदय झाला ते स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)**

१) स्वराज्य संकल्पना.

२) अष्टप्रधान मंडळ.

३) लष्करी प्रशासन

४) मराठा कालखंडातील इतिहासलेखन.

**१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :**

१) कुलकर्णी अ.रा.-मराठ्यांचे इतिहासकार.

२) पवार जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय.

३) पवार जयसिंगराव - शिवाजी व शिवकाल.

४) सरदेसाई बी.एन.- मराठ्यांच्या सत्तेचा उदय.

५) पाटील एन.डी.,- थोरात डी.एस., पवार व्ही. पी.- मराठेकालीन राजनीती, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था.

६) पवार जयसिंगराव (संपा.) छत्रपती शिवाजीमहाराज स्मृतीग्रंथ.

❑❑❑

**घटक –२**

# सामाजिक व धार्मिक वारसा

**(Socio - Religious Legacy)**

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ मराठा काळातील जातीव्यवस्था

  २.२.२ एकीकरणाचे बळ: भक्ती चळवळ

  २.२.३ उत्सव साजरीकरण : वसंतपंचमी, दसरा, गणेशोत्सव

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. मराठाकाळातील जातीव्यवस्था समजून घेता येईल.

२. मराठाकाळातील सामाजिक जीवन समजेल.

३. भक्ती चळवळ समजून घेता येईल.

४. भक्ती चळवळीचे महत्त्व समजेल.

५. मराठा काळातील सण साजरा करण्याच्या पद्धती जाणून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक :

वेदकाळामध्ये भारतामध्ये वर्णव्यवस्था अस्तित्त्वात आली. मौर्य, सातवाहन काळामध्ये भारतीय समाजामध्ये वर्णव्यवस्था कायम रूजली. गुप्तकाळापासून जातीव्यवस्था अधिक मजबूत बनली. जातीपासून

उपजाती बनल्या. सर्व समाज जातीजातींमध्ये विभागला गेला होता. जातीनुसार व्यवसाय केले जात असत. समाजाच्या गरजाही मर्यादित असल्याने व्यवसायही मर्यादित होते. असे असले तरी तत्कालीन खेडी स्वयंपूर्ण होती. जरी समाज जातीजातींमध्ये विभागला असला तरी समाजामध्ये एकी असल्याचे दिसते.

दक्षिण भारतावर झालेल्या इस्लामी आक्रमणामुळे महाराष्ट्रातील यादव सत्ता नष्ट झाली. यानंतर सुमारे तीनशे वर्षे महाराष्ट्र इस्लामी सत्तेच्या वर्चस्वाखाली होता. या काळामध्ये दोन भिन्न संस्कृतींचा परस्परांशी संबंध आला. जेत्यांची संस्कृती, आचार, विचार व परंपरा वेगळी होती. त्यामुळे महाराष्ट्रातील हिंदू समाजाला आपली परंपरा टिकविण्याचे प्रयत्न करावे लागले. यादव सत्तेचा पराभव झाल्याने महाराष्ट्रीय समाजाचा राजकिय आधार तुटला. राजकीय आधार नसल्याने समाजामध्ये एकी टिकविणे गरजेचे होते जर एकी टिकली तरच परंपरा टिकणार होती. ही एकी टिकविण्याचे कार्य भक्ती चळवळीने केले. समाजामध्ये अस्तित्त्वामध्ये असलेल्या जातींमधून निर्माण झालेल्या संतांनी समाजाला भक्तीचा मार्ग दाखविला. समाजातील तळाच्या घटकापर्यंत भक्ती चळवळ पोहचली. यामुळे समाजामध्ये एकता निर्माण होण्यास मदत झाली.

सण समारंभाच्या माध्यमातूनही परंपरा टिकण्यास मदत झाली. मराठयांच्या उत्तरकाळामध्ये जातीय तीव्रता वाढली. राजकीय एकता नष्ट झाली. या घटकामध्ये आपण मराठकालीन जातीव्यवस्था, भक्ती चळवळ व सण उत्सव याबाबत माहिती घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१. मराठा काळातील जातीव्यवस्था :

- **मराठापूर्वकाळातील जातीव्यवस्था**

मराठाकाळातील जातीव्यवस्था पाहण्यापूर्वी मराठाकाळापूर्वीची समाजव्यवस्था पाहणे आवश्यक आहे. वेदकाळामध्ये भारतामध्ये वर्णव्यवस्था अस्तित्त्वात आली. मौर्य, सातवाहन काळामध्ये भारतीय समाजामध्ये वर्णव्यवस्था कायम रूजली. गुप्तकाळापासून जातीव्यवस्था मजबूत बनली. जातीतून उपजाती बनल्या. सहाव्या शतकापर्यंत जातींची संख्या वाढली. त्यामुळे दहाव्या शतकापासून सामाजिक विघटनास सुरूवात झाली. अकराव्या शतकामध्ये ब्राह्मण जातींमध्ये पोटजाती निर्माण झाल्या. ११ व्या व १२ व्या शतकामध्ये ब्राह्मणांच्या काही पोटजाती प्रसिद्धीस आल्याने त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेदभाव सुरू झाला. त्यामुळे फुटीरता वाढली. १३ व्या शतकामध्ये महाराष्ट्रातील ब्राह्मण जातींनी गोत्राऐवजी आडनाव लावण्यास सुरूवात केली.

प्राचीन काळापासून क्षत्रियामध्ये कुळी निर्माण झाल्या होत्या. १२ व्या शतकामध्ये क्षत्रियांच्या ३६ कुळी निर्माण झाल्याची नोंद राजतरंगिणी या कल्हणाने लिहीलेल्या ग्रंथामध्ये नोंद आहे. स्मृतीकाळापासून ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या वर्णसंकरातून अनेक जाती निर्माण झाल्या. अनुलोम व प्रतिलोम विवाहातून अनेक जाती निर्माण झाल्याचे स्मृतीकारांनी म्हटले आहे. यादव काळामध्ये महाराष्ट्रामध्ये जातीजातींमध्ये विषमता व

स्पृश्यास्पृश्य भेद वाढीस लागल्याचे तत्कालीन वाङ्मयीन साहित्यावरून दिसते. खालच्या जातींना गावाबाहेर रहावे लागत असे. उच्च नीचतेच्या कल्पनेमुळे रोटीबेटी व्यवहारावर बंधने पडल्यामुळे प्रत्येक जात अस्तित्त्वासाठी धडपडू लागली. जातीच्या विरोधात वागल्यास बहिष्कृत केले जात असे. यातून वेगवेगळ्याच जातीची निर्मिती होत असे. सामाजिक विषमतेमुळे अर्थिक विषमता निर्माण झाली. त्यामुळे एकीची भावना राहिली नाही.

**● शिवकाळातील जातीव्यवस्था :**

यादव काळामध्ये महाराष्ट्रात असलेल्या सामाजिक परिस्थितीमध्ये शिवकाळामध्ये फारसा फरक दिसत नाही. ग्रामीण जीवनातील निराशा व उदासीनता शिवकाळामध्ये नष्ट झाली. खेडयातील मावळे, हेटकरी यांचा छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंध आल्याने महाराजांना त्यांच्या मूलभूत गुणांची ओळख झाली. मारूतीच्या मंदिरांच्या उदयामुळेही ग्रामीण समाजामध्ये उत्साह निर्माण झाला. या मंदिरामध्ये सर्व जातीजमातींना प्रवेश असल्याने या काळामध्ये एक देवतेची भावना निर्माण झाली. शिवकाळामधील जातीव्यवस्था पुढीलप्रमाणे होती.

**१. ब्राह्मण :**

शिवकाळामध्ये प्रत्येक गावामध्ये किमान एक तरी ब्राह्मणाचे घर असे. ब्राह्मणाकडे परंपरेने कुलकर्णी वतन असे. या व्यतिरिक्त मंदिरांमध्ये पूजा करणे, कथा-किर्तन करणे व पंचांग पाहणे, ज्योतिष सांगणे, सामान्य जनतेला शास्त्रधर्म शिकविणे इ. कामे ब्राह्मणांची होती. लिहीण्या वाचण्यामध्ये ब्राह्मण वर्ग तज्ञ असल्याने स्वराज्यामध्ये कारकूनी कामे त्यांना मिळाल्याने ते पुढे अधिकारीपदापर्यंत पोहोचले. ब्राह्मण जातीमध्ये प्रभू किंवा सारस्वत जातीबद्दल काही वेळा संघर्ष झाला. कोकणामध्ये स्वराज्याचा विस्तार झाल्यानंतर प्रभूंचा संबंध आला. प्रभू हेही लिहीण्या वाचण्यामध्ये तज्ञ असल्यामुळे त्यांनाही स्वराज्यामध्ये मानाची कामे मिळत असत. उत्तर पेशवाईमध्ये ब्राह्मण--प्रभू संघर्ष टोकाला गेला.

**२. क्षत्रिय :**

ग्रामीण भागातील बहुतांश लोक क्षत्रिय असत. त्यांना मराठे म्हणून ओळखले जात असे. शिवकाळामध्ये मराठयांच्या ९६ कुळी अस्तित्त्वात होत्या. मराठे शेती, पशूपालन व लष्करी कामे करीत. साधी राहणीमुळे ग्रामीण जनतेचे नेतृत्त्व मराठयांकडे आले. लढाऊ बाण्यामुळे किल्यांची रखवाली, सैन्याचे नेतृत्त्वाचे काम मराठे करीत. शेती करणाऱ्या मराठयांमध्ये मिरासदार व उपरे हे दोन प्रकार होते. वंशपरंपरेने गावामध्ये शेती करणारे मिरासदार तर खंडाने शेती करणारे उपरे असत. उपऱ्यांपेक्षा मिरासदार सामाजिकदृष्टया उच्च दर्जाचे असल्याने त्यांना मान मिळे. मिरासदार व उपरे प्रकार इतर जातीतही होते.

**३. वैश्य :**

शिवकाळामध्ये या वर्गाचे स्वतंत्र अस्तित्त्व जाणवत नाही. परप्रांतातील लोक महाराष्ट्रामध्ये व्यापार करीत होते. यामध्ये प्रामुख्याने कर्नाटक व गुजरातमधील व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये आपले

स्थान बळकट केले होते. जलमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने व्यापार चालत असे. इंग्रजांना स्वराज्यामध्ये व्यापार करण्यास शिवाजी महाराजांनी परवानगी दिली होती.

**४. शुद्र :**

महाराष्ट्रामध्ये स्वतंत्र शुद्र वर्ग नव्हता. त्याऐवजी समाजाच्या दृष्टीने उपयोगी असणारी बलुतेदारी पद्धत अस्तित्त्वात आलेली होती. बलुतेदारी पद्‌धत ही शिवकालाचे वैशिष्ट्य मानले जाते. सामान्यत: बलुतेदाराची संख्या बारा असे. काही ठिकाणी ती जास्त असल्याचे जाणवते. बलुतेदारांची विभागणी कामाच्या स्वरूपानुसार तीन विभागामध्ये झालेली दिसते.

**१. व्यवसायिक व कारागीर वर्ग :**

या वर्गामध्ये कुंभार, सुतार, लोहार, चांभार, परीट वा न्हावी यांचा समावेश होत असे. यांना समाजामध्ये फार महत्त्व होते.

**२. सेवा देणारा सेवक वर्ग :**

या वर्गामध्ये मांग, महार, तराळ व रामोशी यांचा समावेश होत असे. गावातील प्रत्येक घटनेवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे काम महार करीत असे. निरोप देण्याचे व आणण्याची जबाबदारी तराळाची असे तर गावचा पहारा देणे व गुन्हे शोधण्याचे काम मांग व रामोशी करीत असे.

**३. धार्मिक सेवा करणारा वर्ग :**

या वर्गामध्ये जंगम, गुरव, जोशी, मुलाणी व ठाकूर यांचा समावेश होतो. गावातील सामाजिक व धार्मिक सेवा हा वर्ग देत असे. लावणी, सिंचणी, किंवा शुभकार्याचा मुहूर्त पंचाग पाहून काढण्याचे काम जोशी करीत असे. गुरव गावच्या दैवताची पुजा करीत असे. जंगलामध्ये राहणाऱ्या जमातींचा पुजारी ठाकूर असे. लिंगायतांचा पुजारी जंगम असे. तो बेल वाटण्याचे काम करीत असे. गावच्या कबरस्थानच्या व मशिदीची देखरेख मुलाणी करीत असे. गावच्या खाटीकाचेही तो काम करीत असे. गावच्या बलुतेदारामध्ये त्याला स्थान दिले आहे.

बलुतेदाराबरोबरच अलुतेदारही गावामध्ये असत. आलुतेदारांची संख्या आठरा मानली जाते. ग्रँड डफ यांनी आलुतेदारांच्या यादीमध्ये जंगम, शिंपी, सोनार, माळी, कोळी, डवरी, तराळ, गोंधळी, गोसावी, घडसी, तेली, रामोशी यांचा समावेश केला आहे. आलुतेदाराच्या यादीमध्ये काही बलुतेदारांचीही नावे आहेत. त्यामुळे आलुतेदार व बलुतेदार कोण? याबाबत प्रश्न निर्माण होतो. हे ठरविण्याचा अधिकार गावकऱ्यांचा असावा. बलुतेदारांना गोतसभेमध्ये भाग घेण्याचा अधिकार होता, अलूतेदारांना तो नसे.

- **पेशवेकाळातील जातीव्यवस्था :**

१८ व्या शतकामध्ये छ. शाहूंच्या कारकिर्दीमध्ये पेशव्यांचे महत्त्व वाढले. या काळामध्ये जातीसंस्था मजबुत झाली. या काळामध्ये ब्राह्मण जातीचे वर्चस्व वाढले. हिंदूमध्ये व्यक्ती, कुटुंब, जात आणि धर्म हे

समाजव्यवस्थेतील टप्पे आहेत. कुटुंब किंवा कुलाच्या हाती व्यक्तीचे सुख-दुःख असते. कुलामध्ये गोत्र समाविष्ट असते. सगोत्राशी रोटीबेटी व्यवहाराशिवाय इतर सर्व व्यवहार होत असे. ज्ञातीबांधवाशी रोटीबेटी व्यवहार होत असे. रोटीबेटी व्यवहार जातीपुरताच मर्यादित असे. बाकी सर्व व्यवहार देव, वेद, पुराणे, सण, तीर्थक्षेत्रे व धार्मिक संस्कार सामायिक असत. जरी पेशवेकाळामध्ये वर्ण व जातीव्यवस्था ताठर झाली असली तरी प्रसंगी सर्व जातीतील लोक एकत्र येऊन काही तरी करण्याची परंपरा होती. धर्माने पोटापाण्याचा व्यवसाय प्रत्येक जातीला वाटून दिल्याने व्यवसायावरून संघर्ष होत नसे.

**१. ब्राह्मण :**

प्राचीन काळापासून अध्ययन, अध्यापन, याजन, भजन, दान आणि प्रतिग्रह ही ब्राह्मणाची कामे होती. याजन आणि भजन हे प्रकार काही विशिष्ट प्रसंगी अस्तित्त्वात असे. राहीलेल्या चार कामांना पेशवेकाळामध्ये महत्त्व मिळाले. या काळामध्ये ब्राह्मणांचे महत्त्व वाढले. गोपालनापेक्षा ब्राह्मणप्रतिपालनास महत्त्व मिळाले. सर्व शास्त्रे मुखोद्गत करून समाजाला सांगण्याचे काम ब्राह्मण वर्ग करीत असे. कुळधर्म, कुलाचार, जातीधर्म,जाती आचार, पितृधर्म, प्राण प्रतिष्ठा, सोळा संस्कार, यात्रा, जत्रा यासारखी अनेक कामे ब्राह्मण वर्ग व्यवस्थित पार पाडत असे. सरदार व राजेराजवाडयांमध्ये ब्राह्मणांना विशेष मान असे. मालकाचे क्षेम कुशल रहावे यासाठी ब्राह्मण जपजाप्य, अनुष्ठान व पुजाअर्चा करीत. यातून वाई, माहुली, सांगली, नाशिक, पुणतांबे, व हरिपूर इ. तीर्थक्षेत्रांचे महत्त्व वाढले.

पेशवे ब्राह्मण असल्याने या काळामध्ये ब्राह्मणांना राजकियदृष्टया सर्वोच्च स्थान मिळाले. धर्मभोळेपणामुळे याकाळात जाती-जातीमध्ये समस्या वाढल्या. ब्राह्मण जातीतील पोटजातीमध्ये श्रेष्ठ कनिष्ठत्त्वाचे वाद वाढले.

**२. क्षत्रिय :**

या काळामध्ये राजा क्षत्रिय असला तरी क्षत्रियास दुय्यम स्थान मिळाले. जरी त्यांना वेदाधिकार असला तरी कित्येक शतके अगोदर त्यांच्या या अधिकारास बाजूस केले होते. त्यांचे वैदिक संस्कार लुप्त झाले होते. राज्यकारभारामध्ये मराठा सरदार लढाईच्या बाबतीत स्वतंत्र हालचाल करीत असे परंतु इतर बाबतीत मात्र तसे करू शकत नसे. त्यांचा मुख्य कारभारी ब्राह्मणच असे मराठे साधूसंतांना मान देत असत.

मराठ्यांमध्येही धर्मभोळेपणा होता. युद्धास जाताना किंवा तह करतेवेळी मुहुर्त पाहिला जात असे. लढाईमध्ये अपयश आल्यास मुहुर्त काढणाऱ्यास दोष दिला जात असे. आपला जीवन मार्ग सुकर करण्यासाठी मराठे दानधर्म, अनुष्ठाने, भोजन यासारखी धार्मिक कृत्ये करीत.

**३. वैश्य :**

१८ व्या शतकामध्ये इतर भागातून लोक महाराष्ट्रामध्ये येऊन व्यापार करीत. या काळामध्ये चौल, दाभोळ, कल्याण व भिवंडी ही व्यापारी केंद्रे प्रसिद्ध होती. पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच लोकही व्यापार करीत. पेशव्यांनी व्यापाराला प्रोत्साहन दिले.

४. शुद्र :

१८ व्या शतकामध्ये शुद्रांच्या बाबतीत विशेष बदल झाला नाही. याही काळामध्ये स्वतंत्र असा शुद्र वर्ग नव्हता. त्याऐवजी शिवकाळाप्रमाणे बलुतेदार अलुतेदार पद्धत होती. याकाळामध्ये जाती बंधने जास्त कडक झाली.

● **स्वयंअध्ययन प्रश्न -- १**

**अ. योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. ............. काळामध्ये जाती व्यवस्था अधिक मजबूत झाली.

अ. मौर्य ब. सातवाहन क. गुप्त ड. राष्ट्रकूट

२. परंपरेने कुलकर्णी पद ............. कडे असते.

अ. ब्राह्मण ब. क्षत्रिय क. वैश्य ड. शुद्र

३. ............. हे शिवकाळाचे वैशिष्टय आहे.

अ. मुलुखगिरी ब. वतनदारी क. बुलतेदारी पद्धत ड. व्यापार

४. पेशवे काळामध्ये ............. जातीचे वर्चस्व वाढले.

अ. ब्राह्मण ब. क्षत्रिय क. वैश्य ड. शुद्र

५. पेशवे काळामध्ये ............. ला दुय्यम स्थान मिळाले.

अ. ब्राह्मण ब. क्षत्रिय क. वैश्य ड. शुद्र

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. १२ व्या शतकामध्ये क्षत्रियांच्या किती कुळी निर्माण झाल्या?

२. शिवकाळामध्ये कोणती देवता प्रेरणा देवता होती?

३. छ. शाहू महाराजांच्या काळात कोणाचे महत्त्व वाढले?

४. लढाईमध्ये अपयश आल्यास कोणाला दोष दिला जात असे?

५. गावातील प्रत्येक घटनेवर बारकाईने कोण लक्ष ठेवीत असे?

## २.२.२ एकीकरणाचे बळ भक्ती चळवळ :

भक्तीला हिंदू धर्मामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्याप्रमाणे परमेश्वराला निर्गुण व निराकार स्वरूपामध्ये पुजले जाते त्याचप्रमाणे सगुण व साकार स्वरूपामध्येही पुजले जाते. प्राचीन काळापासून भक्ती परंपरा चालत आलेली आहे. मध्ययुगामध्ये दक्षिणेमध्ये शैव व वैष्णव पंथाचा प्रभाव होता नंतर त्याचा प्रसार

उत्तरेकडे झाला. वेदकाळापासून सुरूवात झालेल्या भक्तीचा विकास भागवतामध्ये झाला. शिव व विष्णू या दोन देवतेभोवतीच भक्तीपंथ केंद्रीत झालेला आहे. नंतर यामध्ये इतर देवतांना समाविष्ट करून घेतले गेले. महाभारत काळापासून शिव ही देवता लिंग स्वरूपामध्ये उदयास आली. वैष्णव देवतेचा उदय वेगळया काळामध्ये शैव पंथापासून झाला. वैदिक वाङ्मयामध्ये विष्णू ही शेतकरी व धनगर समाजाची देवता मानली गेली आहे. ही देवता उत्पादकता व सुपीकतेची देवता मानली गेली आहे. मूळ देवता नारायण ही द्रविडांची मानली गेली आहे. प्रागैतिहासिक काळामध्ये तो सर्प देव होता. शैव व वैष्णव पंथांमुळे भक्ती संप्रदाय बळकट झाला. दोन्ही संप्रदायामध्ये अनेक संत होऊन गेले. शैव संत नयनार किंवा ओडीयार तर वैष्णव संत अलवार म्हणून ओळखले जातात. मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये नाथ, महानुभव, वारकरी, दत्त व समर्थ असे पाच भक्ती संप्रदाय होते.

**१. नाथ संप्रदाय :**

या पंथाचा उदय शिव देवतेपासून झाल्याचे मानले जाते. या अर्थाने शिव या पंथाचा संस्थापक होतो. नाथ म्हणजे मालक व पंथ म्हणजे मार्ग म्हणजे हा पंथ श्रेष्ठांचा मार्ग ठरतो. जरी शिव हा या पंथाचा संस्थापक असला तरी मच्छींद्रनाथ हा नाथ पंथाचा आद्यपुरूष आहे. तो ९ व्या किंवा १० व्या शतकात होऊन गेला असावा. या पंथामध्ये गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, चर्पटीनाथ, चौरंगीनाथ यांनी नाथ पंथाचा प्रचार केला.

**● नाथ संप्रदायाचे साहित्य :**

मच्छींद्रनाथने कौलज्ञाननिर्णय, गोरक्षनाथाने गोरक्षपद्धती, गोरक्ष संहिता व सिधसिद्वांत पद्धती हे ग्रंथ लिहीले. गहिणीनाथाने गहिणीनाथ-संवादू हा ग्रंथ लिहिला. चर्पटीनाथने वर्णरत्नाकर हा ग्रंथ लिहिला. चौरंगीनाथने प्राणसंकली ग्रंथ लिहिला. नागार्जुन हे गोरखनाथच्या पारसनाथी शाखेचे प्रवर्तक होते. नाथ पंथाच्या जोगी कानफाटे व अवधूत या तीन शाखा निर्माण झाल्या.

**● नाथपंथाचे तत्वज्ञान :**

नाथपंथाची विचारसरणी पुढीलप्रमाणे आहे. कुलमार्ग हा शाक्त मार्ग आहे. शिवकुळ म्हणजे शक्ती निर्मितीची इच्छा. ही इच्छा म्हणजे सिसुक्षा आहे. सिसुक्षालाच शक्ती म्हणतात. शक्तीपासून सृष्टी निर्माण होते. शक्तीयुक्त शिव हे अंतिम आहे. शिव व शक्ती यात कोणताही भेद नसून शक्ती ही शिवाची प्रिया आहे. सत्य हे अविनाशी, अद्वैय व अनंत असून ते स्वयंप्रकाशी आहे. ते अनुभवाने जाणवते. जीव व जगत यांचे ऐक्य हे जीवनाचे ध्येय आहे. शक्तीच्या निजशक्ती, पराशक्ती, अपराशक्ती, सूक्ष्माशक्ती व कुंडलिनी शक्ती या पााच अवस्था असून कुंडलिनी शक्ती ब्रह्मांडाच्या मूळाशी आहे.

**● नाथ संप्रदायाचे कार्य :**

९ व्या शतकाच्या प्रारंभी या पंथाचा प्रचार मोठया प्रमाणावर झाला. सुमारे तीन शतके या पंथाला जनमानसामध्ये चांगले स्थान मिळाले होते. पुढील काळामध्ये हा संप्रदाय वारकरी संप्रदायामध्ये विलिन झाला. या पंथाचे कार्य पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. या पंथाने स्त्रिया व दलितांना सामावून घेऊन भेदाभेद मिटविण्याचा प्रयत्न केला. धार्मिक कर्मटपणा व कडक आचार यांना तिलांजली दिली.

२. या पंथाने आपले तत्त्वज्ञान स्थानिक भाषेतून लोकांसमोर मांडले.

३. द्वैत व अद्वैत तत्त्वज्ञानाचा समन्वय साधून आपले तत्त्वज्ञान मांडले.

४. वेदांती व वैशेषिक मधील दोष दाखवून दिले.

**२. महानुभव पंथ :**

१३ व्या शतकामध्ये महानुभव पंथाचा उदय झाला. गोविंदप्रभू उर्फ गुंडम राऊळ हा या पंथाचा मुळपुरूष असून चक्रधर स्वामी त्याचा प्रणेता आहे. संत एकनाथाच्या काळापासून या पंथास महानुभव पंथ म्हणून ओळखले जात असे. महानुभव म्हणजे मोठया तेजानेयुक्त लोकांचा पंथ होय. या पंथाचा प्रसार १६ व्या शतकामध्ये महाराष्ट्र, गुजरात व पंजाबमध्ये झाला.

गोविंदप्रभू किंवा गुंडम राऊळ याचा जन्म काटसरे या सिद्धपूरजवळील गावामध्ये झाला. चांगदेव राऊळ याने त्यास दीक्षा दिली. त्यानंतर तो सिद्धपूरला राहीला. तिथे त्याने सर्पाचे विष उतरविणे, दुरून गाईचे दूध काढणे, पाऊस पाडणे, मेलेल्यांना उठविणे, मुक्याला वाचा देणे इ. चमत्कार करून दाखविले. गोविंदप्रभूने चक्रधराच्या शरीरामध्ये प्रवेश केल्याने तो चक्रधर म्हणून ओळखले जाऊ लागले.

हरपाळदेव हे मूळ नाव असलेला चक्रधर इ.स. ११९४ मध्ये एका लढाईमध्ये मारला गेला. गोविंदप्रभूने हरपाळच्या शरीरामध्ये प्रवेश केला व हरपाळ जिंवत झाला. त्याची पत्नी व हरपाळचे न पटल्यामुळे गोविंदप्रभू रिधपुरला आला व स्वत: चक्रधर नाव धारण केले. त्याने दुसरे लग्न हंसावा या मुलीशी केले परंतु त्याने पुन्हा वैराग्य स्वीकारले. भोगावती नदीच्या काठी दत्तात्रयचे दर्शन झाल्यानंतर त्याने संन्यास घेतला.

● **महानुभव संप्रदायाचे साहित्य :**

चक्रधरने स्वत: कोणताही ग्रंथ लिहिला नाही परंतु केसोबासाने 'सूत्रपाठ' या ग्रंथामध्ये चक्रधरचे अनुभव व वचने लिहिली आहेत. या ग्रंथामध्ये १२५५ सुत्रे आहेत. केसोबासाने 'मूर्तीप्रकाश' हा दुसरा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा परमार्थनिरूपण हा हेतू आहे. म्हाइंमभट्ट याने 'लिळाचरित्र' व 'श्रीगोविंदप्रभूचरित्र' हे दोन ग्रंथ लिहिले. लीळाचरित्रामध्ये चक्रधरच्या लिलांचे तर श्रीगोविंदप्रभूचरित्र या ग्रंथामध्ये श्रीगोविंदप्रभूसंबंधी सर्व कल्पना लिहिलेल्या आहेत. चक्रधरची शिष्या महदंबा हिने धवळे व मातुकी रूक्मिणीस्वयंवर ही मराठीमधील पहिली कथा-काव्ये लिहिली. भास्करभट याने शिशुपाल व उद्धवगीता हे ग्रंथ लिहिले व यातून अनेक गोष्टींचे तात्त्विक स्पष्टीकरण केले आहे.

● **महानुभव पंथाचे तत्वज्ञान :**

सूत्रपाठ हा ग्रंथ महानुभव पंथाचा वेद समजला जातो. हा पंथ द्वैतवादी आहे. या पंथानुसार जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या वस्तू मुख्य असून त्या स्वतंत्र, नित्य, अनंत व अनादी आहेत. जीव बद्धमुक्त,

परमेश्वर नित्यमुक्त, प्रपंच अनित्य आहे. जीव हा अनादि, अविद्या, अन्यथा ज्ञान, जीवत्व व आदिमळ या पाचपिशनी युक्त आहे. परमेश्वर हा नित्यमुक्त असून तो जीवाचा उद्धार करतो. परमेश्वराची भक्ती केली की जीवाला मोक्ष मिळतो.प्रपंचाचे कारणप्रपंच व कार्यप्रपंच असे दोन प्रकार असून तो अनित्य आहे. ईश्वर हा प्रमुख असून ब्रह्म त्याचा भाग आहे. ईश्वर हा अनादि, अव्यक्त, स्वयंप्रकाशी, सर्वव्यापक, नित्य, सर्वसाक्षी, आनंदमय, ज्ञानमय व सर्वकर्ता आहे. महानुभवपंथाने मूर्तीपुजेचा त्याग केला. जातीभेद व स्पृश्यास्पृश्यतेला त्यांनी विरोध केला. शुद्र व स्त्रियांना संन्यास घेण्यास मान्यता होती. या पंथामध्ये आत्मज्ञान, भक्ती व गुरूकृपेला महत्त्व आहे. ईश्वराची ज्ञानामुळे ओळख होते व शब्दज्ञान, अपरोक्ष ज्ञान, विशेष ज्ञान व सामन्य ज्ञान हे ज्ञानाचे चार प्रकार आहेत. भक्तीमार्ग व ज्ञानमार्ग ही मोक्षप्राप्तीचे दोन मार्ग आहेत. महानुभव पंथाने कृतयुगामध्ये हंसावतार, त्रेतायुगामध्ये दत्तावतार, द्वापारयुगात कृष्णावतार व कलीयुगात चक्रधर अवतार असे चार आवतार मानले.

**● महानुभव पंथाचे कार्य :**

महानुभव पंथाने अनिष्ट रूढींवर टीका करून नवीन आचार धर्माचा प्रवाह सुरू केला. ईश्वर प्राप्तीसाठी ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग सांगितला. वैदिक धर्मातील देवता या पंथाने त्याज्य ठरवून परमेश्वराला महत्त्व दिले. या पंथाच्या मते परमेश्वर हा मोठा असून ब्रह्म हा त्याचा भाग आहे. या पंथाने शुद्र व स्त्रियांना मंदिरामध्ये प्रवेश देऊन सर्वांना मोक्षाचा अधिकार दिला.  या पंथाने वैदिक धर्मातील चातुर्वर्णाला विरोध केला.

**४. वारकरी संप्रदाय :**

वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील फार महत्त्वाचा भक्ती पंथ आहे. महाराष्ट्रातील समाजाच्या प्रत्येक घटकाच्या हृदयाची पकड घेतलेला हा पंथ आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागाबरोबरच महाराष्ट्राच्या बाहेरही या संप्रदायाचा प्रसार झालेला दिसून येतो. हा संप्रदाय माळकरी किंवा भागवत संप्रदाय म्हणूनही ओळखला जातो. वारी करणे म्हणजे नियमाने एखाद्या ठिकाणी जाणे होय. या संप्रदायातील लोक प्रत्येक वर्षी नियमाने पंढरपूरला जातात म्हणून या संप्रदायास वारकरी पंथ म्हणून ओळखले जाते. या संप्रदायातील लोक गळयात तुळशीची माळ घालत असल्याने हा संप्रदाय माळकरी म्हणूनही ओळखला जातो. आपले सर्व जीवन भगवंताला म्हणजेच ईश्वराला अर्पण करणारा भक्त म्हणजे भागवत होय. या संप्रदायाने भक्तीला प्राधान्य दिल्याने हा पंथ भक्ती संप्रदाय म्हणून ओळखला जातो. पुंडलिकापासून या संप्रदायाची सुरूवात झाली. या संप्रदायाचे पाच कालखंडामध्ये विभाजन केले जाते.

पहिला कालखंड पुंडलिकपासून ज्ञानेश्वरापर्यंत मानला जातो. दुसरा कालखंड ज्ञानदेवपासून सुरू होऊन नामदेवांच्या अखेरीस संपतो. भानुदासपासून तिसरा कालखंड सुरू होतो तो एकनाथांपर्यंत राहतो. चौथा कालखंड तुकारामांचा आहे. तुकारामांनंतरचा कालखंड पाचवा कालखंड मानला जातो.

पुंडलिकापासून भागवत संप्रदायाची सुरूवात झाली. एका कथेनुसार पुंडलीक हा चैन व विलासाचे जीवन जगत होता. पुढे कुक्कुड स्वामींमुळे त्याच्यामध्ये बदल होऊन ईश्वराचा भक्त झाला. श्रीकृष्ण रूक्मीणीला शोधत दिंडीरवनामध्ये गेले. रूक्मीणीला शोधून परतताना ते पुंडलिकच्या घराजवळ गेले.

त्यावेळी पुंडलिक आपल्या आई वडीलांची सेवा करीत होता. श्रीकृष्णाने पुंडलिकास हाक मारली त्यावेळी आई वडीलांच्या सेवेमध्ये अडथळा येऊ नये म्हणून सेवा होईपर्यंत श्रीकृष्णास वाट पाहण्यास सांगितले व त्याच्याकडे वीट फेकून त्या वीटेवर उभे राहण्यास सांगितले. त्यामुळे तो विटेवर उभा राहिला. विटेवर उभा राहिल्याने विठ्ठल. विठ्ठलाला विठोबा असेही म्हटले जाते. पुंडलीकाच्या एका श्लोकानुसार विठ्ठलाने तिथेच राहून अज्ञानी लोकांचा उद्धार करण्याची विनंती केली आणि ते ठिकाण पुंडलिकपूर म्हणून प्रसिद्ध व्हावे अशी विनंती केली.

● **वारकरी संप्रदायाचे साहित्य :**

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायास खऱ्या अर्थाने चालना दिली. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा गीतेवर टिकात्मक ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये १८ अध्याय असून ९००० ओव्या आहेत. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये अद्वैत सिद्धांत मांडला. जगामध्ये सर्वत्र चित्तत्त्व भरलेले आहे. ब्रह्म हे सत्य असून दृश्य जगत मिथ्या आहे हे स्पष्ट केले आहे.यालाच मायावाद म्हटले आहे. अज्ञान नष्ट झाल्यानंतर ज्ञानामुळे आत्मसाक्षात्कार होतो. माझ्याशिवाय दुसरे काही नाही आत्मतत्त्व वगैरे काही नसून मीच आहे. या अवस्थेस अद्वैतवाद म्हटले जाते. या अद्वैतवादाची चर्चा ज्ञानेश्वरीमध्ये केली आहे. याशिवाय इतर विषयही चर्चिले आहेत.

'अमृतानुभव' या त्यांच्या दुसऱ्या ग्रंथामध्ये १० अध्याय व ८०४ ओव्या आहेत. यामध्ये चिद्वालास सिद्धांताचे सखोल स्पष्टीकरण केले आहे. चांगल्या शब्दांमध्ये दृष्टांत सांगितले आहेत. अमृतानुभवाचे सार 'चांगदेव पासष्ठी' या ग्रंथामध्ये आहे.

ज्ञानेश्वरांच्या समकालीन नामदेव होते.ज्ञानेश्वरांप्रमाणे नामदेवांनी अद्वैतवादाचा पुरस्कार केला. ज्ञानेश्वरांच्या पश्च्यात त्यांनी भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेली. पंजाबमध्ये त्यांना बाबा नामदेव म्हणून ओळखले जाते. नामदेव रहात होते ते भट्टीवाल गाव नामीयाना म्हणून ओळखले जाते. नामदेवांनी २५०० अभंग रचले. त्यांची रसाळ अभंगवाणी मराठी भाषेला व संतवाङ्मयास मिळालेली देणगी आहे. हिंदीमध्येही त्यांनी काही रचना केली आहे, शिख धर्मग्रंथ ग्रंथसाहेबमध्ये त्यांच्या काही रचना समाविष्ट आहेत.

नामदेवाप्रमाणेच वारकरी संप्रदायामध्ये निवृत्तीनाथ, सोपन, मुक्ताबाई, चांगदेव, नरहरी सोनार, चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, जनाबाई यांसारखे अनेक संत होऊन गेले. त्यांनी वारकरी संप्रदायाचा प्रसार केला.

वारकरी संप्रदायाच्या पुनरुज्जीवनाचे कार्य एकनाथांनी केले. त्यांनी पाऊण लाख ओव्या लिहिल्या आहेत. व्यास लिखित 'एकादशस्कंद' या ग्रंथावर 'एकनाथी भागवत' हा टिकात्मक ग्रंथ लिहिला. 'भावार्ध रामायण' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय 'रूक्मीणी स्वयंवर', 'हस्तमलक', 'शुष्काटक', 'आनंदलहरी', 'स्वात्मसुख' ही प्रकरणांचे लेखन केले. त्यांनी शेकडो भारूडे लिहीली.

तुकारामांना वारकरी संप्रदायाचा कळस मानले जाते. त्यांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून वारकरी

संप्रदाय खेडयापाडयापर्यंत पोहोचविला. शुद्र देवतांचे पुजन व हिंसक आचारावर तुकारामाने टिका केली. कर्मकांडापेक्षा भक्ती व वर्णापेक्षा सदाचार श्रेष्ठ आहे असे तुकारामांनी सांगितले. बहिणाबाई या तुकारामांच्या शिष्या वारकरी संप्रदायाच्या अखेरच्या कवयित्री होत्या. त्यांनी ५००० अभंगांची रचना केली.

तुकारामांनंतर निळोबारायांनी वारकरी संप्रदायाची धुरा उचलली. त्यांनी ३३२ श्लोकांची रचना केली. नामस्मरण, संसारामध्ये राहूनही केवळ भक्तीच्या मार्गाने मुक्ती, कर्मकांडास फाटा यामुळे आजही या संप्रदायाची समाजमनावर पकड आहे.

- **वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

वारकरी संप्रदायाचा आद्यप्रणेता म्हणून ज्ञानेश्वरांना मानले जाते. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगताना गीतेचा आधार घेतला. वैदिक परंपरेतील तत्त्वे तशीच ठेऊन साधा व सुलभ भक्तीचा अर्थ सांगितला. परमात्मा अद्वय परमतत्त्व असून त्याच्यामुळे प्रत्येक वस्तू किंवा घटना घडते व शेवटी त्यामध्येच विलीन होते. देव व भक्त दोन नसून एकच आहेत. श्रेष्ठत्त्व मिळविण्यासाठी प्रथम विठ्ठल भक्ती करावी. विठ्ठलामध्ये शिव व विष्णूचे वास्तव्य आहे. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे. त्यामध्ये कोणताही अडथळा येत नाही. कर्मानुसार आचरण करण्यास सत्य अहिंसा व समता यासारख्या गुणांची आवश्यकता असते.

- **वारकरी पंथाचे कार्य :**

वारकरी संप्रदायाच्या कार्यामुळे सामाजिक व राजकिय परिस्थितीला चालना मिळाली. एकनाथांच्या काळामध्ये हिंदू मूस्लीम ऐक्य करण्याचे प्रयत्न झाल्याचे दिसून येतात. तुकारामांनी जनमानसांमध्ये धर्म भावना जागृत केली. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे असे या संप्रदायाने सांगितल्याने समाजातील सर्व जातींमध्ये संत निर्माण झाले. या संप्रदायाने मराठी या लोकभाषेमध्ये साहित्य लिहीले त्यामुळे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान समाजापर्यंत पोहोचले. धर्माला कर्मकांडापाासून मुक्त केले. धार्मिक व नैतिक स्थिती सुधारण्यासाठी वारकरी संप्रदायाने अद्वैत तत्त्वज्ञानाला अधिष्ठान दिले. प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालून वारकरी संप्रदायने कर्मयोग सांगितला. वारकरी संप्रदायाने वेद प्रामाण्य मानले असले तरी बुद्धिप्रामाण्याला आवाहन केले. दया, क्षंमा, शांती, सत्य, अहिंसा ही तत्त्वे देऊन सामाजिक नैतिकता उंचावण्याचा प्रयत्न भागवत संप्रदायाने केला.

**४. दत्तसंप्रदाय :**

भारतावर १४ व्या शतकामध्ये इस्लामी आक्रमणाची तीव्रता वाढली. या काळामध्ये जैन बौद्ध धर्माप्रमाणे इस्लाम धर्माने वैदिक धर्माला आव्हान दिले. अशा वेळी वैदिक धर्म व इस्लाम धर्म यांच्यामध्ये दत्त संप्रदायाने समन्वय साधण्याचे काम केले.

दत्त ही देवता या संप्रदायाची प्रणेती आहे. दत्ताच्या जन्माबद्दल अनेक कथा आहेत. अत्री ऋषी हे ब्रह्माचे मानसपूत्र असून श्री दत्ताचे पिता आहे. दत्ताच्या आईचे नाव अनुसया होते. त्यांना दत्तात्रय, दुर्वास व सोम ही तीन मुले होती. अनुसयेच्या तेजामुळे ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे तीन बालकांमध्ये रूपांतर झाले.

दत्तात्रयच्या हाती तीन्ही देवांचे प्रतिक म्हणून कमंडलू, त्रिशूल व सुदर्शन चक्र आहे. अशा प्रकारच्या अनेक कथा आहेत. अग्नीपुराणामध्ये दत्ताचा एकमुखी व द्विभुजा असल्याची नोंद आहे. मैत्रायणी उपनिषदामध्ये त्रिमुखी दत्ताचा उल्लेख आहे. महानुभव पंथीय एकमुखी व चतुर्भुज दत्त असल्याचे मानतात.

या पंथाचा प्रसार प्रामुख्याने श्रीपादवल्लभ व नृसिंह सरस्वती यांनी केला. श्रीपादवल्लभ यांचा जन्म १४ व्या शतकामध्ये पीठपूर येथे झाला. सुमती व अपलराज हे त्यांचे आईवडील होते. मुंज झाल्यानंतर श्रीपादवल्लभ यांनी काशी, बद्रिकेश्वर यात्रा केली. पुढील काळात गोकर्ण महाबळेश्वर येथे तीन वर्षे व श्रीशैल येथे चार महिने राहिल्यानंतर ते कुरवपूर या कृष्णा नदीच्या काठी त्यांच्या आयुष्याची समाप्ती झाली.

श्री नृसिंहसरस्वती यांना श्रीपादवल्लभ यांना दुसरा अवतार मानले जाते. श्री नृसिंहसरस्वती यांचा जन्म कारंजा येथे झाला. मुंज झाल्यानंतर त्यांना गायत्री मंत्र मिळाला. सर्व तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्यानंतर त्यांनी दत्त संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसार कार्यास प्रारंभ केला

● **दत्त संप्रदायाचे साहित्य :**

सरस्वती गंगाधर यांनी दत्त संप्रदायाचा 'गुरूचरित्र' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये ५३ अध्याय आहेत. यामध्ये श्री नृसिंहसरस्वती यांच्या कार्याची माहिती दिली आहे. दत्त संप्रदायाचा दुसरा ग्रंथ 'दत्तप्रबोध' हा ग्रंथ विठ्ठल बुवा याने लिहिला. यामध्ये जीव जगत जगदिश्वराचा सिद्धांत दत्त अनुसया संवाद स्वरूपात मांडला आहे. टेंबेस्वामी यांनी लिहिलेल्या 'दत्तमहात्म्य' या ग्रंथामध्ये दत्त चरित्र व तत्त्वविवेचन सांगितले आहे. या ग्रंथाशिवाय त्यांनी गुरूचरित्राचे संस्कृतमध्ये भाषांतर केले. दत्तपुराण, दत्तमहात्म्य, शिक्षात्रय, सप्तशती गुरूचरित्र हे ग्रंथ लिहिले. 'गुरूगीता' हा दत्तसंप्रदायाचा १७६ ओव्या असणारा संस्कृत ग्रंथ आहे. जनार्दन स्वामी यांनी दत्तमानससुजा व दत्तनाममहिमा ही दोन अभंग प्रकरणे लिहिली. दत्तात्रय महात्म हा संस्कृत ग्रंथाशिवाय 'अवधूतगीता', 'दत्तात्रयनामस्तोत्र', 'सिद्धदत्तात्रय', 'दत्तात्रय नामावली' व 'गुरूस्तोत्र' हे ग्रंथ दासोपंतांनी लिहिले.

● **दत्तसंप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

वैदिक धर्मावर आधारित या संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे. या संप्रदायाने कर्मकांडावर भर दिला. ब्रह्म हा अखिल, अभंग, निरूपाधिक, निर्गुण, निरामय व अगोचर आहे. ईश्वर हा अदृश्य असून तो चैतन्य स्वरूपाात आहे. आत्मा व ईशवर एक आहे. या संप्रदायाने योगमार्ग व सगुणोपासनेचा पुरस्कार केला.

● **दत्तसंप्रदायाचे कार्य :**

धर्मभ्रष्टतेमुळे ब्राह्मण वर्गाची होत असणारी अवनीती थांबविणे हा या पंथाचा एक हेतू होता. वैदिक परंपरांचे पुनरूज्जीवन घडवून आणणे व हिंदू मुस्लीम एकी करणे हे या पंथाचे स्वरूप दिसते. परकिय सतेच्या विरोधात प्रतिक्रियात्मक आंदोलन करण्याची क्षमता समाजामध्ये नसल्याने श्रीनृसिंहसरस्वतींनी उपासनेद्वारे दोन संस्कृतीचा समन्वय घडविण्याचा प्रयत्न केला. मुस्लीम समाज दत्त संप्रदायाकडे आकर्षित झाला. बिदरच्या शहाने श्रीनृसिंहसरस्वतीचे शिष्यत्त्व स्विकारले. ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रीकरण झाल्यामुळे शैव व वैष्णव यांच्यातील संघर्ष संपला.

● **समर्थ संप्रदाय :**

सतराव्या शतकामध्ये उदयास आलेला समर्थ संप्रदाय वरील सर्व संप्रदायांपेक्षा वेगळा आहे. त्याचे कार्य व स्वरूप इतर संप्रदायापेक्षा वेगळे असल्याचे दिसते. रामदासांनी भागवत संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्वीकारले होते. वारकरी संतानी परमार्थिक जीवनात समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर समर्थ संप्रदायाने समाजास महत्त्वाकांक्षी बनविण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या पराक्रमास आवाहन केले. समर्थ संप्रदायाने वारकरी संप्रदायाच्या आधारे समाजासमोर आपला संप्रदाय मांडला.

रामदास स्वामी यांना समर्थ संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. मूळ नाव नारायण असलेल्या रामदासस्वामींचा जन्म ठोसर घराण्यामध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव राणूबाई व वडीलांचे नाव सुर्याजीपंत होते. नारायण त्यांचा कनिष्ठ मुलगा होता. स्वत:च्या लग्नामध्ये सावधान शब्द ऐकताच नारायणने लग्न मंडपातून पलायन केले. त्याने कठोर तपश्चर्या केली. त्यानंतर त्यांनी समर्थ संप्रदायाची स्थापना केली. हा संप्रदाय रामदासी संप्रदाय म्हणूनही ओळखला जातो.

● **समर्थ संप्रदायाचे साहित्य :**

रामदासांनी 'दासबोध' हा ग्रंथ लिहिला. आपल्या शिष्यांना मार्गदर्शनासाठी लिहीलेल्या या ग्रंथामध्ये अध्यात्माबरोबर राजकारण, कवीत्व कला, यत्न विवेचन, लेखन क्रिया यांचे विवेचन केले आहे. दासबोध ग्रंथातून भक्तीमार्गाने अध्यात्मनिष्ठा सांगितली आहे.

समर्थ संप्रदायामध्ये गंगाधर, कल्याणस्वामी, दिनकरस्वामी, वेणाबाई, गिरीधर, मेरूस्वामी, भीमस्वामी, आत्माराम महाराज इ. रामदासांचे शिष्य होऊन गेले. गंगाधर यांनी 'भक्तीरहस्य' व 'सुगमोपाय', दिनकरस्वामींनी स्वानुभव दिनकर तर वेणाबाई यांनी सीतास्वयंवर ग्रंथ लिहिला. गिरीधरस्वामींनी समर्थप्रताप हे रामदासांचे चरित्राचे लेखन केले. याशिवाय संकेत रामायण, अमृतानुभव, आत्मानुभव, छंदोरामायण, निवृत्तीराम हे ग्रंथ लिहिले. मेरूस्वामीने श्रीरामसोहळा, स्वानंदलहरी, भीमोपदेश व आत्मसाक्षात्कार हे ग्रंथ लिहिले. भक्तलिलामृत हा ग्रंथ भीमस्वामींनी लिहिला.

● **समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान :**

या संप्रदायाने सनातन अध्यात्मज्ञानाचा पुरस्कार केला. जग निश्चल, चंचल व जड या तत्वाने बनले आहे. आत्मा हा चंचल असून पंचमहाभूते जड आहेत. मायेचा संपूर्ण निरास झाला म्हणजे ब्रह्मप्राप्तीचा मार्ग खुला होतो. जे डोळयांना दिसते व मनाला जाणवते ते मायिक असते. ब्रह्म हे निर्गुण, निराकार असून त्याचे शब्दांनी आकलन होत नाही. सद्गुरूमुळेच ब्रह्म प्राप्त होते. रामदासांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. कर्मयोग हे रामदासांच्या विचारांचे वैशिष्टय आहे. कर्मयोगाला प्रयत्नवादाची जोड दिली. जो प्रपंचात यश मिळवितो तोच पुरूषार्थ गाजवू शकतो तोच परमार्थात यशस्वी होऊ शकतो. रामदासांनी तत्कालीन राजकिय व सामाजिक परिस्थितीला अनुसरून आपल्या विचारसरणीला प्रपंचवादी बनविले.

● **समर्थ संप्रदायाचे कार्य :**

ज्ञानेश्वरापासून चालत आलेल्या भक्ती साधनेमध्ये रामदासस्वामींनी स्वत:चे वेगळे क्षेत्र निर्माण केले. प्रपंच व परमार्थ या दोन वेगळया कल्पनांना एकत्र आणले. निवृत्तीमार्गाकडे झुकलेल्या समाजाला प्रवृत्तीमार्गाकडे नेले. समाजाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी देवधर्म, राजधर्म व क्षात्रधर्माला एकत्र आणले. उपासनेबरोबर राजकारणाचा, परोपकाराबरोबर प्रपंचाचा आणि भक्तीबरोबर शक्तीचा संदेश समाजाला दिला. समाजातील निष्काम कर्मयोगाची इहवादाशी सांगड घातली.

प्रतिकार शून्य समाजामध्ये नीतीमत्तेचे उच्च आदर्श निर्माण केले. तपश्चर्या, पर्यटन, भजन, चिंतन व अवलोकन यांच्या माध्यमातून समाजामध्ये आत्मविश्वास जागा केला. सुसंघटीत समाजाच्या निर्मितीसाठी ज्ञानी ब्राह्मण व क्षात्रधर्मीय या पंथाने प्रबुद्ध केले. पारंपारिक जीवनात समानतेचा विचार मांडला. अंतरात्म्याच्या प्राप्तीसाठी कर्मकांडाची आवश्यकता नाही हे त्यांनी सांगितले. सर्वांमध्ये असलेला अंतरात्मा हाच राम असतो हे या संप्रदायाने स्पष्ट केले. महाराष्ट्र धर्माचा उच्चार हे या पंथाचे महत्त्वाचे कार्य आहे. यामुळे क्षात्रधर्माला चालना मिळाली.

इतर कोणत्याही प्रांतापेक्षा महाराष्ट्रातील भक्तीसाधना वेगळी दिसते याचे कारण हे पाच संप्रदाय होत. महानुभव संप्रदाय व्यतिरिक्त इतर संप्रदाय हे वैदिक परंपरेतील आहेत. नाथ संप्रदायाने वैदिक धर्मातील जुन्या परंपरांचा प्रसार केल्याचे दिसते तर वारकरी संप्रदाय हा वैदिक धर्माचे विकसित रूप आहे. वैदिक धर्मातील अद्वैत तत्वज्ञानाला सर्वच संप्रदायांनी प्राधान्य दिले.

● **स्वयंअध्ययन क्रमांक -- २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. नाथ पंथ .............. देवते पासून झाला.

अ. विष्णू    ब. ब्रह्मा    क. शिव    क. कृष्ण

२. महानुभव संप्रदायचा प्रणेता .............. मानला जातो.

अ. कल्याणस्वामी    ब. चक्रधर    क. जनार्दनस्वामी    ड. एकनाथ

३. वारकरी संप्रदायाने .............. ची भक्ती करण्यास सांगितले.

अ. विठ्ठल    ब. शिव    क. हनुमान    ड. ब्रह्मा

४. .............. वर्गाची अवनीती थांबविणे हा दत्त संप्रदायाचा मुख्य हेतू होता.

अ. ब्राह्मण    ब. क्षत्रिय    क. वैश्य    ड. शुद्र

५. .............. यांनी दासबोध ग्रंथ लिहिला.

अ. कल्याणस्वामी    ब. रामदास स्वामी    क. एकनाथ    ड. गंगाधर

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गहिनीनाथांनी कोणता ग्रंथ लिहिला?

२. महानुभव संप्रदायाचा प्रणेता कोण आहे?

३. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ कोणी लिहिला?

४. दत्त संप्रदायाचा प्रणेता कोण?

५. समर्थ संप्रदायाने कोणता धर्म जागृत केला?

## २.२.३. उत्सव साजरीकरण : वसंतपंचमी, दसरा, गणेशोत्सव :

- **वसंतपंचमी :**

माघ शुद्ध पंचमी हा दिवस वसंतपंचमी म्हणून साजरा केला जातो. वसंतपंचमी पासून फाल्गून पोर्णिमेपर्यंत हा सण साजरा केला जातो. भारतामध्ये साधारणत: मकरसंक्रांती नंतर सुर्याचे उत्तरायण सुरू होण्याच्या काळात येणारा हा सण आहे. येथून रंगपंचमी दीड महिना राहते. परंतु यासुमारास हिवाळा संपून उन्हाची तीव्रता किंचित भासत असल्याने रंगपंचमी प्रमाणे याही पंचमीला रंग खेळण्यात येत असे. वसंताचा उत्सव म्हणजे निसर्गाचा उत्सव आहे. हा दिवस सरस्वतीचा जन्मदिवस मानला जातो. त्यामुळे या दिवशी सरस्वतीची पुजा केली जाते. हा दिवस कामदेवाच्या पुजेचाही मानला जातो. कृषी संस्कृतीशीही याचा संबंध दिसून येतो. या दिवशी नवान्न इष्टी असा एक छोटा यज्ञ करतात. शेतात तयार झालेल्या नवीन पीकांच्या लोंब्या घरामध्ये आणून देवाला अर्पण करतात. या दिवशी गणपती, इंद्र, शिव व सुर्य यांची ही प्रार्थना केली जाते. वसंतपंचमी हा आशावादाचे प्रतिक आहे. वसंत ऋतूमध्ये वृक्षवेलींना नवीन पालवी फुटते. त्या पानाफुलंनी बहरतात त्यामुळे हा उत्सव संक्रमण स्थितीचे द्योतक आहे. प्राचीन काळी वसंतऋतूच्या आगमनाच्या निमित्ताने सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव यासारखे उत्सव साजरा करण्याची प्रथा होती. या निमित्ताने नृत्य, संगीत, वनविहार व जलक्रिडा यासारखे मनोरंजनात्मक कार्यक्रम केले जात. भारतात वेगवेगळया प्रदेशामध्ये वेगवेगळया स्वरूपामध्ये साजरा केला जातो. या दिवशी रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून रंग व गुलाल उडवून हा सण साजरा करण्याची प्रथा काही ठिकाणी आहे. उत्तर भारतामध्ये या सणाला फार महत्त्व आहे.

पेशवेकाळामध्ये हा उत्सव उत्साहाने साजरा होत असे. या दिवशी स्त्री पुरूष आपल्या नातेवाईकांना फुलांचा किंवा हिरव्या देठाच्या धान्यांच्या कणसांचा गुच्छ भेट देत. डोक्यावरील पागोटयात तो कणसांचा तुरा रोवत असत. याच दिवशी पिवळया रंगांचे वस्त्र घालण्याची पद्धत होती. फुले, फळे, मिठाई यांचीसुद्धा देवाण घेवाण होत असे. वसंत ऋतूची पुजा हा मुख्य भाग असे.

बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये हा उत्सव सरदारांसोबत साजरा केला जात असे. केसरी रंगाची उधळण केली जात असे. ब्राह्मण, शास्त्री आणि अन्य सन्माननीय व्यक्तींना भोजन, कलावंतीणीचे नृत्य असे उत्सवाचे स्वरूप असे.

● **दसरा :**

हिंदू संस्कृतीमध्ये या सणाला महत्त्व आहे. दिपावलीप्रमाणे हा सण मोठा मानला जातो. अश्विन शुद्ध दशमीला हा सण येतो. अश्विन महिन्याचे पहिले नऊ दिवस नवरात्रीचे असतात. दहावा दिवस दसऱ्याचा असतो. हा दिवस विजयादशमी म्हणून ओळखला जातो. हा सण पराक्रमाचा व पौरूषत्वाचा आहे. या दिवशी सरस्वती व शस्त्रपूजन केले जाते.

हिंदू मान्यतेनुसार या दिवशी महिषासूरमर्दिनीने महिषासूर नामक राक्षसाचा वध केला. प्रभू रामचंद्राने या दिवशी रावणावर स्वारी केली. अज्ञातवासात जातेवेळी पांडवांनी शमीच्या झाडावर शस्त्रे ठेवली व अज्ञातवास संपल्यानंतर याच दिवशी त्यांनी शस्त्रे परत घेऊन त्या झाडाची पुजा केली.

विजया दशमी हा मराठयांचा राष्ट्रीय सण आहे. साडेतीन मुहूर्तापैकी हा एक मुहुर्त आहे. या दिवशी मराठे आपली शस्त्रे स्वच्छ करून घोडयांना धूवून त्यास सजवित असत व त्यावर स्वार होऊन सीमोलंघनास जात असत. लहान मोठ्या गावामध्ये या सीमोलंघनाचा देखावा पाहण्यासारखा असे. लहान मोठी माणसे उंची वस्त्रे व अलंकार घालून सीमोलंघनाच्या मिरवणूकीमध्ये समाविष्ठ होत. शमीच्या झाडाची पुजा करीत असत. शेतातील कणसे तोडून ती सोने म्हणून वाटत. घरी आल्यानंतर मुलांना आया बहिणी ओवळीत. प्रतापगडावरील भवानी देवीच्या उत्सवास शिवाजी महाराजांनी याच दिवशी सुरूवात केली.

भवानीमाता भोसले घराण्याची कुलदेवता असल्याने छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये नवरात्र व दसरा साताऱ्यात मराठी राज्याचा सण म्हणून मोठया थाटामाटाने साजरा होत असे.

पेशवाईमध्येही या सणास महत्त्व होते. पहिले बाजीराव पेशवे दसऱ्याच्या दिवशी पुढील स्वारीच्या योजना आखत. पेशवा आपले सरदार व शिपाई यांच्याबरोबर शहराजवळील लष्करी छावणीमध्ये जात असे. प्रत्येकाजवळ त्याचे निशाण असे, प्रत्येकजण घोडयावर बसत असे. चांगली कपडे घालत असे, हत्यारे स्वच्छ करीत असत. घोडे, हत्ती व ऊंट सजवित असत. सर्व लोक मिरवणुकीमध्ये सामील होत. पेशवा शमीच्या झाडाची पुजा करून शमीची पाने तोडत असे नंतर तोफा व बंदूकांची सरबत्ती होत असे. यासाठी खरेदी केलेल्या शेतातली बाजरी किंवा शेतातली ताटे उपटत असे. सीमोल्लंघनाहून परत आल्यावर पेशवा दरबार भरवित असे व सर्वांना योग्यतेप्रमाणे पोशाख देत असे.

● **गणेशोत्सव :**

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा उत्सव आहे. हिंदू मान्यतेनुसार एकदा पार्वतीला स्नानास जावयाचे होते. परंतु बाहेर थांबण्यासाठी कोणी नसल्याने चिखलाची मूर्ती तयार करून तिला जिवंत करून पहाऱ्यावर ठेवले व कोणासही आत न येऊ देण्यास सांगितले. काही वेळाने भगवान शंकर तिथे आले परंतु त्यांना अडविल्याने शंकराने पहारेकऱ्याचे शिर उडविले. स्नान करून परत आल्यानंतर पहारेकऱ्यास ठार मारल्याचे पाहून पार्वती संतापल्यामुळे शंकरांनी आपल्या गणास कोण्याही प्राण्याचे शिर आणण्यास सांगितले. गणाने हत्तीचे शिर कापून आणले. शंकरांनी ते शिर पहारेकऱ्याच्या धडास लावून जिवंत केले.

पार्वतीचा हा पुत्र गजाचे मुख असलेला असल्याने गजानन म्हणून ओळखला जातो. भगवान शकरांच्या गणांचा परमेश्वर म्हणून गणेश म्हणून गणेश नामकरण झाले. हा दिवस चतुर्थीचा होता. म्हणून ही चतुर्थी गणेश चतुर्थी म्हणून साजरी केली जाते.

या दिवशी भक्तगण पुजा, प्रार्थना व उपवास करून भक्ती करतात. भाद्रपद महिन्यामध्ये गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत (भाद्रपद शु.चतुर्थी ते भाद्रपद शु. चतुर्दशी) हा उत्सव असतो. गणपती ही संघटनेची देवता आहे. ऋग्वेदामध्ये ब्रह्मणस्पती देवतेची स्तुती केली आहे. तिला गणांचा अधिपती म्हटले आहे. या देवतेचा विकास होऊन तिला पुराणकाळामध्ये गणपतीचे स्वरूप मिळाले असे मानतात. हिंदू मान्यतेनुसार गणेशाला आद्यदेवतेचे स्थान दिलेले आहे.

महाराष्ट्रामध्ये गणेश पुजेच्या वेळी म्हटली जाणाऱ्या गणेशाची आरतीची रचना समर्थ रामदासांनी केली आहे. इतिहास संशोधक सेतू माधवराव पगडी यांनी समर्थ व समर्थ संप्रदाय या ग्रंथामध्ये पान नं १०६ वर समर्थ रामदास स्वामींनी इ.स. १६७५ मध्ये महाराष्ट्रातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजन केल्याचे म्हटले आहे. या उत्सवास शिवाजी महाराजांनी १२१ खंडी धान्य दिल्याचे म्हटले आहे.

पेशवेकाळामध्ये पुण्यामध्ये सीमोलंघन, होळी व गणेशोत्सव हे समारंभ सार्वजनिकरित्या मोठया उत्साहाने व भव्यतेने साजरे केले जात असत. या सर्व उत्सवांचा खर्च पेशवे करीत असत. यावेळी खेळ व करमणूकीचे कार्यक्रम होत असत. या निमित्ताने अनेक कलाकार व व्यायामपटू पुण्यामध्ये येत. पेशव्यांच्या महालामध्ये दरवर्षी १० दिवस उत्सव होत असे. यानिमित्ताने गणपती रंगमहाल सजविला जात असे. पेशव्यांची मनसद मध्यभागी असे या मनसदीच्या दोन्ही बाजूस वरिष्ठ अधिकारी, सरदार, शिलेदार व दरबारी उंची वस्त्रे घालून आपल्या योग्यतेप्रमाणे बसत. भालदार, चोपदार यांच्या ललकारीनंतर पेशवे दरबारात प्रवेश करीत. त्यानंतर करमणुकीचे कार्यक्रम होत असत. या कार्यक्राचे स्वरूप किर्तन, गायन, नृत्य व संगीत अशा प्रकारचे असे. कार्यक्रमानंतर सर्वांना मिठाईचे व बक्षीसाचे वाटप केले जात असे. ब्राह्मणांना भोजन दिले जात असे. दहा दिवसांच्या उत्सवानंतर शाडूच्या गणपतीच्या विसर्जनासाठी पेशवे फुलांनी सजविलेल्या नावेमधून नदीमध्ये जात असत. सर्व औपचारिक धार्मिक विधी पार पाडल्यानंतर मूर्तीचे विसर्जन केले जात असे.

- **स्वयंअध्ययन क्रमांक -- २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. ............. हा दिवस वसंतपंचमी म्हणून साजरा केला जात असे.

अ. माघ शुद्ध पंचमी ब. फाल्गून शुद्ध पंचमी क. चैत्र शुद्ध पंचमी ड. वैशाख शुद्ध पंचमी

२. वसंतपंचमी हा ............. देवतेचा जन्म दिवस मानला जातो.

अ. सरस्वती ब. भवानी क. लक्ष्मी ड. कालिका

३. पेशवाईमध्ये वसंतपंचमीला ............ रंगाची उधळण होत असे.

अ. गुलाल ब. केसरी क. पिवळया ड. काळया

४. ............ महिन्याचे पहिले नऊ दिवस नवरात्रीचे दिवस असतात.

अ. अश्विन ब. भाद्रपद क. कार्तिक ड. मार्गशीर्ष

५. गणेशाच्या आरतीची रचना ............ यांनी केली.

अ. कल्याणस्वामी ब. रामदास स्वामी क. एकनाथ ड. गंगाधर

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वसंतपंचमी दिवशी कोणता यज्ञ केला जातो?

२. वसंतपंचमी दिवशी कोणत्या रंगाचे वस्त्र परिधान करीत?

३. कोणता सण पराक्रमाचा व पौरूषात्वाचा आहे?

४. भोसले घराण्याची कुलदेवता कोणती?

५. गणेशोत्सवासाठी छ. शिवाजी महाराजांनी किती धान्य दिले?

## २.३ सारांश :

वेदकाळामध्ये वर्णव्यवस्था अस्तित्त्वामध्ये आली त्याकाळी ती लवचिक होती. परंतु मौर्य व सातवाहन काळामध्ये ती रूज्ली. गुप्तकाळामध्ये जातीव्यवस्था जास्त कडक झाली. मराठा कालखंडामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण अस्तित्त्वात होते. शुद्र वर्णाऐवजी बलुतेदार व आलुतेदार व्यवस्था अस्तित्त्वात आली. पेशवेकालामध्ये ब्रह्मण वर्णाने क्षत्रिय व वैश्य वर्णाची कामे करण्यास सुरूवात केली असली तरी जातीय व्यवस्था मात्र फारच कडक झालेली दिसते. राजकिय व सामाजिकदृष्टया ब्राह्मण वर्णाचे वर्चस्व वाढले. त्यामुळे जातींमध्ये उपजाती निर्माण झाल्या.

दक्षिणेमध्ये इस्लामी आक्रमणामुळे दक्षिणेतील हिंदू सत्तांचे वर्चस्व नष्ट झाले. सर्व समाजामध्ये निराशा पसरली होती. अशा परिस्थितीमध्ये समाजाला मार्ग दाखविण्याचे कार्य भक्ती चळवळीने केले. नाथ संप्रदायाने स्त्रीया व दलितांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला. महानुभव संप्रदायाने स्त्रिया व दलितांना मंदिर प्रवेश व मोक्षाचा अधिकार दिला. वारकरी संप्रदायाने भक्ती चळवळ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविली. अद्यापही ही चळवळ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्याने टिकून आहे. या चळवळीने सामाजिक एकोपा साधण्याचे प्रयत्न केले. दत्त संप्रदायाने ब्राह्मण वर्णाची होणारी अवनीती थांबविण्याचा प्रयत्न केला. या पंथाने हिंदू मुस्लीम समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. या पंथामुळे शैव व वैष्णव संघर्ष थांबला. समर्थ संप्रदयाने समाजाला इतर संप्रदायापेक्षा वेगळे तत्त्वज्ञान दिले. या संप्रदायाने क्षात्रधर्माला चालना दिली.

मराठा कालखंडामध्ये वसंतपंचमी, दसरा व गणेशोत्सव हे सण महत्त्वाचे होते. शिवकाळामध्ये गणेशोत्सवाचे फारसे संदर्भ मिळत नसले तरी समर्थ संप्रदायाच्या साहित्यामध्ये काही संदर्भ मिळतात. पेशवेकाळामध्ये गणेश उत्सवाच्या वेळी विविध प्रकारचे कार्यक्रम होत असत.

पेशवेकाळामध्ये वसंतपंचमी उत्साहात साजरी केली जात असल्याचे उल्लेख मिळतात. यावेळी केसरी रंगाची उधळण केली जात असे. हा सरस्वतीचा जन्मदिवस मानला जात असला तरी याचा कृषीशीही संबंध असल्याचे दिसते. या दिवशी सुर्य, इंद्र, गणपती व शिवाची पुजा केली जात असे.

दसरा हा सण साडे तीन मुहुर्तापैकी एक मानला जातो. तुळजा भवानी ही भोसले घराण्याची कुलदेवता असल्याने भोसले घराण्यामध्ये नवरात्र साजरी केली जात आहे. छ. शाहू महाराजांच्या काळातील काही उल्लेख मिळतात. दसऱ्याच्या दिवशी मोठी मिरवणुक निघत असे. पेशवेकाळातही हा सण मोठया उत्साहात साजरा केला जात असे. हा सण पराक्रम व पौरूषात्वाचा मानला जातो.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

वर्ण संकर -- दोन भिन्न वर्ण एकत्र येऊन निर्माण झालेला नवीन वर्ण

मुहुर्त -- चांगली वेळ

कुलदेवता -- घराण्यामध्ये परंपरेने ज्या देवतेची पुजा केली जाते ती देवता

संप्रदाय -- विशिष्ट धार्मिक विचारांचा/साधनेचा समुह

अवनीती -- अधोगती

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयंअध्ययन प्रश्न -- १**

**अ. योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. क ,  २. अ,  ३. क ,  ४. अ,  ५. ब

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. ३६,  २. महादेव,  ३.पेशव्यांचे,  ४. मुहुर्त काढणाऱ्यास,  ५. महार

- **स्वयंअध्ययन क्रमांक -- २**

**अ. योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. क ,  २. ब,  ३. अ ,  ४. अ,  ५. ब

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. गहनीनाथ-संवादू २.चक्रधर, ३. संत ज्ञानेश्वर, ४. दत्त, ५. क्षात्र

- **स्वयंअध्ययन क्रमांक -- ३**

**अ.योग्य तो पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा**

१. अ , २. अ, ३. ब , ४. अ, ५. ब

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नवान्न इष्टी, २. पिवळया, ३. दसरा, ४. तुळजाभवानी, ५. १२१ खंडी

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ. टिपा लिहा**

१. शिवकालीन जातीय व्यवस्था

२. वारकरी संप्रदाय

३. नाथ संप्रदाय

४. महानुभव संप्रदाय

५. समर्थ संप्रदाय

६. मराठेकालीन दसरा व गणेशोत्सव

**ब. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा**

१. मराठेकालीन जातीय व्यवस्थेची चर्चा करा

२. मराठेकालीन भक्ती चळवळीची माहिती द्या

३. मराठेकालीन वसंतपंचमी, दसरा व गणेशोत्सवाची चर्चा करा.

❑❑❑

## घटक -३

# लोककलेचा वारसा

### (Legacy in Performing Arts)

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ पोवाडा (Povada), भारूड (Bharud)

३.२.२ दशावतार (Dashavtar), चित्रकथी (Chitrakathi)

३.२.३ लावणी (Lavani), तमाशा (Tamasha)

३.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.४ सारांश

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ

**३.० उद्दिष्ट्ये :**

- मराठा कालखंडातील इतिहासाचा वारसा म्हणून विविध कलांचा स्थुलमनाने आढावा घेता येईल.
- प्रेक्षकासमोर सादर केली जाणारी कला म्हणून पोवाड्याची माहिती पाहता येईल.
- भारूडांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन झाले याची माहिती मिळू शकते.
- दशावतारी नाटकांचे कलेचा वारसा जपण्यातील योगदान कसे होते हे लक्षात येईल.
- कोकणातील चित्रकथांची परंपरा समजून घेता येईल.
- लावणी परंपरेचा अभ्यास करता येईल.
- महाराष्ट्रातील लोकनाट्य कलापरंपरा म्हणून तमाशा कलेची माहिती पाहता येईल.

**३:१ प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती ही सांस्कृतिक मुल्ये, परंपरा, कला जोपासणारी संस्कृती म्हणून ओळली जाते. या संस्कृतीत विविध भाषा, प्रांत, रूढी, परंपरा, चालीरीती, सण-उत्सव इत्यादींची वाटचाल परंपरेने होत आली

आहे. मध्ययुगीन कालखंडात विविध काव्य प्रकार बहरात आले. या काव्य प्रकारांनी मराठी माणसांच्या मनावर पकड निमाण केली. संताचे अभंग, भारूडे, गवळणी अशा भक्तीकाव्याबरोबरच शाहीरी काव्याने बहुजन समाजात स्थान मिळविले. पोवाडा, लावणी व तमाशाच्या माध्यमातून सामाजिक चालीरिती, रूढ, परंपरा, व्यक्तीगत व कौटुंबिक जीवन, राजकीय प्रसंग यावर शाहीरांनी रचना केल्या. शाहिरी काव्य हे शिवकाळापासून पेशवेकालखंडापर्यंत वैभवसंपन्नतेकडे गेले. शाहीरांनी रणांगणावर लढाई करणाऱ्या अनेक पराक्रमी वीर पुरुषांचे पोवाडे रचले. तसेच पेशवेकाळात लावणी व तमाशा ही कला लोकप्रिय झाली. तत्कालीन राजकीय अस्थिरता, सामाजिक परिस्थितीचे अस्सल चित्रण या लोककलांच्या माध्यमातून केले गेले. दशावतार, चित्रकथी या कलांच्यामधून पुराण कथा, रामायण, महाभारतातील विविध प्रसंग, धार्मिक प्रसंग प्रेक्षकासमोर सादर केले. थोडक्यात मराठा कालखंडात प्रेक्षकासमोर  सादर केले. थोडक्यात मराठा कालखंडात प्रेक्षकासमोर सादर केल्या जाणाऱ्या पोवाडा, भारूड, दशावतार, चित्रकथी, लावणी व तमाशा या लोककलांचा विकास होत गेला. याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ पोवाडा आणि भारूड :

● **पोवाडा** (Povada) :

मराठी साहित्यामध्ये संत साहित्याने मोलाचे योगदान दिले आहे. मध्ययुगातील संत व पंडितांच्या कविताहून वेगळी व स्वतंत्र चालीचा काव्यप्रकार पोवाड्याच्या निमित्ताने सुरू झाला. याला शाहिरी काव्य किंवा शाहिरी कविता असे म्हटले जाऊ लागले. शाहिरी वाङ्मयामध्ये लावणी व पोवाडा असे दोन प्रवाह आहेत. मराठी भाषेतील पोवाडा हा लोकप्रिय काव्य प्रकार मानला जातो. पराक्रमाचे गीत किंवा 'किर्तिकाव्य' असे पोवाडा शब्दकोशामध्ये पोवाडा या शब्दाचा अर्थ वीराच्या पराक्रमाचे, विद्वानाच्या बुद्धीमत्तेचे तसेच 'सामर्थ्याचे काव्यात्मक वर्णन' असा दिला आहे. शाहिरी काव्याचे विषय संतांच्या काव्यापेक्षा वेगळे प्रधान होते. संतकाव्यामध्ये संतांनी समाजातील लोक जीवनामध्ये अध्यात्म, ईश्वरभक्ती रुजवली. त्यासाठी संतांनी प्रसंग कष्ट, मानहानी सहन करून समाजात मिसळून समाज परिवर्तनाचा ध्यास घेतला. पोवाड्याची प्रेरणा मात्र वेगळी राहिली. शाहिरांनी बहुजन समाजाला मनोरंजनाबरोबरच वीरांच्या पराक्रमांचे विद्वानांच्या बुद्धीमत्तेचे, सामर्थ्याचे गुण कौशल्याचे काव्यात्मक वर्णन करून त्यांच्या कार्यावर स्तुती सुमने उधळली. मराठेशाहीत पोवाडा या काव्यप्रकारास अधिक उत्तेजन व प्रेरणा मिळाली. पोवाड्यामध्ये पराक्रमी वीरांची वर्णने केली आहेत.

पोवाडे गात असताना कोणतेही लिखित स्वरूपाचे नियम नाहीत. तरीही पोवाडे हे वर्णनपर असल्याने शाहीर प्रेक्षकांना आपल्या गायनातून एखाद्या कालखंडात घेऊन जातो. तसेच एखादी लढाई अथवा युद्ध प्रसंग श्रोत्यासमोर उभा करून दाखवित असतो. पोवाड्याची रचना बहुतांशवेळी ऐतिहासिक  घटनांवर झाली असल्यांने पोवाडा हा ऐतिहासिक काव्यप्रकार आहे असे मानले जाते. परंतु पोवाड्यामध्ये शाहीरांनी ऐतिहासिक विषयाबरोबर अन्य प्रकारचे विषयावरही पोवाडे लिहिले आहेत. इतिहासातील घटनाबरोबर पौराणिक कथा, घटना प्रसंग, विविध स्थळांचे वर्णन, देवदेवतांची चरित्रे, सामाजिक समस्या अशा विषयांवरही पोवाड्याची निर्मिती झालेली आढळते.

● **पोवाड्यांची परंपरा :**

पोवाड्यांची उत्पत्ती शोधत असताना पोवाड्याची रचना वैदीक कालखंडात झाली असावी असे दिसते. कारण 'प्र+सुती-प्रशस्ती = ठासून स्तुती करणे म्हणजे पोवाडा गाणे'' अशी कल्पना प्राचीन काळातील आर्य संस्कृतीत असल्याचे आढळते. 'पवाडणे', 'पवाडा, 'कडाका' असे अनेक प्रतिशब्द 'पोवाडा' साठी वापरले गेले आहेत. पौराणिक ग्रंथामध्ये किर्तीकाव्य गायले जात होते हे किर्तीकाव्याचे रूप बहुतांशी पोवाड्याशी मिळते जुळते होते. यामुळे प्राचीन कालीन अनेक धर्मग्रंथ व वाङ्‌मयामध्ये किर्तीकाव्याचे उल्लेख मिळतात. याचाच अर्थ पोवाड्यांचा पुर्वेतिहास प्राचीन कालीन परंपरेशी जोडला गेला. पुढे मध्य युगामध्ये यादव कालखंडामध्ये अनेक 'भाट' राजवाड्यात येत असत. या 'भाट' मंडळीनी आपल्या आश्रयदात्यांच्या पराक्रमाचे वर्णन करून रचना केल्या. याच भाटांचे कार्य पुढे मराठेकालखंडात शाहिरांनी घेतले. दरम्यानच्या काळात राजस्थानातून आलेल्या अनेक भाटांनी हिंदी भाषेतून 'यशोगान' रचना केल्या असल्या पाहिजेत. कारण त्यांचेही उल्लेख मिळतात. भाट आपल्या गायनातून राजाची स्तुती/प्रशंसा करतो तर शाहीर पोवाड्यातून राजांच्या पराक्रमाचे प्रसंग उभे करत असत. परंतु शाहीरांनी पोवाड्यातून समाज प्रबोधनही केले. शिवकाळातील मोजकेच पोवाडे उपलब्ध आहेत. पेशवेकाळ व पुढे आधुनिक काळात पोवाड्यांच्या परंपरेमध्ये बदल होत गेले.

● **पोवाड्याचे स्वरूप :**

पोवाडा हे एक कथाकाव्य आहे. कारण पोवाड्यांची रचना गद्यसदृश्य वाक्यांची, प्रवाही व स्वैरपदयात्मक असते. शाहीरांनी केलेल्या रचनेमध्ये बोलीभाषेतील जिवंतपणा, कथानकाचा ओघ व लयबद्धता असल्यामुळे श्रोतावर्ग आकर्षित होतो. पोवाडा हे एक दृकश्राव्य माध्यम आहे. पोवाड्यातील चरण गात असताना ते आठ-आठ मात्रामध्ये किंवा कधी कधी चार चार मात्रांच्या आवर्तनात गायिले जाते. पोवाड्याच्या कथाविस्तारासाठी एका-एका पदबंधनाला 'चौक' असे म्हटले जाते. एका पोवाड्यात किती चौक असावेत. याबाबत काही निश्चित संहिता नाही. तसेच चौकाच्या रचनेत असलेल्या ओळीची संख्याही कमी अधिक असते. पोवाडा हा दीर्घस्वरूपाचा काव्य प्रकार असल्याने पोवाड्याचा विषय व त्याच्या विस्ताराप्रमाणे दहा ते पंधरा चौकांचे पोवाडे तर कधी चारचौकांमध्येही पोवाड्याची रचना केली जाते. पोवाड्याने मराठी जनमानसावर प्रचंड मोहिनी घातली आहे. मराठी माणसाला टाळ-मृदंगाइतकेच डफ व तुणतुण्याचे वेड आहे. पोवाड्यातून शाहीरांनी महाराष्ट्रातील लोकांचा स्वभाव, चालीरिती, परंपरा त्यांचे गुण दोष, विचार, स्वाभिमान, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकला आहे. तसेच पोवाड्यातून तत्कालीन राजकीय परिस्थिती मराठी राज्यकर्ते, त्यांच्या जीवनातील प्रसंग, लढाया, त्यांनी केलेली मुलुखगिरी, शत्रुशी दिलेला लढा इत्यादी अनेक घटनांचा समावेश केलेला दिसतो. उदा. अज्ञानदासाने लिहिलेल्या अफजलखान वधाच्या पोवाड्यात विविध प्रांतांचे, स्थळे व किल्ल्यांचे उल्लेख आढळतात.

संपूर्ण पोवाड्याच्या रचनेमध्ये प्रथम देवदेवतांना वंदन करून नंतर पोवाड्याचा मुख्य विषय व प्रसंग यांचे कथानिवेदन केले जाते व ते कथानिवेदन फुलविण्यासाठी शाहीर मुख्य विषयातील घटना, प्रसंग अथवा व्यक्ती विषयी अतिशोयोक्त शब्दाचा वापर करत असतात. पोवाड्याच्या शेवटी स्वत:चे नाव सांगून पोवाड्याचा शेवट केला जातो.

**● पोवाड्याचा कालखंड :**

आज उपलब्ध असलेल्या पोवाड्यानुसार त्याचे तीन कालखंड पडतात. पहिल्या कालखंडात मराठा काळातील सात पोवाडे आहेत. उपलब्ध पोवाड्यामध्ये छ. शिवाजी महाराजांच्या काळातील पोवाडे जुन्यात जुने आहेत. त्यापैकी शिवाजी महाराजांवर दोन, तानाजी मालूसरे यांच्यावर एक, बाजी पासलकरांचा एक असे आहेत. तसेच छ. शाहूंच्या काळात शाहूच्या मृत्यूचे दोन व बाजीरावासंबधी तीन पोवाडे रचले आहेत. पेशवे कालखंडात पानिपतच्या लढाईपासून (१७६१) आष्टीच्या लढाईपर्यंतच्या (१८१८) पोवाड्याचा समावेश केला आहे. उपलब्ध पोवाड्यातील अर्ध्याहून अधिक पोवाडे सन १७६१ ते १८१८ या काळात लिहिले गेले आहे. हा कालखंड शाहिरांसाठी बहराचा कालखंड मानला जातो. तिसऱ्या कालखंडात मात्र पोवाडा रचनेस उतरती कळा लागल्याचे दिसते. कारण या काळातील पोवाड्यांच्या रचनेमध्ये दु:ख, राग, वैताग व भीतीचा आवेश असे संमित्र पडसाद दिसतात. त्याचे कारण म्हणजे मराठ्यांचे राज्य लयास गेल्याने त्याबाबतची करूणा व हळहळ पोवाड्यामध्ये दिसून येते. तर काही शाहीरांनी ब्रिटीशांची स्तुतीसुमने आपल्या रचनेतून गायला सुरूवात केली होती. उपलब्ध असलेल्या पोवाड्याची संख्या अंदाजे ३०० च्या आसपास होती. यातील दीडशे पोवाडे पेशवे कालखंडात रचले गेले आहेत. मात्र आधुनिक काळात विशेषत: पेशवाईच्या ऱ्हासानंतर पोवाड्यांचे महत्त्व कमी झाल्याचे दिसते. याचा परिणाम म्हणून पोवाड्यांची निर्मितीही थंडावली.

**● मराठे कालखंडातील पोवाड्याची वाटचाल / विकास :**

पोवाड्यामध्ये इतिहासातील घडलेल्या घटना-प्रसंगांची कलात्मक रितीने मांडणी करून त्यामध्ये काही अतिशोयोक्त व काल्पनिक घटनांची भर घालून पोवाड्याची रचना केली जात असे. यामध्ये युद्ध प्रसंगाचे वर्णन मोठ्या संख्येने येत होते. यामुळे शाहीरांनी अशा युद्ध प्रसंगाला भाव-भावनांचा आविष्कार देवून त्यामध्ये लय निर्माण केली. पोवाड्यामध्ये वीर पुरुषांचे धैर्य, प्रचंड साहस, प्रसंगी प्राणाची पर्वा न करता दाखविलेला अचाट पराक्रम याप्रसंगाचे शाहीरांनी चित्रण केलेले आढळते. अशा प्रकारच्या वीर पुरुषांचे चित्रण करीत असताना बऱ्याच वेळा त्यामध्ये अतिशोयोक्ती असते. तरी सर्वसामान्य लोकांना ते अतिरंजित वाटत नाही.

शिवकाळ व पेशवे काळात पोवाड्यांच्या रचना या मराठ्यांच्या कर्तबगार राज्यकर्त्याबरोबर तत्कालीन पराक्रमी शूर सरदार हे पोवाड्यांचे नायक किंवा प्रमुख पात्र बनलेले दिसतात. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापना केल्यामुळे तत्कालीन मराठेशाहीत चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले. छ. शिवाजी महाराजांनी एक-एक विजय संपादन करीत स्वराज्य विस्तार सुरू केला. याचे वर्णन शाहीरांनी पोवाड्यामध्ये केले आहे. मानवी यशाचे गुणगान व एखाद्या रोमहर्षक संघर्षाचे वर्णन हे पोवाड्याचे मुख्य विषय राहिले आहेत. तसेच यशाबरोबर अपयशाचे, अधोगतीचे काही प्रसंग अतिशय करून अंत:करणाने शाहीरांनी रचना केली आहे. शिवकालातील पहिला उल्लेखनीय व उपलब्ध पोवाडा अग्निदास किंवा अज्ञानदास याने सन १६५९ साली 'अफजलखान वध' या प्रसंगावर मराठीतील सर्वात जुना (आद्य पोवाडा) लिहिला. अफजलखान वदाचे रोमांचकारी वर्णन अज्ञानदासाने या पहिल्या वहिल्या पोवाड्यात केले आहे. छ. शिवाजी महाराजांच्या जीवनातील सिंहगडच्या प्रसंगावर तुळशीदास या शाहीराने पोवाडा रचला. त्यावेळी आपल्या पोवाड्यातून तुळशीदास तानाजी मालुसरे बाबत माहिती लिहितो.

*''स्वयंवर बाळाचे मांडिले। काढल्या पंचमीच्या हळदी*
*काढले षष्ठीचे लगीन। लगीन बाळाचे मांडिले।*
*आली सिंहगडाची कामगिरी।''*

अशा प्रकारच्या गद्यात्मक वर्णनातून त्यावेळचा प्रसंग व वस्तूस्थितीचे वर्णन शाहीराने केले आहे. छ. शिवाजी महाराज व तत्कालीन सरदार यांच्या दरबारी अक्षित असणारे अज्ञानदास, तुलसीदास, यमाजी यासारख्या शाहीरांनी पोवाड्यांच्या रचनामध्ये मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्रात फार पूर्वीपासून 'गोंधळ' या गायनामध्ये देवदेवतांच्या पराक्रमाचे वर्णन केले जात होते. याच 'गोंधळी' लोकांनी छ. शिवाजी महाराजांना यश मिळावे म्हणून देवीला विनवणी करणारी कवने रचिली. यातूनच पोवाडा हे शाहीरी काव्य विकसित झाले. तुलसीदासाने लिहिलेल्या सिंहगडच्या पोवाड्यात देवीच्या कृपेचा उच्चार वारंवार झाला आहे. छ. शिवाजी महाराज व छ. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याचे आसन अस्थिर झाले, अराजकता निर्माण झाली. यामुळे काहीकाळ पोवाड्यांची निर्मिती खुंटलेली दिसते. छ. संभाजी महाराजांच्या दरबारात मोहनलाल व मतिराम नावाचे दोन भाट असल्याचे उल्लेख मिळतात.

छ. शाहू महाराजांच्या (१७०८) काळापासून पेशव्यांच्या अस्तापर्यंत पोवाडा या शाहीरी काव्याला चांगले दिवस आले होते. छ. शाहू महाराजांच्या कालखंडातील पाच ते सहा पोवाडे उपलब्ध आहेत. पेशवाई कालखंडात पोवाड्यांची रचना मोठ्या प्रमाणावर झाली या काळातील पोवाड्याच्यामध्ये वीरांच्या पराक्रमाबरोबर विलासी जीवनाची माहितीही दिलेली आहे. बाजीराव सेखोजी आंग्रे, उभईच्या लढाईचा त्रिंबकराव दाभाडे यांच्यावरील मल्हारदासाचा पोवाडा, बाजीरावाच्या मृत्यूवरील त्रिंबक साळीचा पोवाडा अशी काही शाहीरी रचना करण्यात आल्या होत्या. मात्र उत्तर पेशवाई कालखंडात शाहीरी काव्य परंपरेत 'कलगीतुरा' ही परंपरा विकसित झाली. या परंपरेत अनेक शाहीरांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यामध्ये अनंत फंदी, परशराम रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, होनाजी बाळा या शाहीरांनी दिलेले योगदान पुढीलप्रमाणे -

**१) अनंत फंदी :**

मुळचा संगमनेरचा असणारा अंनत फंदी याची दुसऱ्या बाजीराव बरोबर मैत्री होती. यामुळे त्याने आपल्या काव्यात बाजीरावाची भरपूर स्तुती केली आहे. तो स्वत: जवळ असणाऱ्या कवित्वाच्या बळावर शाहीर बनला होता. यामुळे तो पेशव्यांचा दरबारी कवी म्हणून ओळखला जाता असे. होनाजी बाळाने अनंत फंदी म्हणजे कवनाचा सागर किंवा मोठमोठ्या राज्यांमधी महशूर। जगजाहीर चारी तर्फा। असे म्हटले आहे. अनंत फंदीने सात पोवाडे व लावण्या रचल्या. त्यामध्ये खर्ड्याची लढाई, यशवंत होळकर, फत्तेसिंग गायकवाड इत्यादी विषयावर त्यांचे पोवाडे आहेत.

**२) परशराम :**

तत्कालीन राजकीय परिस्थितीचे निर्भिडपणे चित्र रंगवणारा शाहीर म्हणून परशरामला ओळखले जाते. त्याचा जन्म सिन्नर तालक्यातील वावी गावी एका शिंप्याच्या पोटी झाला. विठ्ठल भक्ती व अध्यात्म विचारात रंगलेला

हा शाहीर बाजीराव दुसरा याच्या मर्जीतला होता. त्याने आपल्या शाहीरीतून राघोबादादा व बाजीराव दुसरा यांची स्तुती केल्यामुळे बाजीरावने त्यास एक इनाम (जहागीर) दिले. परंतु त्याने अतिशय स्वाभिमानाने नाकारले. परशरामाने वीरपराक्रमाबरोबर देशस्थिती व समाजस्थितीपर पोवाडे लिहिले आहेत. त्यांनी मल्हारराव होळकर, फत्तेसिंह गायकवाड, मुंबई बंदर व इंग्रजांच्यावर पोवाड्यांची रचना केली.

**३) रामजोशी :**

मुळचे सोलापूरचे असणारे रामजोशी एक पंडीत कवी व शाहीर म्हणून ओळखले जातात. त्यांचे संस्कृत भाषेवर प्रभुक्त होते. संस्कृतच्या अभ्यासामुळे त्याच्या कवनात शृंगाररस भरलेला असे. त्यांच्या 'ब्राह्मणराज्य जोरावर' या पोवाड्यात वैभवशाली पुणे शहराचे वर्णन केले आहे. तसेच शुक्रवार वाड्याचा पोवाडा, सन १८०२ च्या मोठ्या दुष्काळाचा पोवाडा त्याने रचला होता.

**४) प्रभाकर :**

नाशिक जिल्ह्यातील गंगापूर या ठिकाणी प्रभाकर जनार्दन दातार यांचा जन्म झाला. त्यांनी एकूण १३ पोवाड्यांची रचना केली. त्यापैकी सवाई माधवरावांवर तीन, दुसऱ्या बाजीरावावर दोन, पेशवेवंशाचे वर्णनपर दोन व बाकीचे पोवाडे राघोजी आंग्रे, नाना शंकरशेठ, पेसानजी शेट इत्यादी व्यक्तींवर रचले गेले. सवाई माधवरावांचा रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई, सवाई माधवरावांचा मृत्यू, दुसऱ्या बाजीरावाची विलासी कारकीर्द या सर्व घटना या शाहीराने पाहिल्या असल्याने या घटनांचे प्रतिबिंब त्याने आपल्या पोवाड्यात रचले आहे. प्रभाकरांनी लिहिलेल्या पोवाड्याची रचना, विस्तृत, तपशीलवार व सुसंगत अशी आहे.

**५) सगनभाऊ :**

धर्माने मुसलमान असणारा सगनभाऊ मुळचा जेजुरी गावचा होता. मात्र संपूर्ण जीवन पुण्यात गेले होते. तेथे तो शिकलगारीचा व धारलावण्याचा व्यवसाय करत होता. दुसऱ्या बाजीरावाच्या जीवनावर त्यांनी दोन पोवाडे रचले होते. खडकीच्या लढाईवरील त्यांचा पोवाडा प्रसिद्ध आहे. कारण या पोवाड्यातून मनाला चटका लावणारी रचना करताना सगनभाऊ म्हणतो, ''दळणासारखे किडे रगडले रडती नटनारी। लेकराला माय विसरली कसा ईश्वर तारी।।'' तसेच सातारा छत्रपतीच्या दरबारी असताना त्यांने 'पानिपतचा पोवाडा' रचला तसेच छत्रपती प्रतापसिंहावर दोन पोवाडे रचले होते.

**६) होनाजी बाळा :**

पिढीजात शाहिरी करणाऱ्या घराण्यात होनाजींचा जन्म झाला होता. त्याचे पूर्ण नाव होनाजी सयाजी शिलारखाने असे होते. अर्थपूर्ण सुगम व सुरेल रचनेसाठी होनाजी प्रसिद्ध होता. होनाजीने पोवाडे लिहिले. परंतु ते फारसे प्रसिद्धीला आले नाहीत. त्यांनी खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा, दुसऱ्या बाजीरावावरील दोन-तीन पोवाडे, खडकी व आष्टीच्या लढाईचे वर्णन करणारे पोवाडे इत्यादी पोवाडे लिहिले. होनाजी बाळाना पोवाड्यापेक्षा लावणीच्या निर्मितीमध्ये अधिक रस वाटत असे.

अशा प्रकारे वरील शाहीरांनी उत्तर पेशवाईच्या कालखंडात प्रचंड मोठ्या प्रमाणात पोवाडे रचले. याच काळात अनेक शाहीर पोवाडे रचनेकडून लावणीच्या रचनेकडे वळलेले दिसतात. कारण याच शाहीरांनी अनेक बहारदार लावण्याचीही रचना केल्याचे आढळते. यामुळे या काळात लावण्या, तमाशा या लोककला प्रसिद्धीला येऊ लागल्या याचा प्रभाव पोवाड्यावर दिसून आला. उत्तर पेशवाईकाळात पोवाड्याचे चौक हे कमी असत. म्हणजे आकाराने लहान पोवाडे रचले गेले तरीही अशा पोवाड्याची रचना बांधीव, अर्थगर्भ व सुरेल असल्याचे आढळते.

पेशवेकालखंडानंतर ब्रिटिश राजवटीतही स्वातंत्र्य चळवळीत नेतृत्व केलेल्या व्यक्तींवर पोवाडे रचले गेले. याकाळातील पोवाड्यांची रचना व शैलीही वेगळी दिसते. कारण यामध्ये देशप्रेम, शौर्य, निष्ठा, जिद्द यासारख्या अनेक गुणांचा समावेश पोवाड्यांच्या रचनेमध्ये केला होता. आधुनिक काळात स्वातंत्र्य चळवळ, दलित वर्गाची जागृती, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, स्वातंत्र्यानंतर देशातील निवडणूका, पक्ष, प्रचारासाठीचे पोवाडे रचले गेले. या पोवाड्यांच्या रचनेमध्ये अमर शेख, आण्णाभाऊ साठे, वसंत बापट, शाहीर साबळे इत्यादी शाहीरांनी पोवाड्यांच्या रचना केल्या.

**● भारूड :**

महाराष्ट्रातील लोककलांना प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या लोककला आजही अखंडपणे लोकप्रिय असणारी कला म्हणून भारूडांकडे पाहिले जाते. भारूड हा मराठी वाङ्मयातील एक काव्यप्रकार आहे. ज्याची रुपकात्मक स्वरूपात रचना केली जाते. मराठी वाङ्मयातील तत्त्वज्ञान व अध्यात्म अतिशय सोप्या भाषेत म्हणजे समाजात वावरणाऱ्या व दैनंदिन आपल्या संबधात असणाऱ्या लोकभूमिकामधून आणि साध्या साध्या रुपकामधून सर्व सामान्य पर्यंत पोहोचविण्याचे काम भारूडानी केले आहे. समाजातील सर्वसामान्य माणसाला वेदातील तत्त्वज्ञान समजणार नाही. भारूडातील विविध विषय तो आवडीने ऐकेल अशा प्रकारची रचना भारूडांमधून केली. अनेक संतांनी सामाजिक जागृती व्हावी म्हणून भारूडांच्या रचना केल्या. यामध्ये संत ज्ञानेश्वरापासून संत नामदेवापर्यंत व पुढे एकनाथानंतर संत तुकाराम, रामदास यांच्या पर्यंत सामाजिक विषय घेऊन भारूडे रचली गेली. परंतु संत एकनाथांनी ज्या भारूडांची रचना केली त्यामध्ये विविधता आढळते. एकनाथांच्या भारूडांची संख्या, विषयातील विविधता, मनोरंजन, समाजातील तळापर्यंत झालेला प्रसार या सर्व घटकामुळे 'एकनाथी भारूडे' लोकप्रिय झाली. याच भारूडातून समाजाला आध्यात्मिक अधिष्ठान व नैतिक मुल्यांची शिकवण देण्यात आली. संत ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत निर्माण करण्याचे काम केले. याचमुळे छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार झाले.

**● भारूड शब्दाची व्युत्पत्ती :**

'भारूड' हा शब्द पुरातन असून या शब्दाचे मुळ शोधण्याचा प्रयत्न अनेकवेळा झाला आहे. भारूडांची व्युत्पत्ती सांगणे अवघड असले तरी शब्दकोशामध्ये भारूड या शब्दाचा अर्थ 'धनगर' असा दिला आहे. 'भारूड' या शब्दाची व्युत्पत्ती कानडी प्रदेशाशी संबंधित आहे. 'भरवाड' ही कानडी धनगरांची एक जात आहे. या धनगरानी

गायलेल्या गीतांना 'भरवाडहाडू' असे म्हटले जाते. 'हाडू' या कन्नड शब्दाचा अर्थ 'गीत' किंवा 'पद' असा आहे. त्यामुळे भरवाडहाडू-भारवाडू-भाराडू शब्दावरून भारूड तसेच गारूड या शब्दावरून 'भारूड' हे प्रचलित झाले असावे. भारूड या शब्दाचे दोन अर्थ सांगितले आहेत. तसेच त्यास दोन तोंडाचा पक्षी असेही म्हटले आहे. त्या दोन अर्थापैकी एक व्यावहारीक व दुसरा आध्यात्मिक असा सांगितला आहे. महाभारतातील शकुंतला आख्यानात 'भारूड' या शब्दाचा उल्लेख सापडतो. अध्यात्म सांगताना एखाद्या कथेचा आधार घ्यायचा व त्या आधारे भारूडांची रचना करून लोकापर्यंत विचार पोहोचवायचे. यामुळे जनमानसामध्ये भारूडे लोकप्रिय ठरतात.

● **भारूडाचे स्वरूप :**

भारूडाचे स्वरूप विशद करताना भारूडातून समाजापर्यंत पोहचविले जाणारे तत्त्वज्ञान हे रुपकात्मक पद्धतीने सांगितले जात असे. संत एकनाथांनी आपल्या भारूडातून त्यांचा आध्यात्मिक अनुभव अतिशय सोप्या व साध्या भाषेत मांडला आहे. विचारवंतापासून सर्वसामान्यापर्यंत त्यांना समजेल, रुचेल आणि पचेल अशा रचना एकनाथांनी भारूडातून केल्या. सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनातील घडणाऱ्या घटना, संसारातील तसेच व्यवहारातील उदाहरणे देऊन समाजापर्यंत भारूड पोहचविण्याचे कार्य केले. भारूडाची रचना करताना त्यातील रुपके तत्कालीन कालखंडातील समाजातील नेहमी परिचयाची असणारी डोंबारी, ज्योतिषी, कोल्हाटी, महारीण, जागल्या, गारूड, भूत्या, दरवेशी, वेदू, बाळसंतोष, जोशी, वासूदेव यासारखी असत. संत एकनाथांनी बहुजनांचा उद्धार व्हावा, समाजातील अज्ञान दूर व्हावे, लोकांना आत्मा व परमात्मा एकच आहे याची ओळख व्हावी हा हेतू समोर ठेवून भारूडाची रचना केली.

● **भारूडांचे विषय :**

भारूडांच्या रचना या उदात्त हेतूने झालेल्या होत्या. त्यामुळे भारूडांमधून केल्या जाणाऱ्या रचना या नित्य व्यवहारातील असत. दळण-वळण, घाणा, भूत, बाजार, पशुसृष्टीतील कुत्रा, बैल, पोपट, एडका, टिटवी, बुलबुल, विंचू, सर्प यासाखी सर्वांना प्रचलित असणाऱ्या रुपकाच्या आधारे भारूडांचे विषय समाजात रुजवले जात असत. संत एकनाथांनी तत्त्वज्ञान, अध्यात्म, नाती, वर्णव्यवस्था, लोकजीवन, मनुष्य स्वभाव, काम, क्रोध, आनंद, सुख, मनोरंजन, स्त्रीजीवन, विविध देव, देवता इत्यादी घटकावर आपल्या भारूडातून प्रकाश टाकला आहे. उदा. 'जोहार मायबाप जोहार। मी विठू पाटलाचा महार।' या भारूडातून तत्कालीन वर्णव्यवस्था स्पष्ट होते. किंवा 'दार उघड बया दार उघड' या भारूडातून नाथांनी आई जगदंबेला केलेले आवाहन दिसते. नाथांच्या भारूडातील विपुलता व विषयातील विविधता थक्क करणारी आहे. सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील इतक्या व्यक्ती व विषयाचे सूक्ष्म निरीक्षण त्यांनी आपल्या भारूडातून नोंदविले आहे. समाजातील भिकारी, पशुपक्षी, सौरी-कुंटीण यासारख्या स्त्रीया, पाटील, कुलकर्णी, महार, कोल्हाटी, डोंबारी, अपंग लोक, भिक्षेकरी, भविष्यवेते, विविध खेळ, अशा अनेक विषय भारूडांतून हाताळले होते. भारूडांच्या रचनेसाठी विषयाची निवड करताना कोणताही एकच सामाजिक स्तर विचारात न घेता सर्व स्तरातील विषय अध्यात्मबोध व प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविले जात असत.

● **भारूडांचे सादरीकरण :**

महाराष्ट्रामध्ये ज्या लोककला समाजात रुजल्या, वाढल्या व लोकप्रिय झाल्या त्यामध्ये भारूड या लोककलेला प्रमुख स्थान द्यावे लागते. संतानी समाजाला लोकशिक्षण मिळावे म्हणून भारूडांची रचना केली. भारूड हे दृकश्राव्य कलेचा अविष्कार आहे. गायन, नाट्य, वक्तृत्व अणि संगीताच्या मिलाफातून भारूडांचे सादरीकरण केले जाते. थोड्या फरकाने किर्तनासारखी भारूडाची बैठक बसलेली असते. भारूडाला सुरूवात विठोबा, खंडेराया इत्यादी देवदेवतांना आवाहन करून नंतर शारदास्तवन व गुरुस्तवन केले जाते. यानंतर भारूडाचा विषय मांडला जातो. भारूड करणारी व्यक्ती अध्यात्माबरोबर नाट्यकर्मी असावी लागते. भारूड गायनामध्ये मध्ये मध्ये लोकसंस्कृतीतील गीतांचे गायन केले जाते. आध्यात्म, तत्त्वज्ञान, मनोरंजन, यातूनच शतकानुशतके लोकशिक्षण व स्वधर्म जागृतीचे कार्य भारूडांनी केले. अलिकडे भारूडांचे सादरीकर पुरुषांप्रमाणे स्त्रीयाही करतात. संत साहित्याच्या अभ्यासक लक्ष्मीबाई गिराम, गंगुबाई जाधव, चंदाबाई तिवाडी या स्त्रियाही भारूडांचे सादरीकरण करतात.

● **स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) पोवाड्यातील परिच्छेदाला काय म्हटले जाते.

२) अज्ञानदासाने अफजलखान वध या प्रसंगावर कोणत्या साली पोवाडा लिहिला.

३) छ. संभाजी महाराजांच्या दरबारात कोणते दोन भाट होते.

४) शाहीर अनंत फंदी यांचे मुळ गाव कोणते होते.

५) परशराम हा शाहीर कोणाच्या दरबारात होता.

६) सगनभाऊ हा शाहीर कोणत्या धर्माचा होता.

७) होनाजी बाळा या शाहीराचे पूर्ण नाव सांगा.

८) मध्ययुगात कोणत्या संताने अनेक लोकप्रिय भारूडे रचली.

२) 'भरवाड' ही कोणत्या धनगराची जात आहे.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) पोवाड्यास ............... असे म्हटले जाते.

अ) पराक्रमाचे गीत ब) यशाचे गीत क) काव्य गीत ड) यापैकी नाही.

२) अज्ञानदासाने ............... हा पोवाडा लिहिला.

अ) शाहिस्तेखान छापा ब) शिवाजी महाराजांचा पराक्रम

क) अफजलखान वध ड) शिवराज्याभिषेक.

३) पोवाडा हे ................ आहे.

अ) दृक माध्यम ब) श्राव्य माध्यम क) दृक-श्राव्य माध्यम ड) यापैकी नाही.

४) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील सिंहगडाच्या प्रसंगावर ................ या शाहीराने पोवाडा लिहिला.

अ)अज्ञानदास ब) तुळशीदास क) यामाजी ड) अनंत फंदी

५) अनंत फंदी या शाहीराने .................. हा पोवाडा रचला.

अ) खर्ड्याची लढाई ब) अफजलखान वध क) शिवराज्याभिषेक ड) बाळाजी विश्वनाथ

६) राम जोशी यांनी ................... पोवाड्यात वैभवशाली पुणे शहराचे वर्णन केले आहे.

अ) दुष्काळाचा पोवाडा ब) ब्राह्मणराज्य जोरावर क) खर्ड्याची लढाई ड) यापैकी नाही.

७) रघुजी आंग्रे यांच्यावर ................... या शाहीरांनी पोवाडा रचला.

अ) होनाजी बाळा ब) अज्ञानदास क) प्रभाकर ड) सगनभाऊ

८) शब्दकोशामध्ये भारूड या शब्दाचा अर्थ ........... हा दिला आहे.

अ) धनगर ब) सणगर क) भरवाड ड) हाडू

८) भारूड हा ........... कलेचा अविष्कार आहे.

अ) दृक ब) दृक-श्राव्य क) श्राव्य ड) यापैकी नाही

९) समाजातील भिकारी, सौरी, कुंटीण, स्त्रिया, पाटील, कुलकर्णी, महार, कोल्हाटी, भिक्षेकरी यासारखे अनेक विषय ............. या लेखन प्रकारात हाताळले जातात.

अ) पोवाडा ब) तमाशा क) चित्रकथी ड) भारूडे.

### ३.२.२ दशावतार (Dashavtar), चित्रकथी (Chitrakathi) :

● **दशावतार :**

महाराष्ट्रातील कोकण व गोवा राज्यात प्रसिद्ध असलेली नाट्यकला म्हणजे दशावतार होय. कोकण व गोमंतक प्रदेशात सुगीच्या दिवसानंतर वेगवेगळ्या देवतांचे उत्सव व जत्रा प्रसंगी दशावताराचे खेळ सादर करण्याची पुर्वापार परंपरा आहे. भगवान विष्णुने लोककल्याणासाठी जे विविध अवतार घेतले या अवतारांना दशावतार म्हणतात. यामध्ये मत्स, कुर्म, वराह, वामन, नृसिंह, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध, कुल्की हे दहा अवतार भारतीय लोकांच्या श्रद्धेचा व अध्यात्माचा / भक्तीचा विषय होय. आजच्या आधुनिक जगात मनोरंजनाच्या नवनव्या संकल्पना निर्माण होत असतानाही जुन्या लोककला आपले अस्तित्व टिकवून उभ्या आहेत. रामायण, महाभारत आणि पुराणातील कथा, त्यातील प्रेरणादायी प्रसंगावर दशावताराचे नाटक केले

जाते. यातून लोककलेबरोबर धर्मशिक्षण व समाज प्रबोधनाचे कार्य कळत नकळत घडते. दशावतार हा नाट्यविषय लिखित स्वरूपात आढळत नसला तरी दशावतारी नाटकामध्ये काम करणारे कलाकार विविध पौराणिक ग्रंथ वाचून व ऐकीव ग्रंथांच्या आधारे स्वत:ची वेशभुषा, केशभुषा, रंगभुषा, स्वत: करत असतात. दशावतारी नाटकाच्या आधारे बहुजन समाजाचे मनोरंजन करण्याबरोबर समाजाला काही अंशी उपदेश करणे हा या नाटकाचा प्रथम हेतू असतो. भारत देशाबरोबरच भारताच्या पुर्वेकडील देशांमध्ये अशा दशावतारी खेळाचा प्रभाव होता.

● **दशावतारी नाटकाचा इतिहास :**

दशावतार या नाट्य प्रकाराचे पुरावे प्राचीन कालखंडापासून मिळतात. कर्नाटकातील 'यक्षगान' या लोकनाट्य प्रकारापासून महाराष्ट्रात दशावतारी खेळाचा उदय झाला असावा असे म्हटले जाते. दशावतारी नाटकाची प्रथा इसवी सनाच्या सातव्या शतकात विष्णुपुरच्या मल्लरायाने सुरू केल्याचे म्हटले जाते. चालुक्य कालखंडातील सोमेश्वर लिखित मानोसोल्लास ग्रंथ, मुकुंदराजाचा विवेकसिंधू, संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, समर्थ रामदासाचा 'दासबोध' या ग्रंथामधून दशावतारी खेळांचा उल्लेख सापडतो. चि.कृ.दीक्षित यांनी आपल्या 'आडिवऱ्याची महाकाली' या ग्रंथात सन १७२८ साली श्यामजी नाईक काळे यांनी कर्नाटकातून दशावतारी खेळ आडिवरे या कोकणातील गावात प्रथम आणले असे म्हटले आहे. स्थुलमनाने महाराष्ट्रात १८ व्या शतकापासून दशावतारी नाटकांची परंपरा गृहीत धरली जाते.

● **दशावतारी नाटकांचे स्वरूप :**

दशावतार हा लोकनाट्य प्रकार असून त्याचे गावोगावी सादरीकरण केले जाते. कोकणातील देवळी जातीचे लोक दशावतारी नाटकांचे सादरीकरण करतात. त्यामध्ये लिंगायत व गुरव समाजाची मंडळीही असतात. १८ व्या शतकात श्यामजी नाईक काळे यांनी दशावतारी नाटके / खेळ दाखविणारा एक फड उभा करून त्याचे संपूर्ण महाराष्ट्रभर सादरीकरण केले. हरिदास हा या दशावतारी खेळाचा मुख्य सुत्रधार असतो. खेळाला सुरूवात होण्याअगोदर तो रंगपीठावर किंवा मांडवात उभा राहतो. पायघोळ झगा, टोकदार टोपी, कमरेस दुपट्टा असा त्याचा पोशाख असे. त्याच्या दोन्ही बाजूला दोन पखवाजी व मागे अर्धवर्तुळाकार टाळकरी व मध्यभागी मुख्य सुत्रधार म्हणून हरिदास उभा राहत असे. तो आपल्या साथीदारासह मंगलाचरण गाऊन दशावतारी खेळाला सुरूवात करीत असे. दशावतारी खेळाचा मुख्य सुत्रधार दशावतारी खेळाचा सर्वकाही असतो, नाटकाचे नियाजेन करणे, सुरात सूर मिसळून गाणी, पदांचे गायन करणे, झील धरणे, सोंगाची संपादणी करणे. तसेच रंगभूमीवरील कलाकार व श्रोत्ये यांच्यामधील दुवा म्हणून सुत्रधार काम करतो. दशावतारी नाटकाचा मुख्य कथाभाग मत्स्यवतार आख्यानातील विष्णूने संकासुराचे केलेले परिपत्य हाच असे. यानंतर कुर्म, वराह, नरसिंह, परशुराम, राम, कृष्ण या अवतारातील विषयही आख्यानासाठी घेतले जात असत.

दशावतारी खेळामध्ये 'पेटारा' सर्वात महत्त्वाचा भाग मानला जातो. कारण दशावताराचे सर्व साहित्य या पेटाऱ्यामध्ये ठेवले जाते. पेटाऱ्यात गणपतीचा मुखवटा, सरस्वतीचा मुकुट व खेळातील इतर पात्राचे मुखवटे ठेवलेले असतात. दशावतारी खेळाचा मुख्य सुत्रधार पेटाऱ्यातील मुखवटे बाहेर काढून चौरंगावर मांडून त्याचे पूजन करतो.

मुखवट्यांची विविधता पूजा झाल्यानंतर त्याचा वापर दशावतारी खेळासाठी केला जातो. देवदेवतांचे मुखवटे माती अथवा कागदी लगद्यापासून बनविले जातात. मुखवट्यांचे रंग अतिशय भडक व आकर्षक असतात. मुखवट्याबरोबर जरीकाठी, धोतर, उपरणे, शेले, रेशीमगाठी अशी वस्त्रेही वापरली जातात. तसेच गदा, धनुष्य, परशू, तलवारी आदि शास्त्रांना बेगड लावून खेळामध्ये वापरली जातात. दशावतारी खेळांना धार्मिक अधिष्ठान असते. ग्रामीण भागात देवदेवतांच्या यात्रा-जत्रा किंवा तिथी उत्सवाच्या निमित्ताने दशावतारी खेळाचे सादरीकरण केले जाते. एक धार्मिक विधी म्हणूनही दशावतारी प्रसंग सादर केले जातात. कोकण व गोव्यामध्ये 'खळनात' (शिवशंकराचे रुप) यात्राप्रसंगी दशावतारी खेळ केले जातात.

दशावतारी खेळ व नाटक सादर करताना दोन भागात सादर केले जाते. पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग असतात. पूर्व रंगाला 'आडदशावतार' असेही म्हटले जाते. या भागात मुख्य सुत्रधार विघ्नहर्त्या गणपतीला आवाहन करणारे पद म्हणतो. पेटारा पुजन, गणपती नमन, रिद्धी-सिद्धी प्रवेश, सरस्वती प्रवेश, भटजी प्रवेश, ब्रम्हदेव प्रवेश, दशावतारांचा प्रवेश आणि शंकासुराचा प्रदेश हा भाग पूर्वरंगात सादर केला जातो. पूर्व रंगातील शंकासुराचा प्रवेश हे दशावतारी नाटकातील मुख्य सुत्रधारा इतकाच महत्त्वाचा मानला जातो. शंकासूर प्रवेश म्हणजे दशावतार खेळातील विनोदाचा डोंगरच असतो. तो आपल्या उक्ती व कृतीतून विनोदाचे अनेक बंद उलघडत असतो. दशावतारी खेळाच्या उत्तररंगामध्ये पौराणीक कथांचे सादरीकरण केले जाते. रामायण, महाभारत, पुराणे, नवनाथ कथासार, भागवत यामधील कथाप्रसंग निवडून त्याचे सादरीकरण केले जाते. देव-दानवांचे युद्ध हा दशावतारी खेळाचे प्रमुख आकर्षण असतो. या खेळ्यांच्या शेवटी आख्यान संपल्यानंतर पहाटेच्या सुमारास गौळणकाला (गोपाळकाला) होतो. दशावतारामध्ये स्त्री भूमिका करणारे हे पुरुष असतात. दशावतारामध्ये काम करणाऱ्या कलाकारांनी अभिनयाचे कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नसते. तरीही त्यांची अभिनयशैली, संवादफेक अतिशय प्रभावी असते.

अलिकडे दशावतारी नाटकामध्ये 'बाल दशावतार' प्रकारही रूढ झाला आहे. बाल दशावरातून लहान मुले आपल्या कला सादर करतात. स्त्रियांही दशावतारी खेळामध्ये काम करू लागल्या आहेत. पूर्वी रात्रभर चालणारी दशावतारी नाटके वा खेळ आता तीन-चार तासात खेळले जातात. आज दशावतारी नाटकांना व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे मुळ स्वरूप टिकवून ठेवणे एक आव्हान आहे.

● **चित्रकथी :**

चित्रांच्या आधारे कथन करणारी चित्रकथी कला महाराष्ट्रात एकेकाळी अतिशय लोकप्रिय अवस्थेत होती. हरदास, गोंधळी लोक रात्र जागवत आपल्या आख्यानाचे सादरीकरण करतात. त्याप्रमाणे पूर्वी चित्रकथी समाज रात्रभर रामायण, महाभारत व पुराणातील प्रसंगावर आधार चित्राची निर्मिती करून अथवा मागील पिढीतील चित्रांच्या आधारे निरूपण करतात. चालुक्य राजा सोमेश्वरी यांच्या 'मानसोल्लास या ग्रंथात चित्रकथीचा उल्लेख सापडतो. वर्णकांच्या म्हणजेच चित्रांच्या मदतीने जो कथा कथन करतो त्यास श्रेष्ठ चित्रकथक मानले जाते. प्राचीन कालखंडात चित्रांच्या आधारे कथन चित्रकथी जमात असल्याचेही उल्लेख मिळतात.

चित्रकथी समाजातील लोक पूर्वी पानावर चित्र काढीत असत. पुढे कागदाची उपलब्ध झाल्यावर ते कागदावर चित्र काढू लागले. त्यातूनच पुढे ही चित्रकथी परंपरा चालत राहिली. चित्रकथी ज्या चित्रांच्या आधारे आपली चित्रकथा सादर करतो ती चित्र १२ x १८ इंचाची असतात. चित्रकथी आपल्या चित्रांचे वर्णन करताना निवेदनाच्या माध्यमातून चित्रातील विषय व प्रसंग खुलवितो. बहुतांशवेळी चित्राचे विषय पौराणिक व धार्मिक असतात. अशा विषयातील चित्रांमधून चित्रकथी आपला आशयश्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतो.

चित्रकथी विविध कथांवर तयार केलेल्या चित्रांनुसार प्रभावी संवाद कौशल्याच्या आधारे ती कथा जीवंत करीत  असतो. तो चित्रांद्वारे जी कथा सांगतो त्यास 'पोथी' सांगणे असेही म्हणतात. चित्रे काढण्यासाठी सुरूवातीच्या काळात लाल, काळी माती, पांढरा शाडू, हिरव्या रंगासाठी झाडांची पाने या निसर्गातील रंगाचा वापर केला जात होता. महाराष्ट्रात चित्रकथीच्या 'पिंगुळी शैली' आणि 'पैठणीशैली' या दोन शैली प्रसिद्ध आहेत. या बरोबरच 'राजस्थानी चित्रकथी शैलीही' प्रसिद्ध आहे. मानवाला जेव्हा लेखनकला अवगत नव्हती. तेव्हा चित्रांच्या आधारे कथानक रचून ते समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जात असे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठकार समाज हा चित्रकथी समाज म्हणून ओळखला जात होता. या समाजातील लोकांनी चित्रकथी कलेची परंपरा चालू ठेवली आहे. परशुराम गंगावणे नावाच्या चित्रकथी जमातीतील व्यक्तीने ही कला अनेक हालअपेष्ठा सहन करून जोपासली आहे. या कलेला सावंतवाडीच्या खेम सावंत, बापू महाराज यासारख्या संस्थानिकानी आश्रय दिलेला होता. तसेच या कलेला प्रारंभीच्या काळात अनेक राजेराजवाड्यांनी राजाश्रय दिल्याचे उल्लेख मिळतात. राजाश्रय असल्याच्या काळात चित्रकथी सादर करणाऱ्या कलाकारांच्या अंगात जाकीट व डोक्याला फेटा असे. परंतु पुढे राजाश्रय संपल्यानंतर चित्रकथी कलाकारांचा उदरनिर्वाह चालणेही अवघड झाले. यामुळे चित्रकथी समाज आपले पोट भरण्यासाठी गावोगावी फिरून चित्रांच्या आधारे कथन न कथा गायन करून पोट भरू लागला. काही कलाकार चित्रकथीचा व्यवसाय सोडून नंदीबैल, पोतराज तसेच बाहुल्यांचे खेळ करू लागले. चित्रकथी समाजातील लोक बाहुल्यांचे खेळ करीत असलने त्यांना 'बाहुल्याकार' असेही म्हटले जात असे. मध्ययुगामध्ये मराठा कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या स्वराज्यामध्ये गुप्तहेराचे काम करणाऱ्या बाहुल्याकार अथवा चित्रकथींना गावोगावची वतने दिली होती. त्या वहिवाटीला 'लाकी' असेही म्हटले जात असे. ज्या भागात 'लाकी' असेल त्या भागातील शेतकरी चित्रकथी अथवा बाहुल्याकारांना भाताची कवळी देत असत. चित्रकथीं आपल्या व्यवसायाबरोबर जोडधंदा म्हणून पशुपालनही करत असत.

चित्रकथी प्रारंभी रिद्धी-सिद्धीसह गणपती व सरस्वती यांना वंदन करून आपल्या चित्रांची सादरीकरण व कथनास सुरूवात करतात. त्यानंतर नंदीपुराण, विष्णुपुराण, काशीखंड यांसारख्या ग्रंथामधील निवडक कथांवरील चित्रसंचाच्या आधारे कथांचे सादरीकरण करतात. चित्रसंचाचा नायक चित्रकथेचा आशय सांगताना गायनाच्या आधारे घेतो. त्यावेळी त्याचे सहकारी तुणतुणे, डफ, एकतारी वाजवून त्याला साथ संगत

देतात. चित्रकथीचा नायक शक्यतो बसुनच कथा सांगतो. चित्रकथी आपल्या कथनामध्ये पराक्रम, कारूण्यभावना, प्रणयकथा, धार्मिक श्रद्धा सांगत असतात.

- **स्वयं अध्ययन प्रश्न –२**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दशावतार ही नाट्यकला कोणकोणत्या राज्यात प्रसिद्ध आहे.

२) कोकणात कोणत्या जातीचे लोक दशावतारी नाटकांचे खेळ करतात.

१) महाराष्ट्रात चित्रकथीच्या कोणत्या दोन शैली प्रसिद्ध आहेत.

२) चित्रकथी समाजातील लोक बाहुल्यांचे खेळ करीत असल्याने त्यांना काय म्हटले जात असे.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) रामायण, महाभारत, पुराणकथातील प्रसंगावर ................ ही लोककला सादर केली जाते.

अ) दशावतार ब) लावणी क) तमाशा ड) पोवाडा

२) ............ या ग्रंथातून दशावतारी खेळाचा उल्लेख सापडतो.

अ) सभासद बखर ब) दासबोध क) शिवभारत ड) आज्ञापत्र

३) १८ व्या शतकात ............. यांनी दशावतारी खेळ दाखविणारा एक फड उभा केला.

अ) श्यामजी नाईक काळे ब) श्यामजी कोल्हटकर

क) येसाजी नाईक काळे ड) चि. कृ. दिक्षित

४) कोकण व गोव्यामध्ये ............ देवाच्या यात्रेनिमित्त दशावतारी खेळ खेळले जातात.

अ) भोलेनाथ ब) रावळनाथ क) खळनाथ ड) यापैकी नाही.

५) चालुक्य राजा सोमेश्वर यांच्या 'मानसोल्लास' या ग्रंथात ............ लोककलेचा उल्लेख आढळतो.

अ) भारूड ब) पोवाडा क) चित्रकथी ड) तमाशा

६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ व पिंगुळी येथील ............ हा चित्रकथी समाज म्हणून ओळखला जातो.

अ) ठाकर ब) लिंगायत क) देवळी ड) गुरव

### ३.२.३ **लावणी** (Lavani), **तमाशा** (Tamasha) :

● **लावणी :**

मध्ययुगीन काळात मराठी वाङ्मय विविध रुपात उदयास आले होते. त्यामध्ये पंडीती काव्य संतांचे अभंग, पदे, आरत्या, भारूड आणि शाहिरी काव्याने समाज मनामध्ये लोकप्रियता गाठलेली होती. महाराष्ट्रात लावणी या लोककलेला विशेष दर्जा प्राप्त झाला होता. लावणीला शाहीरी कवितेचे दुसरे अंग म्हटले जाते. संत काव्य आणि पंडिती काव्य या परंपरेपेक्षा वेगळी परंपरा म्हणून लावणीसारख्या शाहीरी काव्याने समाजात स्थान मिळविले. बहुतांश वेळेत लावण्या म्हणजे फक्त श्रृंगार रसात्मक रचना असा समज जनमानसामध्ये असतो. त्यामुळे खेड्यापाडातील यात्रा-जत्रा, सण-उत्सवाप्रसंगी अशा लावणी कलांचे आयोजन केले जाते. असे असले तरी अनेक शाहीरांनी लावणीची रचना करत असताना श्रृंगाराबरोबरच अध्यात्म, धर्म, राजकारण, इतिहास, संस्कृती व तत्कालीन समाज जीवनातील प्रसंगांचे उत्कट दर्शन घडविणाऱ्या रचना केल्या आहेत. थोडक्यात लावणीने आपल्या रचनांमधून समाज मनावर पकड मिळविलेली दिसून येते.

● **लावणीची व्युत्पत्ती :**

लावणी या शब्दाची व्युत्पत्ती अनेक अभ्यासकांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. शेतात लावणी करताना म्हटल जाते ते लावणी गीत. अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. लावणीला काही अभ्यासकांनी 'ग्राम्यगीत' असेही म्हटले आहे. व्युत्पत्ती कोशकरांनी लावणीचे मुळ 'लापनिकेत' शोधले आहे. 'लापनिका' या शब्दाचा अर्थ आध्यात्मिक कूट प्रश्नात्मक संस्कृत रचना असा आहे. महानुभव पंथातील केशवराज या पंडीताने लापनिका या शब्दाचा वेगळ्या पद्धतीने उपयोग केला आहे. ते तत्त्वज्ञानाचे अभ्यासक असल्याने त्यांनी सिद्धांती वचने अथवा सूत्र व्यवहारीक सारणीत आणून सोडताना शेवटची पायरी म्हणून जे सांगावयाचे त्यास 'लापनिका' असे म्हटले आहे. प्रा. म. वा. धोंड यांनी लावणी हा शुद्ध मराठी काव्यप्रकार आहे असे सांगून लावणीची व्युत्पत्ती सांगितली आहे. ''लावणीचे उत्पादन संस्कृत शब्दापासून दाखविताना कृत्रिम किंवा पंडिती स्वरूपाचे असून लावणी हा काव्यप्रकार संस्कृतामधून नव्हे तर प्राकृतातून उत्क्रांत झालेला असावा. त्याप्रमाणे ते लावणी यास रचना अथवा मांडणी करणे या अर्थाच्या क्रियापदापासून लावणी हा शब्द तयार झाला असावा.'' लावणी या शब्दाची मांडणी किंवा रचना संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्येही केला आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत 'लावणी' हा शब्द रोप लावणे या अर्थाने वापरलेला आहे. अशारितीने लावणीची व्युत्पत्ती सांगता येईल.

● **लावणीचे स्वरूप व परंपरा :**

लावणी हा कलाप्रकार विशेषत: मराठा कालखंडामध्ये बहारास आला. लावणीचे मूळ लोकगीतातूनच आकारास आले आहे. शेतकरी शेतीची कामे करत असताना ते श्रम हलके व्हावेत यासाठी लोकगीतांचे गायन करीत असत. याच लोकगीतातील अर्थ लावणीला जोडले गेले असावेत. लावणी या कलेमध्ये गायन, नृत्य आणि नाट्याची जोड असल्याने श्रोत्यांनी लावणीला प्रचंड प्रतिसाद दिला. लोकरंजन, हा लावणीचा मूळ उद्देश असल्याने लावणीचे गायन विशिष्ट ढंगाने केले जात असे. लावणी ही ढोलके, टाळ, कडे, खंजिरी, तुणतुणे या वाद्याच्या

साथीने गावून, नाचून सादर केली जाते. लावणी सादर करणाऱ्या स्त्रिया अंगात नऊवारी साडी, नाकात नथनी, पायात चाळ, आंबाड्यात फुलांचे गजरे, कंबरेला कंबरपट्टा अशा मराठमोळ्या पोषाखामध्ये मोराच्या पिसाऱ्यासारखा आपल्या साडीचा पदर पसरत नाच करीत लावणीचे सादरीकरण करतात.

लावणी ही लोकगीतांच्या परंपरेतून पुढे आली असावी. त्यामुळे जनसमुहाच्या मनोरंजनासाठी कवीनी लावणी गीतांची रचना केली. लावणीची रचना करणारा कवी लावणीमध्ये मुखडा बांधणीसाठी बरेच कष्ट होत असतो. कारण मुखड्याचा अर्थ, आकर्षक व साधा सोपा, प्रेक्षकांना भावणारा असेल तर ती लावणी लोकप्रिय ठरते. यासाठी लावणीकार मुखड्याची रचना त्याचे स्पष्टीकरण मधूर शब्दामध्ये नादमय होईल व त्याचे प्रेक्षकांवर कसा प्रभाव पडेल याची काळजी घेतो. यासाठी लावणीकारास कधी-कधी खटका व यमक जुळविण्यासाठी शब्द व अर्थाची ओढाताण करावी लागते. लावणीत वर्णन केलेले विविध विषय समाजातील विविध अंगाना स्पर्श करून जात असे. त्यामुळे बहुजन समाजाला लावणी जवळची वाटू लागली.

लावणीची परंपरा फार जुनी आहे. एकनाथकालीन मन्मथशिवलिंगाची लावणी सर्वात जुनी लावणी मानली जाते. त्या अगोदरच्या लावण्याचे पुरावे उपलब्ध नसल्याने लावणीचे मुळ शोधणे, अवघड बनते, तरी लावणी परंपरा फार जुनी असावी असे वाटते. अज्ञानसिद्ध यांनी रचलेल्या स्फूट रचना लोकगीतांशी निगडीत व रूपकात्मक लावणीशी मिळत्या जुळत्या आहेत. ज्ञानेश्वरीच्या १६ व्या अध्यायामध्ये लावणी हा शब्द आला आहे. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या कालखंडात पंडीत कवींच्या काव्यलेखनास बहार आला होता. याचवेळी शाहिरी काव्यलेखन परंपरेसही सुरूवात झाली होती. जोतिराम नावाच्या कवीने सन १६७५ ते १६८० या कालखंडात लावणीची रचना केली होती. शिवकाळ व त्यानंतरची महाराष्ट्रातील राजकीय स्थिती ही धामधुमीची होती. मराठे सरदार व सैनिक नेहमीच मुलुकगिरीवर (लढाईवर) जात असत. त्यांना घरापासून वर्षे-दोन वर्ष दूर रहावे लागत असे. साहजिकच पती-पत्नीना जाणवणारा विरह तत्कालीन लावणीमधून चित्रीत केला जाई. तसेच स्त्री-पुरुषांच्या मनातील प्रेम, परस्पर आकर्षक, विरहातील दु:ख यांचे वर्णनही लावणीतून प्रकट होत असे. अनेक ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये लावणीचे उल्लेख आपणास सापडतात. पेशवे कालखंडात शाहिरांनी अनेक प्रकारच्या लावण्या रचल्या होत्या. शाहीर होनाजी बाळा यांचे आजोबा साताप्पा यांनी रचलेली लावणी आज उपलब्ध असलेल्या लावण्यांमध्ये सर्वात जुनी लावणी मानली जाते. सन १७६५ च्या दरम्यान माध्वनाथ यांनी लावणीची रचना केली होती. तसेच गंगाधर यांनी शिवचरित्र कथा या विषयावर याच काळात लावणी रचल्याचे उल्लेख मिळतात. उत्तर पेशवाईच्या कालखंडात दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीनंतर लावणीस प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. लावणीमध्ये संगीत, नृत्य, नाट्य यांचा मिलाप होऊन ती लोकरंजनाचे साधन झाले. शाहीर होनाजी बाळा यांनी दुसऱ्या बाजीरावाच्या आज्ञेवरून लावणीला बैठक लावणीत नेले. तर राम जोशींनी लावणीस सुशिक्षित समाजात नेऊन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. लावणीचा विकास घडवून आणून देऊन बहुजन समाजापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य प्रभाकर, सगनभाऊ, अनंत फंदी इत्यादींनी केले. एकंदरीत लावणीची परंपरा फार जुनी असली तरी समाजामध्ये लावणीस एक लोककला प्रकार म्हणून पाहिले जाते.

- **लावणीचे प्रकार :**

लावणी ही गेय काव्यप्रकारामध्ये मोडते. लावणीच्या रचनेमध्ये साहित्य, नृत्य, अभिनय यांचा सुरेख मिलाप

असतो. मध्ययुगीन कालखंडात अनेक शाहीरांनी लावणींची रचना करताना श्रृंगारीक प्रसंगाला महत्त्व दिल्याचे दिसते. डॉ. शरद घाटे यांनी लावणीचे शाहिरी लावणी, बैठकीची लावणी व फडाची लावणी असे तीन प्रकार केले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

**१) शाहिरी लावणी :**

डफ्, तुणतुणे यांच्या मदतीने शाहीराने पद्यात्मक (काव्यमय) स्वरूपात गाऊन सादर केलेली रचना म्हणजे शाहिरी लावणी होय. याबाबतीत श्री. म. वा. धोंड म्हणतात, ''सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरीता त्यांना रूजतील अशा लौकिक पौराणिक वा आध्यात्मिक विषयावर रचलेली, कडे व ढोलकी यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज, सफाईदार, पद्मावतीनी व भृंगावर्तनी धावत्या चालीची रचना म्हणजे शाहिरी लावणी होय'' असे वर्णन असणाऱ्या लावण्यांना साधारणपणे शाहिरी लावणी म्हटले जाते.

**२) बैठकीची लावणी :**

तबला, पेटी, सारंगी, तंबोरा या वाद्यांच्या मदतीने लावणी व नर्तकी, बैठकीमध्ये सादर करतात. उत्तर हिंदुस्थानातील ठुमरी नृत्याप्रमाणे बैठकीमध्ये लावण्या सादर केल्या जातात. बैठकीच्या लावण्यांमध्ये अभिनय व रागसंगीताची जोड देऊन लावणीचे सदरीकरण केले जाते.

**३) फडाची लावणी :**

नाचा, सोंगड्या, आदि कलाकारांच्या मदतीने नृत्यसंवाद आणि अभिनयाचा मिलाप घडवून ढोलकीवर गायिली जाणारी लावणी म्हणजे फडाची लावणी होय. यामध्ये विरहदु:खाची भावना व्यक्त करणारी 'बालेघाटी' लावणी उत्तान व शृंगार रस असणारी 'छक्कड' लावणी, प्रश्नोत्तर विचारणारी 'सवाल जबाब' लावणी आणि दिर्घ चार कडव्यांची किंवा चार वेळा चाली बदलणारी चौकांची लावणी फडावर सादर केल्या जातात.

मराठी शाहिरी वाङ्मयामध्ये अनेक विषयावर लावण्यांची रचना केली जाते. शृंगारीक व आध्यात्मिक लावणी रचनेबरोबर समाजातील विविध विषयावर शाहिरांनी कवने रचली. लोकांना मनोरंजनाबरोबरच भावनिकतेचे आवाहनही शाहिरांनी लावणीतून केल्याचे आढळते. लावण्यांची रचना करताना विविध विषय शाहिरांनी हाताळले होते. त्यामध्ये गणाच्या लावण्या, देवदेवतावर्णनपर लावण्या, उपदेश व वैराग्यपर लावण्या, स्थानमहिमापर लावण्या, संत व गुरुमहात्मपर लावण्या, कथाकथनपर लावण्या, व्यक्तीवर्णन लावण्या, विनोदी लावण्या, सामाजिक परिस्थिती विशद करणाऱ्या लावण्यांची रचना केल्याचे आढळते.

**● तमाशा :**

महाराष्ट्रामध्ये लोकनृत्य, लोकनाट्य यातील 'लोक' हा शब्द सामान्य लोकांसाठी वापरला जातो. समाजातील कष्टाळू व सर्वसामान्य लोकांनी मनोरंजन, विरंगुळा व आनंदासाठी आपली नाळ कला, परंपरेशी जोडलेली होती. भारतीय लोकसंस्कृतीही विविध प्रथा, परंपरा, रूढी, भाषा, चालिरिती, सण उत्सव साजरे करीत आली आहे. लोकांनी जीवनातील दु:खातून विरंगुळा मिळावा म्हणून विविध लोककला प्रकारांना

प्राधान्य दिले. भारताच्या विविध प्रदेशात लोकनाट्याचे विविध प्रकार आढळतात. उत्तर व मध्य भारतात रामलिला, रामलिला नौटंकी इत्यादी बंगाल, बिहारमध्ये जत्रा, गंभीरा, किर्तनीया, दक्षिण भारतामध्ये यक्षगाण, कामनकोटू, विथिनाटकम इत्यादी प्रकारची लोकनाट्ये सादर केली जातात. महाराष्ट्रामध्ये तमाशा हा लोकनाट्य प्रकारामध्ये मोडतो.

महाराष्ट्रामध्ये तमाशा या लोकनाट्य प्रकाराने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. 'तमाशा' हा शब्द मूळचा पर्शियन भाषेतील असून तो प्रथम उर्दू भाषेत आला. पुढे 'उर्दू भाषेच्या संपर्काने तो मराठीत रूढ झाला. उर्दू आणि पार्शियन भाषेत तमाशा या शब्दाचा अर्थ मौज, आनंद किंवा आश्चर्यकारक असे दृश्य असा दिला आहे. तमाशाच्या माध्यमातून प्रदर्शन, प्रेक्षणिय दृश्य, करमणुकीचे देखावे व मनोरंजन हे बहुजन समाजापर्यंत पोहोचविले जाते. गेली ३००-३५० वर्षे तमाशाने बहुजन समाजाच्या मनोरंजनाचे कार्य केले आहे. गोंधळ, दशावतार, वाघ्या मुरळीचे भेदीक-फड, बहुरुपी यांसारख्या लोककलांच्या प्रयोगातील काही तत्त्वांचा स्विकार करून आणि त्यात नवीन गोटींची भर घालून तमाशा या कला प्रकाराने आपले अस्तित्व सिद्ध केले. पूर्वी तमाशा-विषयी अनेक समज-गैरसमज निर्माण झाले होते. ''तमाशा एक अश्लिल कला' मानले गेले. तसेच एक हिनकस व हिडीस देखावा या अर्थानेही तमाशाकडे पाहिले जाऊ लागले.

● **तमाशाची परंपरा :**

तमाशा या लोकनाट्य कला प्रकाराच्या प्राचीन तत्वाबाबत अभ्यासकामध्ये मतभेद आहेत. तमाशा हा कलाप्रकार केव्हा उदयास आला? याबाबतही अनिश्चितता आहे. तरीही, तमाशाची परंपरा फार जुनी असावी. कारण गोंधळ, जागरण, दशावतार, लळीत या कलाप्रकारांच्या रचनेमध्येच तमाशाचा उगम आपणास शोधता येतो. तमाशाच्या निर्मितीबाबत रा. चिं. ढेरे म्हणतात. ''गोंधळापासून तमाशा निर्मिण झाला.'' गोंधळातील विनोदी प्रश्न, गीते याचा समावेश तमाशा सादरीकरणात पुढे आला. तमाशामध्ये ग्रामीण भागातील कलाकारांचा समावेश केला जात असे.

तमाशाच्या निर्मितीबाबत वि. कृ. जोशी यांनी तमाशाची परंपरा पंधराव्या शतकात जाते असे म्हटले आहे. महंमद तुघलकाने आपली राजधानी देवगिरी उर्फ दौलताबादला आणली. यावेळी आपल्या बरोबर अनेक कलावंत विद्वानांना त्यांनी राजाश्रय देऊन त्यांच्याकडून विविध कलांचा आविष्कार करवून घेतला. उत्तर व दक्षिणेतील कलांचे अनेक कवीनी अनुसरण करून सण, उत्सव, यात्रा-जत्रांच्या वेळी लोककलांचे सादरीकरण सुरू झाले. लोककलांचे सादरीकरण सुरू झाले. लोककलाच्या या प्रकाराला 'गंमत' असे म्हणले जाऊ लागले. पुढे सोळाव्या शतकात विजापूरची आदिलशाही, निजामशाही, विजयनगरचे साम्राज्य यांच्या कालखंडात अनेक कवी, गायक, संगीतकार यांना राजाश्रय मिळाला. यातून लोककलांचा विकास होत गेला. संत एकनाथ महाराजांनी केलेल्या भारूड रचनेमध्ये 'तमाशाचा' उल्लेख आढळतो. एकनाथांनी रचलेल्या भारूडातून बहुजन समाजातील विविध विषय हाताळले आहेत. मुस्लीम राजवटीत बादशाही वैभवामुळे अनेक चैनी व करमणुकीचे प्रकार रूढ झाले. त्यांचेच अनुकरण पुढे मराठे शाहीत झाले. मराठेशाही वैभवाच्या टप्प्यावर असताना अनेक शाहीरांनी शृंगाररसाने भरलेल्या व करमणुक प्रश्नात लावण्या रचल्या याच बरोबर मावळ्यांच्या पराक्रमाची गाथा पोवाड्याच्या रूपाने रचण्यात

आली. त्यातून तमाशाची पार्श्वभूमी तयार झाली व तमाशा हे लोक रंजनाचे साधन म्हणून पुढे आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेनंतर शाहीर भूषणने शिवाबावनीची रचना केली. तत्कालीन शाहीर व कवींना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमुळे नवनवीन विषय मिळाले, खेड्यापाड्यातील सामान्य लोक महाराजांचे मावळे म्हणून काम करू लागले. मराठे सैनिक-शिलेदार विविध मोहिमावर जाऊ लागले. पराक्रम गाजवू लागले या पराक्रम व शौर्याचे विषय अनेक कवींनी काव्याची रचना केली. घरदार सोडून अनेक महिने लढाईवर गेलेल्या सैनिकांच्यामध्ये परंपरा मुस्लीम सत्ताधीशांच्या छावण्यामध्ये होती. यामधून लावणी प्रकाराला सुरूवात झाली. हीच लावणी मराठीतील तमाशाची जन्मदात्री ठरली. १८ व्या शतकाच्या प्रारंभी सन १७०७ मध्ये मुघल बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला. औरंगजेबाच्या वारसांनी संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व मुलगा शाहू यांना मराठ्यांच्यात यादवी निर्माण व्हावी या हेतूने कैदेतून मुक्त केले. याचा परिणाम मराठेशाहीत अंतर्गत कलह निर्माण होऊन मराठ्यांच्या सातारा व कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. सातारची गादी छत्रपती शाहू यांच्याकडे आली. छत्रपती शाहूंनी सन १७१३ साली बाळाजी विश्वनाथ यास पेशवेपद दिले. सन १७२० साली बाळाजीच्या मृत्यूनंतर बाजीराव पहिला हा पेशवा झाला. त्यावेळी साताप्पा या पेशवे दरबारी असणाऱ्या शाहीराने लावण्याची रचना केली. पहिल्या बाजीराव पेशव्याने चांगली मर्दुमकी गाजवत दिल्लीपर्यंत पराक्रम गाजविला. पुढे मराठ्यांनी आपला ध्वज अटकेपर्यंत फडकविला. छत्रपती शाहू महाराजांनी गादी स्थापन केल्यापासून पन्नास वर्षात मराठ्यांनी देशाच्या बहुतांश भागावर प्रभाव प्रस्थापित झाला. पूर्वीच्या मोगल सत्तेप्रमाणे मराठ्यांचा प्रभाव सर्वत्र दिसू लागला. पूर्वी मोगलांच्या फौजांची करमणूक करण्यासाठी तमासगीर, खेळीचे, शहीरी यांचे कार्यक्रम फौजांच्या छावण्यामध्ये असता तोच वारसा पुढे पेशवाईत मराठे फौजांमध्ये आलेला होता. छत्रपती शाहूपासून पेशवाईतील दुसऱ्या बाजीरावापर्यंत अनेक शाहीरांना बक्षिसे दिल्याची नोंद मिळते. या शाहीरांनी लावणीचे अनेक प्रकार पेशवाई कालखंडात रूढ केले. त्यामध्ये बैठकीची लावणी, तंबोरी लावणी, शाहीरी लावणी, महारी लावणी हे लावणी प्रकार प्रचलित झाले. यापैकी महारी लावणीतून तमाशाची निर्मिती होत गेली.

पेशवेकालखंडात तमाशा हा शब्द खऱ्या अर्थाने प्रचलित झाला असावा. याच काळात प्रभाकर, परशराम, रामजोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, गंगू हैबती, होनाजी बाळा आदी शाहीरांना राजाश्रय मिळून त्यांनी अनेक शृंगारीक रचना केल्या. यापैकी अनेक गुणी शाहीरांचा यथोचित गौरव दुसऱ्या बाजीराव पेशव्याने केला होता. परंतु दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारात 'तमाशा' करून दाखविल्याचे उल्लेख मिळत नाहीत. दुसऱ्या बाजीरावाने होनाजी बाळावर असणाऱ्या लोभापोटी त्यास बक्षीस दिल्याची नोंद पेशवे दप्तरात आहे. पुढे सन १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. इंग्रज राजवट सुरू झाली. पेशवाईतील शाहीरांना असणारा राजाश्रय संपला. एकीकडे इंग्रजी सत्ता व दुसरीकडे संस्थानिक यांनी तमासगिरांची गळचेपी केली. त्यामध्ये संस्थानिकांनी या कलेला राजाश्रय देणेचा प्रयत्न केला. पुढे तमाशा सादरीकरणात बरेच बदल झाले.

- **तमाशाचे सादरीकरण :**

पेशवाईच्या अखेरच्या कालखंडात कवींचे भेदीकांच्या ताफ्यासारखेच ताफे होते. या ताफ्यातूनच तमाशाच्या सादरीकरणाला प्रारंभ झाला. पेशवे हे गणपतीचे भक्त असल्याने कोणत्याही कामाची सुरूवात गणपती नमन

करण्याची पुराणप्रथा होती. शाहीरांनी अध्यात्मिक व शृंगाररस यांचा मिलाफ घडवून तमाशाची सुरूवात गणगौळणीनकडे खेचली जाऊ लागली. पुढे पेशवाई कालखंडानंतर तमाशामध्ये वगनाट्याचा समावेश झाला. तमाशा सादरीकरणासाठी कमीत कमी ८ ते १० माणसे (कलाकार) असावी लागतात. गण, गौळण, लावणी, बतावणी व वग या स्वरूपात तमाशा प्रेक्षकासमोर सादर केला जातो. तमाशामध्ये मुख्य फड मालक हा डफकरी असतो. तसेच काहीवेळा डफाऐवजी हालगीचाही वापर केला जातो. तमाशातील 'सोंगाड्या' हे पुरुषपात्र हास्यविनोद व शृंगाररस मांडणी करते. तमाशात 'नाच्या' या पात्राला प्राधान्य दिले जाते. नाच्याच्या पद्यात्मक संवादापेक्षा गद्यात्मक संवादाला महत्त्व दिले जाते. प्रादेशिक दृष्ट्या तमाशातील पात्र, वाद्ये व सादरीकरण यामध्ये भिन्नता आढळते. तमाशातील कलाकार बहुजन समाजातील असल्याने खेड्या-पाड्यातील माणसांशी तमाशाची नाळ जोडली गेली. तमाशामध्ये ढोलकीवाला व नाची (नाचणारीण) यांना महत्त्वाचे स्थान आहे. तमाशाच्या सुरवातीच्या कालखंडात स्त्री नाची मिळत नसल्याने बऱ्याच वेळेला पुरुषाला नाचीचे पात्र करावे लागत होते. गावोगावच्या यात्रा-जत्रांच्या वेळी तमाशांचे फड बोलविण्याचा प्रघात होता. तमाशाकडे एक मनोरंजनाचा प्रकार म्हणून लोक पाहत असत.

- **स्वयं अध्ययन प्रश्न -३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) लावणी हे कोणत्या प्रकारचे गीत आहे.

२) लावणी बहुजन समाजाला जवळची का वाटते.

३) शिवकाळात शाहीर भूषणने कोणती रचना केली.

४) दुसऱ्या बाजीराव पेशव्याने कोणत्या शाहीरावर असणाऱ्या लोभापोटी बक्षीस दिल्याची नोंद पेशवे दप्तरात मिळते.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) ज्ञानेश्वरीच्या .............. अध्यायामध्ये 'लावणी' हा शब्द आला आहे.

अ) १५ व्या ब) १६ व्या क) १७ व्या ड) १८ व्या.

२) ............ या शाहिरांने शिवचरित्र कथा या विषयावर सन १७६५ च्या दरम्यान लावणी रचल्याचा उल्लेख मिळतो.

अ) होनाजी बाळा ब) गंगाधर क) साताप्पा ड) प्रभाकर

३) ............ या शाहिराने लावणी या लोककलेला सुशिक्षित समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली.

अ) प्रभाकर ब) साताप्पा क) राम जोशी ड) माध्वनाथ

४) ............ या अभ्यासकांनी लावणीचे शाहिरी लावणी, बैठकीची लावणी व फडाची लावणी

असे तीन प्रकार पाडले.

अ) श्री. म. वा. धोंड  ब) डॉ. शरद घाटे  क) राजा मंगळवेढेकर ड) शामजी नाईक काळे

४) ............. हा लोकनाट्य प्रकार आहे.

अ) पोवाडा  ब) दशावतार  क) तमाशा  ड) चित्रकथी

५) ........... यांनी रचलेल्या भारूडामध्ये तमाशाचा उल्लेख मिळतो.

अ) संत तुकाराम  ब) संत चोखामेळा  क) संत एकनाथ  ड) संत रोहिदास

६) तमाशाची सुरूवात ........... ने केली जाते.

अ) वग  ब) गणगौळण  क) बतावणी  ड) मुखडा

**३.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-**

**● स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - १**

**अ)** १) पोवाड्याच्या परिच्छेदाला 'चौक' असे म्हणतात.

२) अज्ञानदासाने अफजलखानवध प्रसंगावर सन १६५९ साली पोवाडा रचला.

३) छत्रपती संभाजी महाराजांच्या दरबारात मोहनलाल व मतिराम हे भाट होते.

४) शाहीर अनंत फंदी यांचे मुळ गाव संगमनेर होते.

५) परशराम हा शाहीर दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारात होता.

६) सगनभाऊ हा शाहीर मुसलमान धर्माचा होता.

७) होनाजी बाळा या शाहीराचे पूर्ण नाव होनाजी सयाजी शिलारखाने असे होते.

८) मध्ययुगात संत एकनाथांनी अनेक लोकप्रिय भारूडे रचली.

९) भरवाड ही कानडी धनगरांची जात आहे.

**ब)** १) - अ) पराक्रमाचे गीत  २) - क) अफजलखान वध

३) - क) दृकश्राव्य माध्यम  ४) - ब) तुळशीदास

५) - अ) खर्ड्याची लढाई  ६) - ब) ब्राह्मणांचे राज्य जोरावर

७) - क) प्रभाकर  ८) - अ) धनगर

९) - ब) दृकश्राव्य  १०) - ड) भारूडे

**● स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - २**

**अ)** १) दशावतार ही नाट्यकला महाराष्ट्र व गोवा राज्यात प्रसिद्ध आहे.

२) कोकणात देवळी जातीचे लोक दशावतारी नाटकांचे खेळ करतात.

३) महाराष्ट्रात चित्रकथीच्या पिंगुळी व बैठणी या दोन शैली प्रसिद्ध आहेत.

४) चित्रकथी समाजातील लोक बाहुल्यांचे खेळ करीत असल्याने त्यांना बाहुल्याकार म्हणतात.

**ब)** १) - अ) दशावतार २) - ब) दासबोध

३) - अ) श्यामजी नाईक काळे ४) - क) खळनाथ

५) - क) चित्रकथी ६) - अ) ठाकर

**● स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - ३**

**अ)** १) लावणी हे लोकगीत आहे.

२) कारण लावणीत वर्णन केलेले विविध विषय समाजातील विविध अंगाना स्पर्श करून जातात.

३) शिवकाळात शाहीर भूषणने शिवबावणीची रचना केली.

४) दुसऱ्या बाजीरावाने होनाजी बाळा या शाहीरावर असणाऱ्या लोभापोटी बक्षीस दिल्याची नोंद पेशवे दप्तरात मिळते.

**ब)** १) - ब) १६ वा अध्याय २) - ब) गंगाधर

३) - क) राम जोशी ४) - ब) डॉ. शरद घाटे

५) - क) तमाशा ६) - क) संत एकनाथ

७) - ब) गणगौळण

## ३.४ सारांश :

मध्ययुगीन काळात विविध प्रकारची काव्ये बहरास आली. या काव्य प्रकारानी मराठी भाषिकांच्या मनावर खोल ठसा उमटविला. संतांचे अभंग, भारूडे, गवळणी अशा भक्ती काव्यप्रकारा बरोबरच शाहीरी काव्य रचनेलाही सुरूवात झाली. पोवाडा, लावणी, तमाशा या माध्यमातून सामाजिक चालिरिती, परंपरा, राजकीय जीवन अशा विविध विषयावर रचना केल्या. तर दशावतार चित्रकथी कलामधून धार्मिक पुराणकथा प्रेक्षकासमोर सादर करण्यात आल्या.

मराठेशाहीत पोवाडा या कथाकाव्यप्रकारास अधिक उत्तेजन व प्रेरणा मिळाली. पोवाडा गायनामध्ये कोणतेही लिखित नियम नव्हते. पोवाड्यांमधून एखाद्या पराक्रमी वीराचे वर्णन, युद्ध अथवा लढाईचे वर्णन केले जात असे.

तत्कालीन पोवाड्यांच्या बहुतांश रचना ऐतिहासिक घटना व प्रसंगावर झाल्या आहेत. पुढील काळात ऐतिहासिक घटना बरोबर, पौराणिक कथा, देवदेवतांची चरित्रे, सामाजिक समस्या, थोर पुरुषांची चरित्रे याविषयांवरही पोवाड्यांची निर्मिती झाली. पोवाडा हे एक दृकश्राव्य माध्यम असून तो एक दिर्घ स्वरूपाचा काव्य प्रकार आहे. पोवाड्यातील परिच्छेदाला चौक असे म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून पेशवे कालखंडापर्यंत पोवाड्यांची रचना अनेक शाहीरांनी केली. यामध्ये आज्ञानदास, तुळशीदास, यामाजी, अनंत फंदी, परशराम, प्रभाकर, सगनभाऊ होनाजी बाळा हे होत.

भारूड हा मराठी वाङ्मयातील एक काव्य प्रकार आहे. संत एकनाथ महाराजांनी रचलेली भारुडे लोकप्रिय झाली. त्यांनी भारूडांमधून सर्वसामान्यांच्या जीवनातील विविध विषय घेऊन भारूडे रचली. संत ज्ञानेश्वरापासून संत तुकारामांच्यापर्यंत झालेल्या भारूडांच्या रचनानी समाजला स्वधर्मविषयक जाणीव निर्माण करून दिली. याचमुळे छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीसाठी पोषक वातावरण बनले. भारूडांची रचना करताना त्यातील रूपके ही तत्कालीन कालखंडातील नित्य परिचयाची असणारी म्हणजे डोंबारी, ज्योतिषी, कोल्हाटी, महारीण, जागल्या, गारूडी, भूत्या, बाळसंतोष, कुत्रा, बैल, पोपट, एडका, टिटवी, विंचू, सर्प यासारखी असत. गायन, नाट्य, वक्तृत्व आणि संगिताच्या मिलाफातून भारूडांचे सादरीकरण केले जात असे.

महाराष्ट्रातील कोकण व गोवा राज्यात प्रसिद्ध असलेली नाट्यकला म्हणजे दशावतार होय. रामायण, महाभारत व पुराणातील कथा त्यातील प्रेरणादायी प्रसंगावर दशावताराचे नाटक केले जाते. दशावतारी खेळामध्ये 'पेटारा' सर्वात महत्त्वाचा भाग मानला जातो. पेटाऱ्यात गणपतीचा मुखवटा, सरस्वतीचा मुकुट, दशावतार खेळातील इतर पात्रांचे मुखवटे ठेवलेले असतात. दशावतारी खेळ अथवा नाटक सादर करताना पुर्वरंग व उत्तररंग अशा दोन भागात केले जाते. अलिकडे दशावतारी नाटकामध्ये 'बाल दशावतार' प्रकारही रूढ झाला आहे.

महाराष्ट्रात एकेकाळी चित्रांच्या आधारे कथन करणारी चित्रकथी कला लोकप्रिय अवस्थेत होती. चित्रकथी कला सादर करणारे लोक पूर्वी पानावर चित्रे काढीत. पुढे कागदाची उपलब्धी झाल्यावर त्यावर चित्रे काढू लागले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ व पिंगुळी परिसरातील ठाकरसमाज चित्रकथी समाज म्हणून ओळखला जातो. चित्रकथी आपल्या कलेचे सादरीकरण करताना प्रथम रिद्धी-सिद्धीसह गणपती व सरस्वती यांना वंदन करून आपल्या चित्रांचे सादरीकरण करून कथनास सुरूवात करतात. या कलाप्रकारामध्ये पराक्रम, कारूण्य भावना, प्रणयकथा, धार्मिक पुराणकथातील प्रसंग, भविष्यावर चित्रकथन केले जाते.

मराठा कालखंडात 'लावणी' हा कलाप्रकार बहरास आला. या कलेमध्ये गायन, नृत्य आणि नाट्याची जोड असल्याने श्रोत्यांनी लावणीला प्रचंड प्रतिसाद दिला. ढोलके, टाळ, कडे, खंजिरी, तुणतुणे या वाद्याच्या साथीने लावणी नाचून व गाऊन सादर केली जाते. उत्तर पेशवाईच्या कालखंडात दुसऱ्या बाजीरावानंतर लावणी कलेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. डॉ. शरद घाटे यांनी शाहिरी लावणी, बैठकीची लावणी, फडाची लावणी असे लावणीचे प्रकार सांगितले आहेत. मराठी शाहिरी वाङ्मयामध्ये लावणी कलेचे शृंगारीक, आध्यात्मिक रचनेबरोबर समाजातील विविध विषयावर कवने रचण्यात आली.

महाराष्ट्रामध्ये तमाशा या लोकनाट्य प्रकाराने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. गोंधळ, जागरण,

दशावतार, ललीत या कथाप्रकाराच्या रचनेमध्ये तमाशाचा उगम सापडतो. मुसलमान राजवटीत बादशाही वैभवाचा परिणाम म्हणून अनेक चैनी व मनोरंजनाचे प्रकार रूढ झाले. पुढे मराठेशाहीतही या मनोरंजन प्रकाराचे अनुकरण करण्यात आले. पेशवाईच्या अखेरच्या कालखंडात कवींचे भेदींकाच्या ताफ्यासारखे ताफे होते. या ताफ्यातूनच तमाशा सादरीकरणाला सुरूवात झाली. तमाशाचा प्रसंग गणगौळणीने करून लावणी, बतावणी, वग या स्वरूपात तमाशा प्रेक्षकासमोर सादर केला जातो. तसेच तमाशात डफकरी, सोंगाड्या, नाच्या, नाची (नाचणारीण), डोलकीवाला ही पात्र महत्त्वाची मानली जातात.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) प्रेक्षकासमोर सादर केली जाणारी कला म्हणून पोवाड्यांचे वर्णन करा.

२) भारूड या लोककलेचा आढावा घ्या.

३) दशावतार व चित्रकथी कलांची माहिती विशद करा.

४) लावणीची व्युत्पत्ती सांगून स्वरूप, परंपरा व लावणीचे प्रकार सांगा.

५) तमाशा या लोकनाट्य कले विषयी माहिती द्या.

**ब) टीपा लिहा.**

१) मराठेकालीन पोवाडाची वाटचाल.

२) मराठेकालीन शाहीर

३) भारूड

४) दशावतारी नाटकांचे स्वरूप

५) चित्रकथी

६) लावणीचे प्रकार

७) तमाशाची परंपरा.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ) :


१) य. ना. केळकर (संपा.), ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास.

२) पोवाडा, भारूड, दशावतार, चित्रकथी, लावणी, तमाशा या लोककलांच्या मराठी विश्वकोशातील नोंदी.

३) विश्वनाथ शिंदे, मराठी शाहिरी पोवाडा

४) राजा मंगळवेढेकर, भारूड

५) डॉ. वसंत जोशी, एकनाथाची निवडक भारूडे

६) रा. अ. देखे, भारूड वाङ्मयातील तत्वज्ञान

७) डॉ. नामदेव व्हटकर, तमाशा : कला आणि साहित्य

८) वि. कृ. जोशी, लोकनाट्यांची परंपरा.

❑❑❑

## घटक -४

# कला, स्थापत्य आणि ऐतिहासिक वास्तू

**(Art, Architecture and historical monuments)**

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ किल्ले, गढी, वाडे

  ४.२.२ चित्रकला, भित्तिचित्रे

  ४.२.३ नगररचना, पाणी पुरवठा, लाकूड काम

  ४.२.४ आहार, पेहराव, अलंकार

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकातून आपल्याला खालील बाबी लक्षात येतील -

- मराठाकालीन किल्ले, गढी, वाडे यांचे स्थापत्य कसे होते ?
- मराठाकालीन चित्रशैलीची वैशिष्ट्ये कोणती होती ?
- मराठाकालीन नगररचना कशाप्रकारे होती ?
- मराठाकालीन सौंदर्याची साधने कोणती होती ?

## ४.१ प्रस्तावना :

कोणत्याही राज्याचे भरभराटीचे साधन म्हणून विविध कलांच्या विकासाकडे पाहिले जाते. मध्ययुगीन काळात छ.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. त्याचे पुढे साम्राज्यात रुपांतर झाले. या

मराठेशाहीच्या साम्राज्याच्या विकासामुळे शिल्पकला, चित्रकला, वास्तूकलेला बऱ्याच प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. मराठा सरदारांचे साम्राज्याच्या विस्तारामुळे गुजरात, माळवा, राजस्थान, आग्रा येथील राजेरजवाड्यांशी सहसंबंध प्रस्थापित झाले. या सहसंबंधाचा प्रभाव येथील संस्कृतीवर पडला. यामुळे येथे नवीन कला अविष्कार निर्माण झाला. मराठेशाहीमध्ये कला व स्थापत्य तत्कालीन परिस्थिती व प्रभाव यांच्यामुळे बदलत गेले. मराठशाहीमधील या कला, स्थापत्य व स्थळांबद्दल लोकांच्यामध्ये कुतूहल आहे. मराठाशाहीचा हा सांस्कृतिक वारसा आजही येथील सांस्कृतिक व्यवस्थेवर प्रभाव टाकतो. प्रस्तुत घटकामध्ये मराठाशाहीच्या वारशाच्या ठळक वैशिष्ट्यांची माहिती घ्यावयाची आहे.

## ४.२ विषय विवेचन :

पहिल्या विभागामध्ये किल्ले, गढी, वाडे यांची मांडणी करणार आहे. दुसऱ्या विभागामध्ये चित्रकला व भित्तिचित्राचा आढावा घेणार आहे. तिसऱ्या विभागात नगररचना, पाणी पुरवठा, लाकूडकाम आणि चौथ्या विभागात आहार, पेहराव व अलंकार याविषयी माहिती घेणार आहे.

### ४.२.१ किल्ले, गढी आणि वाडे

**अ) किल्ले :**

मराठा कालखंडामध्ये आजच्या प्रमाणे यद्ध तंत्राची प्रगती झालेली नव्हती. त्यावेळी विशिष्ट अशा भौगोलिक परिस्थितीमुळे किल्ल्यांना राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. राज्यकर्त्यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अवघड जागी शत्रू पासून सुरक्षित राहिल अशा ठिकाणी किल्ल्यांची निर्मिती केली होती. किल्ल्यांचे संरक्षण व्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेऊन त्याच्या बांधनीकडे व दुरुस्तीकडे राज्यकर्त्यांनी लक्ष दिले होते. तत्कालीन युद्धाची साधने व युद्ध पद्धतीचा विचार करून किल्ल्यांची बांधणी करण्यात आली होती. चक्रव्युही, गोमुखी द्वाररचना, गोलाकार अरबी, तुर्क व रोमन स्थापत्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. भूईकोट, डोंगरी किल्ले आणि जलदूर्ग या किल्ल्यांची रचना सामान्यतः पुढीलप्रमाणे दिसून येते.

- **जागेची निवड :**

महाराष्ट्रामध्ये घाटमार्ग, व्यापारी केंद्रे व युद्धशास्त्राच्या दृष्टीने मोक्याच्या ठिकाणी किल्ले बांधण्यात येत असत. मराठ्यांनी भौगोलिक परिस्थितीचा विचार करून किल्ल्यांची बांधणी केलेली दिसून येते. शत्रूला किल्ल्यामध्ये सहजासहजी प्रवेश मिळणार नाही अशा ठिकाणी त्याची निर्मिती केली.

- **तटबंदी / बुरुज :**

किल्ल्यांना दगडी तटबंदीने संरक्षण केले जात असे. जेथे शत्रूचे आक्रमण होणे तुलनेने सोपे आहे. तेवढाच भाग तटबंदीने मजबूत केला जातो. या तटबंदीमध्ये ठराविक अंतरावर, नियमितपणे बुरुज असत. या बुरुजांचा उपयोग हा टेहाळणीसाठी केला जात असे. बुरुज खालून वर निमुळते होत गेले असत. सर्वांत वर कमानींची रचना असे. त्यांना 'चर्चा'असे म्हणत. या चर्चांच्या मागे लपून निगराणी करणे शक्य होई.या चर्चाच्या खाली चौकोर अशी छिद्र असत. यातून बाण, भाले, गोळ्यांचा वर्षाव केला जात असे. यांना

'जंग्या' म्हणत, वर दोन बुरुजांना जोडून तटबंदीच्या आतील बाजूला पहारा देण्यासाठी छोटा रस्ता असे. या बुरुजांच्या आतून जीने काढलेले असत.

● **खंदक व पडकोट :**

भूईकोटाला सर्व बाजूने तटबंदी आणि बुरुज बांधून बंदोबस्त करावा लागत असे. इतकेच नव्हे भोवताली रुंद असा खंदकही खोदला जात असे. या खंदकात सदैव पाणी ठेवण्याची सोय केलेली असे. खंदकाच्या पलिकडे पुन्हा एक तटबंदीचा वेढा असे. याला 'पडकोट' असे म्हणत. या पडकोटानंतर संरक्षण फळी म्हणजे 'रेवणी' असे. याठिकाणी रामोशी जमातींची शूर माणसे किल्ल्यांचे संरक्षण करीत. मराठापूर्व महाराष्ट्रामध्ये नलदुर्ग, धारुर, उदगीर, कंधार इ. ठिकाणी उत्तम भुईकोट किल्ले निर्माण केले होते.

● **प्रवेशद्वार :**

डोंगरी किल्ल्यांना तटबंदीमध्ये वेगवेगळ्या दिशांना दोन-तीन मोठी प्रवेशद्वार असत. या प्रवेशद्वारांना साधारणत: तेथील रस्ते, पायथ्यावरील ज्या गावातून येई त्या गावाचे नाव दिलेले असे. उदा. पाल दरवाजा, गुंजवणे दरवाजा (राजगड) अथवा आकारावरून रायगड येथील महादरवाजा अशी नावे दिली जात असत. या प्रवेशद्वारांना लाकडी दरवाजे बसविण्यात येत असून मजबूतीसाठी व धडकांच्या संरक्षणापासून वाचविण्यासाठी अणकुचीदास खिळे बसविण्यात येत. किल्ल्यांवरील प्रवेशद्वार सरळ किल्ल्यामध्ये उघडत नसे. हा दरवाजा आतल्या बाजूने संरक्षित केला जात असे. तेथून डाव्या अथवा उजव्या बाजूला वळून गेल्यावर आपण किल्ल्यामध्ये प्रवेश करू शकतो. शत्रू सरळ किल्ल्यामध्ये येऊ नये यासाठी अशी उपाययोजना केली होती. हे प्रवेशद्वार केवळ राजासाठी उघडले जात असे. अन्यथा दरवाजाच्या आतून छोटा दरवाजा काढलेला असे. त्याला 'दिंडी दरवाजा' असे म्हटले जाई. या दरवाजातून दैनंदिन ये-जा होत असे.

● **देवडी :**

प्रवेशद्वाराच्या आतमध्ये प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूस ओवरी दिसून येते. त्यास 'देवडी' म्हणत. या देवडीचा उपयोग पहारेकऱ्यांच्या विश्रांतीसाठी केला जात असे. पन्हाळगडावर तीन दरवाजा, वाघ दरवाजा अशा ठिकाणी अशा देवडी आढळून येतात. तसेच देवड्यांजवळ घोड्याचे तबेलेही दिसून येतात.

● **माची :**

काही किल्ले हे उंच आणि रुंद पठारावर जरी वसले असले तरी या पठाराचे काही सुळक्यासारखे भाग पसरलेले असत. हे सुळके अतिशय अरुंद असले तरी सुरक्षित करणे आवश्यक असे. अशावेळी अशा सुळक्यांवर शिबंदी ठेवली जाई व राजासाठी याठिकाणी सदरही असे. अशा सुळक्यांना 'माची' असे म्हटले जाई. राजगडावरील सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती माची प्रसिद्ध आहेत.

● **जलव्यवस्था :**

पाणी पुरवठा बाबतीत बाराही महिने दुर्ग स्वयंपूर्ण राहिल याकडे लक्ष दिलेले आढळते. आज्ञापत्रात सांगितल्याप्रमाणे राजाने भूमिगत झरे असतील असे पठार किल्ल्यासाठी निवडावे. तशी परिस्थिती नसेल तर

खडक फोडून, टाकी करावी असा सल्लाही दिलेला आहे. रायगडावर अशी प्रचंड टाकी दिसून येतात. यामध्ये गंगासागर हत्ती तलाव हे प्रमुख पाणीसाठ्याची ठिकाणे आहेत.

● **धान्यकोठार :**

किल्ल्यावरील लोकांना आणीबाणीच्या परस्थितीमध्ये अन्नाची सोय करणे आवश्यक होते. यासाठी किल्ल्यावर धान्य कोठारे बांधली जात. अशीच प्रचंड धान्य कोठारे पन्हाळगडावर दिसतात. यांना गंगा, जमुना आणि सरस्वती अशी नावे दिली आहेत. यांचे छत चुनेगच्चीचे मजबूत असे दिसून येते. ही धान्य कोठारे सभोवतालच्या संयुक्त तटबंदीने मजबूत अशी आहेत.

● **बाल्लेकिल्ला :**

एखाद्या दुर्गाच्या सपाटीवर जर एखादा उंचवटा किंवा उंच टेकडी असेल, तर त्या भागाभोवती तट-बुरुजांची संरक्षक भिंत बांधून तो भाग अभेद्द करतात. दुर्गाच्या अशा उंचावरील भागास 'बाल्लेकिल्ला' असे म्हणतात. अशा बाल्लेकिल्ल्यामध्ये प्रशासकीय इमारती व राजाचे निवासस्थान बांधले जात असे. रायगडावरील बाल्लेकिल्ल्यामध्ये महाराज आणि राणींचे महाल आपल्याला दिसून येतात. त्याचप्रमाणे अष्टप्रधानांचे कार्यालय नजीक दिसून येतात. या जवळ दरबार, हॉल आपल्याला दिसून येतो. याचे दोन भाग दिसतात. दरबाराच्या मागील बाजूला 'दिवाणखाना' दिसून येतो. याचे दोन भाग दिसतात. दरबाराच्या मागील बाजूला 'दिवाणखाना' दिसून येतो. याच्या पुढील बाजूस सिंहासन दिसून येते. या दरबारासमोर विस्तृत पटांगण आहे. या पटांगणातच प्रजा जमत असे. आणि महाराजांचे मार्गदर्शन घेत असे. या पटांगणाच्या कडेला नगारखान्याची प्रचंड अशी इमारत आहे.

● **दारुखाना :**

किल्ल्यावर युद्धाच्या काळामध्ये दारुगोळ्याची आवश्यकता भासत असे. यासाठी किल्ल्यावर दारुगोळा साठवून ठेवण्यासाठी 'दारुखाना' या इमारतीची निर्मिती केली जात असे. ही इमारत दगड माती व चुना वापरून अतिशय मजबूत करण्यात येत असे. पन्हाळगडावर अशी दारुखाना इमारत आढळून येते.

● **मंदिरे, मशिदी :**

देवधर्माचा पगडा असलेला मध्ययुगीन समाज होता. यामुळे किल्ल्यावर मंदिरे, मशिदी अशी धार्मिक इमारती आढळून येते. एखाद्या किल्लयावर विशिष्ट अशा देवताही अधिष्ठात्री असे. उदा. प्रतापगडावर भवानी मातेचे मंदिर, शिवनेरीवर शिवाई, विशाळगडावर मलिक रेहान दर्गा.

**ब) गढी :**

मध्ययुगीन कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण अशी वतनदारी पद्धती आढळते. समाजातील सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा ठरविण्याचे साधन म्हणजे 'वतन' असे. सरदेशमुख, देशमुख, देशपांडे, पाटील या वतनदार मंडळीना समाजामध्ये एक महत्त्वाचे स्थान होते. समाजव्यवस्थेत महत्त्वाचा व्यक्ती म्हणून यांना राहण्यासाठी बहुधा गढ्या / वाडे असत. तत्कालीन परिस्थितीमध्ये मोठा वतनदार गढी मध्ये राहत होता. गावातील अनेक महत्त्वाचे निर्णय

या गढीमध्ये घेतले जात होते. त्याकाळचे मान्यवर वतनदार मंडळी राहण्यासाठी किल्ला बांधू शकत नसल्यामुळे मोठी गढी बांधून राहत असत.

या गढी परगण्यातील एका उंच ठिकाणी असत. त्यांची रचना जवळपास किल्ल्यासारखीच असे, मात्र आकाराने ती लहान असे. आतील रचना वाड्यासारखी असे. मजबूत तटबंदी आणि बुरुज, भक्कम दरवाजे, आत एकापेक्षा अधिक चौक असणारा वाडा अशी साधारण रचना या गढींची असे. या गढी उंचवड्यावर बांधल्या जात असत. तटबंदीचे संरक्षण असे त्यामध्ये भक्कम प्रवेशद्वार असे. त्या प्रवेशद्वारावर नगारखाना असे. या तटाला लागून आत काही खोल्या असत. या खोल्यांचा वापर पहारेकरी, जनावरांचा पागा व गोठा इ. कामासाठी केला जाई. थोडे आवार सोडून मध्यभागी भला मोठा वाडा असे. हा वाडा ऐपतीप्रमाणे दोन तीन मजली असे. पाण्याची सोय ही भूमिगत नळ वापरून लांबून तळ्यातून केली जाई. यातील वाड्याभोवतालच्या आवारात मैदान असून यामध्ये घोड्यांवरून रपेट, कुस्ती इ. दैनंदिन सरावाच्या गोष्टी केल्या जात. अर्थात ऐपतीप्रमाणे दोन तट, एकापेक्षा अधिक बुरुज, मैदानांची संख्या व वाड्याचे मजले इ. फरक पडत असत.

नाईक निंबाळकरांची गढी (वाठार), कदमांची गढी (साप), होळकर गढी (वाफगाव), जाधवगढी (जाधवाडी) इ. गढी आत मराठाकालीन स्थापत्य टिकवून आहेत. पुण्यातील शनिवारवाडा हा नावाने वाडा असला तरी तो एक गढीचा प्रकार आहे. अशा गढींचे आता पर्यटन विषयक महत्त्व वाढू लागलेले आहे. जाधववाडी गढीचे रुपांतर रिसॉर्ट झालेले आहे. याठिकाणी पर्यटकांना राहता येते. तसेच मराठाकालीन स्थापत्याचे वैभव अनुभवताही येते.

**क) वाडे :**

प्राचीन काळापासून, प्रतिष्ठीतांचे वाडे आपल्याला खेड्यापाड्यातही दिसून येतात. मराठकाळाचा विचार करता, तिच्या विस्ताराच्या काळातील वाडे आज शिल्लक आहेत. हे वाडे सातारा, कोल्हापूर, पुणे तसेच मराठा सरदारांच्या जहांगीरीच्या तसेच मूळच्या ठिकाणीही तयार झालेले आहेत. प्रतिष्ठित लोक आपल्या ऐपतीप्रमाणे वाडा बांधत असत. हा वाडा उंच भिंतीनी सुरक्षित केलेला असे. दर्शनी भिंतीच्या मध्ये एक दरवाजा आणि शेजारी पडवी असे व भिंतीच्या वरच्या बाजूला छोट्या खिडक्या असत.

मराठेशाहीतील वाडा हा विलोभनीयता व उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून बांधलेला एक वास्तुप्रकार होता. त्याचा तळमजला भक्कम दगडी बांधणीचा असे. वाड्याची रचना लाकडी खांब व तुळ्या यांच्या सांगड्याभोवती केलेली असे. वरच्या मजल्यावरचे बांधकाम विटांचे असे व भिंती बऱ्याच जाड कधीकधी पाच-सात फुट रुंद असत व त्यांमधून जिने काढलेले असत. वाड्याच्या बहुतेक सर्व सभागृहातून भित्तिचित्रे काढलेली असत. दिवाणखण्याचा छत आकर्षक असे, त्यांना पाणपट्ट्या, त्यांच्या कोपऱ्यावर लोलक, भौमित्तिक, नक्षीकाम, त्यांच्या जोडीला वेलपत्ती व मधेमध्ये पोपटांच्या-मोरांच्या आकृत्या कोरलेल्या असत.

सामान्यत: वाडे दुमजली किंवा तीन मजली असत, मात्र पेशव्यांचा शनिवारवाडा सात मजली होत. तर मोरोबादादांचा वाडा सात चौकी होता. नाना फडणीसांचा चार चौकी होता. वास्तूशैलीच्या दृष्टीने या चौकामुळे सर्व दालनांमध्ये भरपूर उजेड मिळत असे. शिवाय हवा खेळती राही. वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून पहिल्या

चौकात प्रवेश केल्यानंतर समोरच्या बाजूला गृहस्वामीची बैठक, डाव्या-उजव्या बाजूला प्रवेशानंतर ओवऱ्यात कचरी-कारकुनांचा फड, सुरूवातीला देवडी-संरक्षण शिपाई. तिथे अनोळखी व्यक्तीची शहानिशा करण्यास येई. बैठकीच्या उजवीकडे देवघर असून सभोवती लाकडी जाळी असे. पुढे गेल्यावर माडीवर जाण्यासाठी दोन्ही बाजूंस जिने असत. त्यामुळे माजघर असून तेथे स्त्री वर्गाची उठबैस असे. त्यापुढे दुसरा चौक किंवा आतला चौक त्या भोवतीच्या खोल्यांत स्वयंपाकघर, जेवणघर अशी व्यवस्था होती. याच चौकात तुळशी वृदावन आणि त्याच्या आजूबाजूला स्नानगृहे व अगदी मागे शौचालय असे. याच पद्धतीने जसजसे चौक वाढत जातील त्याप्रमाणे वेगवेगळी दालने बांधलेली असत.

वाड्याच्या पहिल्या मजल्यावर 'सदर' किंवा सभेचा दिवाणखाना असे. शनिवारवाड्यातील गणेश महल हा त्याकाळी दरबार हॉल म्हणून प्रसिद्ध होता. अशा सभागृहात कीर्तन, नृत्य-गायनादी कार्यक्रमही साजरे होत. या सभागृहाच्या भिंतीत घरांतील पडदानशील स्त्रियांसाठी खास जाळ्या ठेवलेल्या असत. श्रीमंत सरदारांच्या वाड्यामध्ये आरसेमहल, चित्रशाळा, पोथीशाळा, शस्त्रागार अशी स्वतंत्र दालने असत. शनिवारवाडा (पुणे), आदालतवाडा (सातारा), पटवर्धन वाडा (तासगांव), रंगमहाल (चांदवड), मोतीबाग (वाई) इ. असे महाल आढळतात. वाईचा मोतीबाग वाडा श्रीमंत रास्ते यांचा उन्हाळी निवास (समर पॅलेस) होता. या ठिकाणी दुसऱ्या मजल्यावर छोटासा आरसे महाल, रंगमहाल असून शेजारच्या दालनासह सर्वत्र उत्तम प्रकारचे भित्तिचित्रे रंगविलेली आहेत. या वाड्यातील बाग, तिला लागणारे पाणी, खापरी नळांद्वारे फिरविले असून कारंज्याकरीता खास पर्शियन व्हील हे भारतात क्वचित आढळणारे तंत्रज्ञान वापरले आहे. शिवाय पोहण्यासाठी खास विहिर बांधलेली होती व त्यात कोनाडे ठेवले होते.

एकंदरीत मराठेशाहीतील वाड्यांवर गुजरात व दिल्ली येथील वास्तुशैलींचा प्रभाव आढळतो. मात्र त्यांत काही स्थानिक लोक घटक ही आढळतात. मराठेशाहीतील काही वाडे आजही काष्ठशिल्पे, रेखीव कलाकुसर असलेले सुरुचे खांब, आखीव-रेखीव महिरपी, सज्जांमधील नक्षीकाम, भित्तीचित्रे ह्या गोष्टी टिकवून आहेत. काही वाड्यात कारंज्याच्या खुणा, लादन्या, तळघरे, कोठ्या पाहिल्यावर आपण आश्चर्यचकित होतो. काही वाडे आज जरी नामशेष होण्याच्या अवस्थेकडे चालले असले तरी त्यांचे घडीव तुळतुळीत लांबरुंद जोती, त्यावर खांबाचे तळखडे, चार-चार फूटी जाडीच्या पडलेल्या भिंती, चुन्यामधील केलेले बांधकाम, चोरवाटा पाहवयास मिळतात. आज बहुतेक वाडे अपार्टमेंटच्या नावाखाली नामशेष झालेले दिसून येतात.

- **स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) ............. हा किल्ला भूईकोट प्रकारात मोडतो.

अ) रायगड  ब) नळदुर्ग  क) सिंहगड  ड) पन्हाळा

२) किल्ल्यावर राजाचे निवास स्थान ........... येथे असते.

अ) माची  ब) खंदक  क) बाल्लेकिल्ला  ड) अंबरखाना

३) नाईक-निंबाळकरांची गढी ............. येथे आहे.

अ) जाधववाडी ब) वाठार क) पुणे ड) इंदापूर

४) ............. या गढीचे रिसॉर्ट मध्ये रुपांतर झाले आहे.

अ) नाईक निंबाळकर ब) होळकर क) जाधववाडी ड) कदमांची गढी

५) अदालतवाडा ............... येथे आहे.

अ) पुणे ब) कोल्हापूर क) सातारा ड) वाई

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) वाड्यामध्ये कोठे नाचगाणे होत असे?

२) माची म्हणजे काय ?

३) गंगा, जमुना, सरस्वती ही धान्य कोठारं कोणत्या किल्ल्यावर आहेत ?

४) शनिवारवाडा कोठे आहे ?

५) मोतीबाग वाडा कोठे आहे ?

## ४.२.२ चित्रकला व भित्तीचित्र :

### अ) चित्रकला :

महाराष्ट्रात चित्रकलेची फार प्राचीन परंपरा आहे आणि मराठा कालखंडातही हे तिचे सातत्य टिकून होते. मराठा साम्राज्य विस्ताराच्या काळामध्ये आपला भारताच्या विविध भागांशी परिचय झाला. मराठ्यांचे राजकीय संबंधाबरोबर सांस्कृतिक संबंध वाढीस लागले. यातून चित्रकलेला प्रोत्साहन मिळाले. मराठा छत्रपती व सरदारांनी कलाकारांना राजश्रय दिला. या काळात छत्रपती शाहू, पेशवे, सरदार यांनी आपल्या पदरी उत्तम चित्रकारांना ठेवले. यामध्ये राघो, तानाजी, माणकोजी इ. अनूपराव सारख्या चित्रकाराला परराज्यातून महाराष्ट्रामध्ये बोलावून घेतले गेले होते. त्याच बरोबर जेम्स वेल्स, डॅनियल सारख्या युरोपियन चित्रकारांना निमंत्रित केले गेले. या काळात विविध चित्रशैलीचे प्रकार पाहावयास मिळतात ते पुढीलप्रमाणे -

- **पटचित्र :**

पटचित्र विविध व्रतांच्या दरम्यान काढण्यात येत असत. यातील 'संक्रांत फलपट' हे सर्वसाधारणपणे दिसणारे पटचित्र होय. यातील कागदावर, वरील वाहन आरूढी संक्रांती देवतेचे आणि उपदेवतेचे चित्र दिसून येते. या चौकटींच्या खालील बाजूस व्रत दिलेले असे. तसेच श्रावण अमावस्येवेळी 'पिठोरी व्रत' साजरे करताना 'पिठोरीपट' सुद्धा आपल्याला दिसून येतील. या पिठोरीपटावर ६४ योगीनी या मुख्य देवता असतात. या योगीनी बरोबर बाळंतिणी दिसतात. शिवाय कृष्णलिला, शिवपार्वती हेही विषय आहेत. हे पट धार्मिक उद्देशासाठी जरी निर्माण केले तरी दैनंदिन जीवनातील प्रसंगही यात चित्रित केलेले दिसून येतात.

● **सचित्र हस्तलिखितांच्या पोथ्या :**

मुख्यत्वे गुजराती जैन मठांमध्ये सचित्र हस्तलिखितांची परंपरा सुरू झाली. याठिकाणी विविध धार्मिक ग्रंथ, सचित्र हस्तलिखित स्वरुपात जतन करून ठेवले जायचे. याचा नित्य पठणासाठी उपयोग होत असे. पुढे ही परंपरा महाराष्ट्रामध्ये आली. मग महानुभाव, रामदासी, नाथ इ. सांप्रदायी मठांमधून अशा सचित्र हस्तलिखिते दिसून येतात. मराठा कालखंडामध्ये मोठ्या संख्येने हस्तलिखित ग्रंथ तयार झाले. सुवाच्य, सुडौल अक्षरात, लिहिलेल्या या ग्रंथातून कथेच्या अनुषंगाने चित्रे रंगविली जात. या चित्रकामात मोठ्या प्रमाणात सोन्याचा वापर करून हस्तलिखितांचे वैभव वाढविण्याचा प्रयत्न केला जात असे. गीता, भागवतपुराण, देवीसप्तशती, ज्ञानेश्वरी, शिवलीलामृत, पांडवप्रताप, गुरुचरित्र इ. ग्रंथांच्या अनेक सचित्र प्रती तयार झाल्या.

● **चित्रसंग्रह :**

कागदावर लहान-लहान चित्रे काढून त्याचा एक संग्रह बनविला जाई. या चित्रांमध्ये एखाद्या विषयास धरून चित्रनिर्मिती केली जात असे. या चित्रसंग्रहाच्या माध्यमातून एखादा विषय सुरेखपणे मांडला जाई. पेशव्यांनी व मराठा सरदारांनी आपल्याला हवी तशी चित्रे काढून आपले चित्रसंग्रह समृद्ध केले. या चित्रसंग्रहात रणरागिणी, नायक नायिका, राज दरबारात राजपुरुषांची भेट, मिरवणूक, कामशास्त्र, आसनातील युगल जोड्या, योगमार्गाची चित्रे याचबरोबर संगीतातील 'ताल' या विषयावर चित्रमाला निर्माण झाल्या. अशा प्रकारे चित्रसंग्रह शाहू महाराज, थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, सवाई माधवराव, नाना फडणीस, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर यांनी काढून घेतलेली दिसून येतात.

● **पत्रिका (कुंडली) :**

मराठा कालखंडामध्ये विविध कुंडल्यांचा प्रकारही प्रचलित दिसतो. १०-१२ इंच रुंद आणि १२ फूट लांब अशा कागदावर या पत्रिका काढल्या जात. अशा जन्मपत्रिकांवर आपल्याला विविध ग्रहांची, राशींची चित्रे दिसून येतात.

● **काचचित्र :**

मराठेशाहीच्या सरत्या काळामध्ये काचचित्रे हा पाश्चात्य आणि चीन देशातील चित्रप्रकार महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. देवघराच्या तोरणावर पौराणिक प्रसंग दाखविणारी काचचित्रे बसविण्याची पद्धत होती. व्यक्तीचित्रे तसेच इतर धार्मिकेतर विषयांची चित्रेही काचेवर काढली जात होती.

● **भित्तिचित्रे :**

पेशवाईतील शाहीर प्रभाकर याने आपल्या एका लावणीतून कोणा कुलवंत स्त्रीचे मोठे राजस शब्दचित्र रेखाटले आहे. हवेलीतल्या चित्रकामाचे वर्णन करून शाहीराने या चित्रकामातून साकारलेल्या निरनिराळ्या पौराणिक प्रसंगाचा मोठा बहारदार तपशील दिलेला आहे. शाहीर प्रभाकराच्या लावणीतील हे वर्णन काल्पनिक नसून या वर्णनावर हुकूम चित्रकामाची गर्दी दाखविणाऱ्या अनेक वास्तू आजही अस्तित्वात आहेत. महाराष्ट्रात उत्तर मराठा काळात सर्वत्र बांधकामाची जणू लाटच आली होती. सजावटीच्या इतर प्रकाराबरोबर

या बांधकामातून, भित्तिचित्रकाला प्राधान्य मिळाले. महाराष्ट्रात या काळात, छत्रपती पेशवे, सेनापती, सरदार आणि इतर उच्चवर्गीयांनी, धनिकांनी आपल्या वाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात भित्तिचित्रे साकारलीत.

- **भित्तिचित्रे जपणाऱ्या वास्तू :**

मराठेशाहीमध्ये अनेक मंदिरे आणि वाडे यांच्या भिंतीवर भित्तिचित्रे काढण्यात आली. साताऱ्याचा नवा राजवाडा, वाईचा पटवर्धनांचा वाडा, रास्ते सरदारांची मोतीबाग, मेणवलीचा नाना फडणविसांचा वाडा, चांदवडचा होळकरांचा रंगमहल, निपाणीचा निपाणीकर देसाई यांचा वाडा, पुण्याचा नाना वाडा इ. मुख्यत्वे समावेश होतो. याखेरीज अनेक लहान मोठ्या हवेल्यांतून चित्रकाम दृष्टीस पडते. पाषाण येथील सोमेश्वराच्या मंदिरावरही भित्तिचित्र साकारलेले आहे. माळव्यात मराठ्यांचा अंमल बसल्यावर, मराठा राज्यकर्त्यांनी व इतर उच्चभ्रू मराठा मंडळीनी अनेक भव्य वाडे आणि देवालय बांधलीत. इंदूर, महेश्वर, उज्जैन, धार, देवास, ग्वाल्हेर याठिकाणी देखण्या वास्तू उभारल्या आणि या वास्तू भित्तिचित्रांनी नटविण्यात आल्या.

या भित्तिचित्राचे विषय प्रामुख्याने पौराणिक असून त्यात रामायण, महाभारत, भागवत यांतील कथानके, दशावतार, कृष्णलीला, महिषासूरमर्दिनी, सरस्वती, गणपती, विष्णू, शंकरादी देवता यांचा स्वतंत्र तसेच समूह चित्रे आहेत. मेणोलीकर जोशी वाड्यामध्ये श्रीकृष्ण आणि अष्टनायिका कालियामर्दन, श्रीकृष्णराधा, शंकर पार्वती दांपत्य चित्रे, रामसिता दर्शन आणि मारुती अशी देवतांची चित्रे आहेत. उज्जैयनी येथील जनार्दन मंदिरातील भिंतीवर विठ्ठल साकारलेला आहे. तर याच मंदिरातील एका भिंतीवर ज्ञानोबा, एकनाथ, नामदेव, तुकाराम या महाराष्ट्रीय संतमंडळीचे चित्रदर्शन होते. या धार्मिक चित्रांव्यतिरिक्त शिकारीची दृष्ये, पक्षांचे मिलन, वृक्षवेली, मिरवणूकीची, राजपुरुषांच्या भेटीची सुरेख चित्रे पहावयास मिळतात.

- **भित्तिचित्रांचे तंत्र :**

कुडाच्या किंवा कच्च्या विटेच्या भिंतीवर पातळ चुना, भाताचा भुसा, डिंक यांचे मिश्रण करून त्याचा पातळ गिलावा देऊन संबंध भिंत गुलाबी खनिज रंगाने रंगवून त्यावर चित्रकाम करीत. लाल, हिरवा, पिवळा आणि पांढरा हे रंग एकमेकांत मिसळून रंगाच्या भिन्न छटा तयार करीत असत. आकृतीभोवती काळ्या रंगाची ठसठसीत बाह्य रेषा कठीत. संबंध भिंत हाच जणू कॅनव्हास समजून त्याचे वेगवेगळे भौमितिक चौकोण तयार करीत.

- **स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) संक्रांत फलपट हा ............... चित्राचा प्रकार आहे.

अ) पोथ्या  ब) पटचित्र  क) पत्रिका  ड) काचचित्र

२) ............... या चित्रकाराला परराज्यातून आणले.

अ) अनुपराव  ब) अनंत फंदी  क) माणकोजी  ड) राघो

३) भीत्तिचित्रांची पृष्ठभूमी ................ या रंगात तयार करून घेतली जाई.

अ) निळा ब) हिरवा क) गुलाबी ड) पिवळी

४) ............... या मंदिरात भित्तीचित्र दिसून येते.

अ) अंबाबाई ब) पंढरपूर क) तुळजापूर ड) सोमेश्वर

५) पिठोरी व्रतामध्ये मुख्य देवता .................. असत.

अ) भवानी ब) पार्वती क) योगीनी ड) महालक्ष्मी

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) पेशवेकाळात कोणत्या युरोपिय चित्रकारांना निमंत्रित करण्यात आले होते.

२) सचित्र हस्तलिखितांची प्रथा कोठे सुरू झाली.

३) एकमेकांना कागदावरील लहान लहान चित्रे काढून जोडणाऱ्या संग्राहास काय म्हटले जात होते?

४) मराठाकाळातील संगीतामधील 'ताल' या विषयावरील चित्र कोणत्या प्रकारात आढळते?

५) भित्तीचित्राचे प्रामुख्याने मुख्य विषय कोणते होते?

### ४.३.३ नगररचना, पाणी व्यवस्थापन व लाकूडकाम :

#### अ) नगररचना :

मराठाकाळातील नगरांवर भारतीय आणि इस्लामी परंपरांचा प्रभाव दिसून येतो. अर्थात मराठकाळातील काही नगरं ही अगोदरच्या गावांतून विकसित झाल्याने तशी अगदी आखीव-रेखीव अशी नगररचना दिसून येत नाही. गोदावरी-प्रवरासंगमावरील 'टोके' या गावाचा अभ्यास माटेंसारख्या विद्वानांनी केलेला आहे. असे दिसते की, उत्तरदक्षिण आणि पूर्व-पश्चिम जाणाऱ्या रस्त्यांनी या नगराचे विविध भाग झालेले होते. रस्त्यांच्या संगम बिंदूमध्ये एक सिद्धेश्वराचे मंदिर होते. येथील मुख्य रस्ते फरसबंद असत. गल्ल्यामध्ये उघडणाऱ्या जोडरस्त्यांमुळे चौक तयार होत असे. या चौकात धनिकांचे वाडे असत. पुणे येथे पूर्वी राजमाता जिजाऊंनी कारागीर-उद्योजकांची वसाहत (कसबा) निर्माण केली. निवासासाठी लालमहाल बांधला. पुढे साम्राज्याच्या विकासकाळात या कसब्याजवळ शनिवारवाड्याची निर्मिती झाली. या वाड्याच्या तिन्ही बाजूला पेशव्यांचे नातेवाईक, सरदार यांचे वाडे उभे राहिले. या शनिवारवाड्याच्या पलिकडे विविध पेठा वसविल्या गेल्या. साहूकारांसाठी ही पेठा वसविण्यात आल्या. या पेठा जातीनिहाय आणि व्यवसायनिहाय असत. म्हणजे विशिष्ठ जातीच्या किंवा व्यवसाय करणाऱ्या लोकांची वसाहत एका विशिष्ट पेठेत असे, जसे बोहरी व्यापाऱ्यांची 'रविवारपेठ' गोसाव्यांची 'सोमवारपेठ' या आठवड्यांच्या वारांवरून अथवा त्या पेठा वसविणाऱ्यांच्या

नावांवरून पडलेली आहेत. या पेठांमध्ये दुकानांसह धानाड्यांचे वाडेही दिसून येतात.

● **घरे :**

लोकांच्या निवासस्थानाचा विचार करता घरांचे पुढील प्रकार दिसून येतात. जसे, राजे-महाराजांचे महाल, तालेवारांचे धनाढ्यांचे वाडे, छोटे एकमजली / दुमजली घरे आणि सामान्यांच्या झोपड्या. थोडक्यात व्यक्तीच्या आर्थिक आणि सामाजिक प्रतिष्ठेनुसार हा फरक पडताना आपल्याला दिसतो. नगरामध्ये घरे कच्च्या व पक्क्या मातीच्या विटांची असत. प्रथम घडीव दगडाचे जोते उभारले जात. त्यानंतर खांबुळ्यांच्या लाकडी सांगाड्यावर घरे उभारलेली असत. फक्त जीने आणि दरवाजे यासाठी कमानीचा वापर केला जात असे.ही घरे कौलारू असत. काहीना दुसरामजला जो असे, तो तुळ्यांच्या बिछायतीवर चढवलेला असे. अशा घरांच्या भिंती चिखलाने लिपल्या जात व यांच्यावर चुन्याने गिलावा केला जाई. या भिंती जवळ जवळ तीन फूट जाड असून खिडक्या लहान ठेवत. यांचे छत बांबू घालून त्यावर कौल आंथरून तयार केले जात असे. सामान्यांच्या झोपड्या बांबूच्या सांगाड्यावर उभारलेल्या असत. यांच्या भिंती या कुडाच्या असून वर गवताचे छप्पर असे.

● **रस्ते :**

परंपरेनुसार नगरांमध्ये उत्तरदक्षिण आणि पूर्वपश्चिम जाणारे आणि एकमेकांना छेदून चौक तयार करणारे मुख्य रस्ते असावेत अशी अपेक्षा असे. प्राचीन काळातील अशा नियोजनबद्ध नगरांचा उल्लेख आणि पुरावे आपल्याला मिळतात. मात्र मराठाकाळातील नगरांमध्ये अशा रचनांचा अभाव जाणवतो. मुळात ही नगरे वर्षानूवर्षे विकसित होत गेल्याने दाटीवाटीची असत. तशी आजही दिसून येतात. त्यामुळे रस्त्यांचे नियोजन करणे कठीण होत असे. मात्र या काळातील एकंदर व्यापाराची मोठी उलाढाल पाहता रस्त्यांची आवश्यकता होती.

**ब) पाणी व्यवस्थापन :**

प्राचीन काळी साधारणत: नद्यांच्या काठी शेती प्रधान वसाहती निर्माण झालेल्या आहेत. मात्र निजामशाही-आदिलशाही काळात नगरं विविध उद्देशांसाठी स्थापन झाल्याने, प्रत्येक ठिकाणी नदी असेलच अशी परिस्थिती नव्हती. अशावेळी नगरं खोलगट भागात निर्माण होत असत. या नगरांबाहेरील उंचवट्यावर तळी, धरणं इ. च्या सोयी करून ते पाणी खाली नगरामध्ये आणले जाई. यासाठी पाणी पुरवठ्याची 'उतारावर आधारलेली' एक शास्त्रीय पद्धती त्यांनी अवलंबलेली होती. पुण्यामध्ये नानासाहेब पेशव्यांनी याच परंपरेवर पाणी पुरवठ्याची सोय केलेली दिसून येते.

इ.स. १७५५ मध्ये पुण्याजवळील कात्रज या ठिकाणी असलेल्या आंबील ओढ्यावर जलाशय तयार करण्यात आला. येथून मोठे नळ आणि जमिनीखाली बोगदे निर्माण करून शनिवारवाड्यामध्ये पाणी आणण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून सुमारे २९ लाख लिटर पाणी पुरवठा दररोज करण्यात येत असे. पेशव्यांचे अनुकरण इतर धनाढ्य आणि सरदार-दरकदारांनीही केलेले दिसून येते. सदाशिवाचा हौद, बाहुबलीचा हौद अशा विविध हौदातून सर्वसामान्यांना पाणीपुरवठा होत असे. पुण्यातील या व्यवस्थेचा प्रभाव हा इतर जहागीरदारांच्या जहागीरीच्या ठिकाणी दिसून येतो. पटवर्धनांच्या निरा या जहागीरमध्ये अशा स्वरूपाची रचना दिसून येते. संस्थान काळामध्ये

पटवर्धनांनी विविध वस्त्यांमध्ये हौद बांधून घेतले होते. या ठिकाणी शहरामधील काही जागामध्ये दोन हौद दिसून येतात. सवर्ण आणि शुद्र तसेच हिंदू आणि मुस्लिमांसाठी अशी रचना केलेली दिसून येते.

● **स्वतंत्र पाणी पुरवठा (तलाव, विहीरी, आड, बारव) :**

आपण नगरांतील पाणी पुरवठ्यांच्या सार्वजनिक व्यवस्थेचा विचार केला. या व्यतिरिक्तही इतरही स्वतंत्रअशी महत्त्वाची साधने आपल्याला दिसून येतात. यांना तलाव, विहिरी, बारव इ. विविध नावांनी आळखले जात असे. मराठशाही कालखंडामध्ये अशा प्रकारच्या पाण्याच्या सोयीसुविधा करणे पुण्यकर्म मानले जाई. मालोजी राजांनी शिखर शिंगणापूर येथे प्रचंड मोठा तलाव बांधला.

मराठा कालखंडामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदलेल्या दिसून येतात. या विहिरी बंदिस्त असून, यांना पायऱ्याची सोय नसे. त्यांचे तोंड मोठे असून बंदिस्त काठावर रहटांची सोय असे. रहाटांचा वापर करून पाणी काढले जात असे. बऱ्याच ठिकाणी रहाटाबरोबर मोटेचीही सोय असे. कागलजवळ अशा दहा मोटेची विहीरी आपल्याला दिसून येतात. विविध जहागीरदारांनी अशा प्रकारच्या विहिरी जहागिरीमध्ये बांधलेल्या दिसून येतात. धनाढ्यांच्या वाड्यामध्ये तोंड अरुंद असलेल्या विहिरी बांधलेल्या आढळतात. अशा विहिरींना आड असे म्हटले जात असे. दोरीवाटे घागर सोडण्याइतपतच यांचे तोंड दिसून येते.

बिनपायऱ्यांच्या विहिरीबरोबर, मराठाकाळात पायऱ्यांच्या विहिरी दिसून येतात. याचा वापर पिण्याच्या पाण्याबरोबरच इतर गरजांसाठी होत असे. अशा विहिरीमध्ये प्रवेश करण्यासाठी मोठी कमानही असे. काही ठिकाणी दुहेरी कमानींच्या विहिरी दिसून येतात. जसे मिरज येथील पटवर्धनाची, सांगलीकर बागेतील विहिर, याठिकाणी विहिरीच्या पाण्याच्या नियमित / किमान पातळीचा विचार करून पायऱ्या आणि कमान बांधलेली आहे. मात्र यावेळी, पावसाळ्यांत येथील पाण्याची पातळी वाढते. त्यावेळी वरील पायऱ्या आणि कमान पाण्याखाली जाते. अशावेळी या पूरपातळीचा विचार करून उंचावर आणखीन पायऱ्या आणि दुसऱ्या कमानीची सोय करण्यात आलेली आहे.

या विहीरीबरोबर मराठकाळात विविध बारव ही आपल्याला दिसून येत. बारव ही साधारणत: चौकोनी अथवा मोठ्या आकाराची विहीर असे. ही बंदिस्त विहिरी असून यांना पायऱ्यांची सोय केलेली असे. नाशिक, त्र्यंबकेश्वर, परळी वैजनाथ येथे अशा प्रकारचे बारव दिसून येतात.

काही मोजक्या नद्या वगळता, महाराष्ट्र हा बारमाही न वाहणाऱ्या नद्यांचा प्रदेश आहे. अशा महाराष्ट्रामध्ये 'जलदान' हे एक लोकोपयोगी कार्य आहे. हे कार्य अधिकाधिक व्हावे हे राज्यकर्त्यांबरोबर लोकांनाही वाटत असे. परंतु राज्याची तिजोरी तेवढी सक्षम असते, असे नाही. म्हणून अशा उपक्रमांना धर्माची जोड देऊन 'जलस्थापत्य' उभारणे हे पूर्णकर्म समजले जाई. त्यामुळे जहागीरदार व धनाढ्य वर्गाने मराठकालखंडामध्ये स्थापत्य उभारलेले दिसून येते. अशा स्थापत्यांची नियमित देखभाल करण्यात येत असे. तसेच यांचे पावित्र्य जपले जावे यासाठी देवदेवतांच्या मूर्तींचीही प्रतिष्ठापना यासाठी करण्यात येत होती.

**क) लाकूडकाम :**

प्राचीनकाळापासून भारतीयांना लाकूडकाम म्हणजे लाकडावर कोरीव काम करण्याचे कौशल्य प्राप्त होते. पर्शियन लोकांच्याकडून भारतीयांनी दगडावर कोरीव काम करण्याचे तंत्र शिकून घेतले. हे दगडावरील कोरीव काम देखील लाकडावरील कोरीव कामासारखे होते. महाराष्ट्रामध्ये सुद्धा विविध शैलीच्या विकासातून येथे लाकडी कोरीव कामाचा विकास झाला. लाकडाचा वापर व त्यावरील कोरीव नक्षीकामाची शैली, यावरून दोन प्रकारच्या परंपराचा महाराष्ट्रातील लाकडी कामावर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यात एक शैली गुजराती व दुसरी मोगल किंवा दिल्ली या नावाने ओळखली जाते. बारीक कामाने मढविलेल्या चौकटी, दरवाजे, स्तंभ व त्यावर पूर्ण कोरीव काम असलेले दिसते. हे गुजराती काष्ठ शिल्पांचे वैशिष्ट्य होय.

मराठाकाळामध्ये लाकडाच्या साहाय्याने बांधण्यात आलेल्या वाड्यांच्या बांधकामावर गुजराती व इस्लामिक तसेच स्थानिक काष्ठशैलीचा प्रभाव दिसून येतो. वाड्यामध्ये काष्ठशिल्प, खांब आणि तुळई ज्याठिकाणी, दरवाज्याची चौकट आणि भिंत जेथे मिळते त्याठिकाणी, खांब आणि छत ज्याठिकाणी एकत्र येतात त्याठिकाणी दिसून येते. यातील सुरुच्या झाडासारखे खांब आणि दोन 'सुरुंना' जोडणाऱ्या महीरपी कमानी ही विशेष उल्लेखनीय आहे.

वाड्यामधील स्तंभावर दोन शैलीचा प्रभाव दिसून येतो. त्यात गुजराती प्रकारातील स्तंभ चौकोनी आकाराचे, खालून मध्यापर्यंत जवळपास साधे असतात. मध्यापासून वरपर्यंत कोरीव नक्षीकामाने सजावट केलेले असत. अनेक पारंपारिक फुलां, पानांची कोरीव नक्षीकामे, वर चढत जाणारी वेलबुट्टी व त्याचा शेवट, पोपट, मोर, चंद्र, सूर्य विविध भौमितिक आकृत्यांनी हा भाग सजविलेला असे. यानंतर स्तंभाशीर्षाचा भाग येतो, यावर अतिशय सुंदर मोर व पोपट फारच कलाकुसरीचे काम करून कोरलेले आहेत.

'मुघल' किंवा 'दिल्ली शैली' प्रकारातील गोलाकार स्तंभ खालून फुगीर व वरती निमुळती असतात. यावर अनेक टोकदार पानाची रचना कोरलेली असते. वरीलबाजूस बारीक होत जाणारा स्तंभ शक्यतो साधा ठेवलेला असे. दिल्ली शैलीला 'सुरू' किंवा 'सायप्रस' या नावानेही ओळखले जाते. या स्तंभाच्या खालच्या भागात एखाद्या कुड्याची रचना तयार केलेली असते. यात दोन कमळे आतील बाजूंना झुकल्यासारखी दर्शविली जातात. या स्तंभाला आधारासाठीची दगडी तळखडे नक्षीदार कोरवी काम गुजराती व मोगली शैलीचे वाडे, श्रीगोंदा, नंदूरबार, नेवासे, नाशिक, कन्नड येथे पाहवयास मिळतात.

वाड्याचे बांधकामात त्याचे सौंदर्य खुलवताना उंच लाकडी नक्षी कमानीयुक्त कमानी दिसून येतात. दोन सुरुदार खांबास जोडणाऱ्या कमानी या नक्षीकाम केलेल्याअसतात. या कमानीची ज्या ठिकाणापासून सुरूवात होते, तो भाग कमानीचे दोन्ही पाखे, बिंदू व कडा हे कमानीचे विशेष सजावटीने कोरलेला असतो.

वाड्यामधील पहिल्या मजल्यावरील सदर पूर्ण लाकडी कलाकुसरीने सजवलेली असते. याठिकाणी कार्यालयीन कामकाज चालत असे. काही वाड्यांमध्ये या ठिकाणी नाचगाण्याचे तसेच समारंभाचे प्रसंग साजरे होत. या भागात सुरुच्या आकाराचे खांब व महिरपी कमानी असत. तसेच येथे छतावर फुलांचे सुंदर नक्षीकाम कोरलेले असे.

वाड्यामधील तुळ्यांच्या टोकाचा भाग अत्यंत सुबक व आकर्षक पद्धतीने कोरलेला असे. यावर कमलपुष्प,

कमलकलीका, पोपट, मोर, फुले व पाने यांचे कोरीव काम केलेले असे. तसेच वाड्याच्या चौकाच्या तिन्ही क्वचित चारही बाजूंनी खांबाच्या वरच्या छताचा पुढे आलेल्या लाकडी भागात नक्षीकाम केलेले असे, त्यास 'पानपट्टी नक्षी' असे म्हणत. याचबरोबर वाड्यांमधील खिडक्यांमध्ये लाकडाचाच उपयोग केला जात असे. या खिडक्यांच्या दरवाजावर कमळाचे नक्षीकाम केले जात असे.

वाड्याची शोभा वाढविण्यासाठी वाड्याच्या आतील बाजूस किंवा दर्शनी बाजूस कोपऱ्यास झुंबरे बसविले जात असे. एकात एक लाकडी रिंग ते अखंड एका लाकडात हे या झुंबराचे वैशिष्ट्य होय. हे लाकडी झुंबर उठावदार असून कोरीव कामाचा तो अति उत्कृष्ठ नमुना होय. सावरी (जि. लातूर) येथील वाड्याच्या दिवाणखान्यात सर्व आठ खांबाच्या समोर अशी झुंबरे बसविलेली आहेत.

याच बरोबर मराठी कालखंडामध्ये शेती कामासाठी लाकडी हत्यारे बनविली जात. यामध्ये नांगर, कोळपण, बैलगाडी, लाकडापासून स्थानिक सुतार बनवित होते. तसेच सावंतवाडी संस्थानामध्ये लाकडापासून विविध प्रकारची खेळणी, पाट, चौरंग, गंजिफा बनविण्यात येत असे.

**● स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) पुण्यामधील ........... घाटात इ.स. १७५५ मध्ये तलाव बांधला.

अ) आंबा ब) खंबाटकी क) आंबोली ड) कात्रज

२) मालोजीराजांनी ........... येथे तलाव बांधला.

अ) पुणे ब) इंदापूर क) शिखर शिंगणापूर ड) कोल्हापूर.

३) पटवर्धनांनी ............. या जहांगिरीमध्ये हौद बांधले.

अ) कोल्हापूर ब) इचलकरंजी क) निरा ड) मुधोळ

४) बिनपायऱ्याच्या विहिरीला ............. म्हणतात.

अ) आड ब) कुंड क) बारव ड) तीर्थ

५) जलस्थापत्याला .............. जोड दिली गेली.

अ) धर्माची ब) राजाची क) लोकांची ड) यापैकी नाही.

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) भारतीय लोकांनी कोणाकडून दगडावरील कोरीवकाम आत्मसात केले?

२) महाराष्ट्रातील लाकडी कोरीवकामावर कोणत्या शैलीचा प्रभाव होता?

३) चौकोनी आकाराचे लाकडी स्तंभ कोणत्या शैलीचे वैशिष्ट्य होय?

४) कात्रज येथील तलाव कोणत्या ओढ्यावर बांधला ?

५) माटे यांनी कोणत्या गावच्या नगररचेना अभ्यास केला?

### ४.२.४ पेहराव, आहार, व अलंकार :

**अ) पेहराव :**

भारतीय ऐतिहासिक पेहराव हा साऱ्यांनाच आकर्षित करणारा होता. कारण या पेहरावात त्या त्या काळाची सर्व वैशिष्ट्ये सामावलेली होती. रेशमी कपड्यांवर जरतारी-मीनाकारी करण्याच्या कामात आपल्याकडील कारागीर सुरुवातीपासूनच तरबेज होते. अगदी सुरुवातीच्या काळात पांढरे वस्त्रे वापरण्याकडेच लोकांचा सर्वसाधारण कल होता. परंतू नंतरच्या काळात सूती आणि रेशमी वस्त्रे रंगविली जाऊ लागली.

भारतामध्ये जसजसी आक्रमणे होत होती, तसतसा इथल्या पेहरावात बदल होत होता. परंतू भारतीय पेहरावावर सर्वात मोठा प्रभाव पडला तो मोगलांचा. कारण मोगल राजे विविध कलांचे, दागदागिन्यांचे आणि भरजरी पोशाखांचे चाहते होते.मोगलांच्या या शौकीन वृत्तीमुळे भारतीय पेहरावात आमूलाग्र बदल झाला. मोगलांच्या शैलीचा प्रभाव मराठ्यांच्या राजवटीतही कायम राहिला. अगदी सुरुवातीच्या काळापासून भारतावर आक्रमण होत आली, तरी या स्वाऱ्यांचा थेट परिणाम दक्षिण भारतावर फारसा झाला नाही. त्यामुळे महाराष्ट्र किंवा अगदी दक्षिणेकडच्या परिसरावर आक्रमणांच्या संस्कृतीचा प्रभाव पडला नाही. परंतू पंधराव्या शतकात मुस्लिम राजवटी दक्षिणेत स्थिरावल्या आणि त्यांचा कळत-नकळत प्रभाव मराठी सरदार-मनसबदारांवर पडायला लागला. नंतरच्या काळात मराठेशाहीचा जो पेहरावा अस्तित्वात आला, त्यावर या मुस्लिम पेहरावाचा खूप मोठा प्रभाव होता.

मोगलांच्या आक्रमणानंतर 'अंगरखा' व 'तुमान' हा प्रतिनिधीक पेहराव बनला. या अंगरख्याची शिवण मोठी वैशिष्ट्यपूर्व असायची. कमरेपर्यंत हा अंगरखा अंगालगत शिवून खाली तो घेरदार असायचा. हा अंगरखा दोन भागात शिवला जायचा. दोन्ही भाग वेगवेगळे शिवून नंतर तो एकत्र शिवला जात असे. या अंगरख्याचा घोळ साधारण २७ हात लांब व नऊ ठिकाणी जोडलेला असायचा. हा सत्तावीस हात लांब असलेला घोळ चुण्या घालून कमरेजवळ एका वारात बसवला जायचा. कमेराला घोळ जिथे बसविला जायचा, तिथे आताच्या बेल्टसारखा एक पट्टा लावलेला असायचा. त्याकाळी अंगरख्याचे विविध प्रकार राजे लोकांपासून सर्वसामान्यांपर्यंत अनेकजण वापरत. अर्थात, त्यांची नांवे वेगवेगळी होती. त्याकाळात अंगात घालायच्या कपड्याचे झगा, अंगरखा, डगला, कुडता, अंगडे असे अनेक प्रकार होते. झगा हा साधारणपणे अंगरखा व डगल्यापेक्षा मोठा असायचा, तर कुडता हा अंगड्यापेक्षा लहान असायचा. साधारणपणे अंगरखा, डगला किंवा झगा दरबारात वापरला जाई. तर कुडता हा घरातल्या घरता वापरला जायचा.

छ. शिवाजीराजांपासून ते संभाजी-राजाराम महाराज यांच्या काळातील वेशभूषा खूप कलात्मकता आढळत नाही. याउलट संभाजीपूत्र शाहूपासून मराठ्यांची वेशभूषा कलात्मक आढळून येते. कारण या काळात स्वराज्याची घडी स्थिरस्थावर झाली होती. या काळात राजघराण्यांचे व सरदार-मनसबदार

यांच्यासारख्या घरातील कपडे हे मुख्यत: रेशीम, मलमल अशा अतिशय उच्च दर्जाच्या कापडापासून शिवले जात होते. कपड्यांना लागणारे रेशीम थेट अफगाणिस्तान, ढाक्का येथून मागवली जायचे.

मराठेशाहीत हिंदू-मुस्लिम संस्कृतीतून निर्माण झालेले अनेक वस्त्र प्रकार पाहायला मिळतात. त्यांचे वर्णनही तत्कालीन पुस्तकांतून आलेली आहेत. उदा. ताफ्ता, चायनाताफ्ता, महमूदी, पाटव, मलमल, कद, किनखाप, खलायत असे वस्त्र प्रकार वापरले जात असल्याचे उल्लेख सापडतात. यातले अनेक प्रकार प्रथम उत्तरेत प्रसिद्ध पावले आणि मग दक्षिणेकडे रुढ झाले.

महाराष्ट्राला प्रथम उत्तरेतल्या पेहरावाची ओळख बाजीरावाच्या काळात नर्मदा ओलांडून गेल्यावर शिंदे, होळकर, पवार या सरदारांनी करून दिली. दिल्लीवर नजर ठेवण्यासाठी या सरदारांनी नर्मदेच्या पलिकडे आपले बस्तान बसवल्यावर तिथल्या पेहरावाची, शौकीन संस्कृतीची चांगली ओळख झाली. ही संस्कृती महाराष्ट्रामध्ये पोहचवली. कालांतराने अशा कपड्यांची मागणी शाहू आणि पेशवे यांच्याकडून सुरू झाली. या संदर्भातल्या काही जुन्या नोंदी आढळतात. यामध्ये उत्तरेकडील सरदारांकडून ४००० छिटे मुलतानी जोड्या, ७५०० महमुद्या साध्या, १०० चिराकदानी बुटेदार, ७५ अमदाबादी पटके, ५० बुट्टेदार हमरु, १०० गजचाअसे अनेक कापडाचे प्रकार मराठ्यांनी उत्तरेकडील सरदारांकडून मागवल्याचे उल्लेख आहेत.

मराठेशाहीमध्ये कपड्यांबरोबर विविध डोक्यावर घालण्यात येणाऱ्या पगड्या आढळतात. छ. शिवाजी महाराजांचा जिरेटोप हा खास वेगळेपणा दर्शविणारा होता. वास्तविक रजपूत राजांच्या पगड्यांवर मोगली किमॉशचा प्रभाव होता. पण शिवरायांचा जिरेटोप किमॉशच्या प्रभावापासून मुक्त होता. शिवरायांचा हा जिरेटोप राजाराम महाराज व थोरल्या शाहूंपर्यंत वापरला गेला. त्यानंतरच्या मराठा राजांनी मात्र आवर्जून विशिष्ठ पद्धतीची पगडी वापरल्याचे दिसते. यामध्ये मंदिल, मुंडासं, फेटा अशी अनेक प्रकारची शिरोभूषणं घातली जायची. यातील पगड्यांचे आकार सारखे असले तरी दरबारातील मानानुसार त्यात फरक असायचा.

मराठे सरदारांनी व राजे मंडळींनी पेहरावात मुस्लिम राजवटीचं अनुकरण केलं, तरी मराठा स्त्रियांचा मुख्य पोशाख मात्र साडी हाच राहिला. त्यांनी मुस्लिम स्त्रियांप्रमाणे कुडता-अंगरखा व पायजामा हा पोशाख स्वीकारला नाही. उलट त्यांनी रोजच्या कुठल्याही प्रसंगात सहज वापरता येईल अशी दुटांगी नऊवारी साडीच कायम ठेवली. कारण घरंदाज स्त्रिया घोड्यावर बसायचं असो किंवा सर्वसामान्य स्त्रीला रानात-शेतात काम करायचं असो, नऊवारी साडी त्यांना सोयीचे वाटे.

मराठा स्त्रियांनी लुगडी हा आपला पोशाख कायम ठेवताना मुस्लिम कलाकुसर मनापासून स्वीकारली ही कलाकुसर लुगड्याच्या काठापदरापासून चोळीच्या बाह्यांपर्यंत होती.

मराठी आमदनी नागपूरी, सोलापूरी, इंदूरी, महेश्वरी, चंदेरी, बनारसी, इरकर, बऱ्हाणपूरी अशा अनेक प्रकारच्या साड्या होत्या. सर्व मराठी स्त्रिया हीच लुगडी नेसायच्या, मात्र रोजच्या नेसण्यातल्या साड्या अतिशय साध्या आणि सुती कापडाच्या असायच्या. समारंभाप्रसंगी बारीक कलाकुसर केलेल्या रेशीम साड्या वापरल्या जात होत्या. मराठाकाळात औरंगाबादची पैठणी हाच सगळ्यात लोकप्रिय प्रकार होता.

पैठणची पैठणी महिलांमध्ये लोकप्रिय होती. कारण पैठणीवर अतिशय पारंपारिक कलाकुसर केली जात असे. भरजरी नक्षीदार पदर व उठावदार काठ ही पैठणीची खास वैशिष्ट्यं आहेत. पैठणीच्या पदरावर असावली, बांगडीमोर, शिकारखाना, हुमा-परिंदा अशा प्रकारची नक्षी काढली जाते. या नक्षीकामावरून पैठण्यांना तशी नावे पडलीत. यापैकी असावली पैठणी महिलांमध्ये अधिक लोकप्रिय होती. या पैठणीवर असावलीच्या फुलांचं सुंदर नक्षीकाम सोन्याच्या तारेने केलेलं असायचं.

**ब) आहार :**

शिवशाही काळापेक्षा पेशव्यांच्या काळामधील आहाराची माहिती विविध कागदपत्रामध्ये आढळते. पेशवेकाळामध्ये स्त्रियांच्या व्रतांच्या वेळी भोजनाची रेलचेल असे. मंगळागौरीच्या व्रताच्या वेळी १६ भाज्या, १६ कोशिंबीरी, निरनिराळ्या आमट्या केल्या जात होत्या.

सवाई माधवराव पेशव्यांच्या लग्नाच्या वेळी विविध प्रकारचे भोजन बनविण्यात आले होते. यामध्ये भात दोन प्रकारचे, तुरीचे वरण व सांबार दोन प्रकारचे, आमटी दोन प्रकारची, लोणची दहा प्रकारची, चिरूण व साखरेचे लोणचे, कठीसार दोन प्रकारची, भाज्या सहा प्रकारच्या त्यामध्ये एक-दोन प्रकारची तोंदली, पडवळ वगैरे दररोज खिरी दोन प्रकारच्या पूरणपोळ्या सपीटाच्या, पक्कान्ने, घीवर फेण्या वगैरे साधे वडे व वाटलेल्या डाळीचे कढीवडे, तूप साजूक फार चांगले व मध्यम मठ्ठा, श्रीखंड, आमरस, खिचडी यापैकी दररोज एक प्रकार बनविण्यात येत. पापड, सांडगे, फेण्या, तिळवडे, मीरगोंडे व वीस प्रकाराची कोशिंबीर बनविण्यात येत होते.

पेशवेकाळात अनेक प्रसंगी ब्राह्मण भोजनेही घातली जात होती. बऱ्याच वेळा सहस्त्रभोजने होत. कधीकधी भोजनसत्रच वर्षभर चालत असे. यावेळी विविध प्रकारची पंचपक्वाने करण्यात येत होती. याशिवाय सणांच्या वेळी प्रथेनुसार शाकाहारी किंवा मांसाहारी भोजन बनविण्यात येत होते. यामध्ये दसरा या सणाच्यावेळी बकऱ्याचा किंवा मेंढ्याचा बळी देऊन मांसाहारी जेवण बनविले जात होते.

इ.स. १८०३ च्या सुमारास पुण्याच्या रेसिडेंट दरबारी क्लोज याने एका मेजवाणीचा वृत्तांत लिहून ठेवलेला आहे. त्याला व त्याला भेटण्यास आलेल्या लॉर्ड व्हॅलेरिया याला दुसऱ्या बाजीरावाने भोजनास बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांना ब्राह्मणी पद्धतीचे जेवण वाढण्यात आले होते. त्यात भात, पापड, करंजी इ. प्रकार होते तर एका ओळीमध्ये विविध रंगारंगाचे पक्वान्न होती व दुसऱ्या ओळीमध्ये सात प्रकारच्या चटण्या, कोशिंबीरी होत्या. पानाच्या एका अंगाला खीर, तूप, दुसरे पातळ पदार्थ होते.

एकंदरीत पेशवेकाळामध्ये सण समारंभाच्या वेळी आहारामध्ये विविध प्रकारचे पदार्थ होते.

**क) अलंकार :**

भारतीय संस्कृतीत अलंकार परिधानाला अनन्य साधारण महत्त्व आहे. मराठाशाही कालखंडामध्ये राजकीय स्थैर्य प्राप्त झाल्यावर विविध कलागुणांना प्रोत्साहन मिळाले. यामध्ये निरनिराळ्या अलंकारांची निर्मिती झाली. छत्रपती शाहू, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व नानासाहेब यांच्या कारकिर्दीत नवे दागिने रूढ

झाले. माधवराव, रघुनाथराव, नारायणराव, आनंदीबाई, दुसरा बाजीराव यांच्यावेळी स्त्री पुरुषांनी व मुलांमुलींनी अंगावर घालावयाच्या अलंकारांची समृद्धी अधिक झाली.

कलगीतुरा, शिरपेच ही शिरोभूषणे, भिकबाळी, चौकडा ही कर्णभूषणे गोफ, कंठा अशा प्रकारचे गळ्यातील अलंकार मोठमोठे पुरुष प्रधान करीत असत. दागिन्यांच्या बाबतीत नानासाहेब पेशवे मोठे रसिक व हौसी होते. त्यांनी आपले पूत्र विश्वासराव यांच्याकरीता सोन्याचा गोफ करून पाठविण्याविषयी अंताजी नारायण यास पत्र लिहिले होते. मराठा कालखंडामध्ये स्त्री-पुरुष आपापल्या परिस्थितीनुसार दागिने वापरत होते. गरीब लोक कमरेला करदोरा बांधित असत. हिंदू धर्मात पुरुषांनी कमरेला करदोरा बांधणे क्रमप्राप्त होते. म्हणून श्रीमंत लोक त्याजागी सोन्याचा गोफ वापरीत. एक प्रकारे तो सोन्याचा करदरोराच असे.

मराठाकालीन स्त्रियांच्या दागिन्यांची माहिती ज्याप्रमाणे तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्रावरून मिळते. त्याचप्रमाणे तत्कालीन लावणी वाङ्मयातूनही अलंकारांची माहिती मिळते. अलंकाराचे, विशेषत: स्त्रियांच्या अलंकाराचे, शृंगारातील स्थान म्हणजे स्त्री देहाचे सौंदर्य खुलविणे आणि त्यातून त्या स्त्रियांच्या विशिष्ट सामाजिक स्थितीचा अंदाज दर्शविणे हेही ओघाने आलेच.या काळात शुद्ध सोन्यापेक्षा मोती, हिरे, पाचू, माणके यांचे अलंकार वापरणे हे प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात असे. मराठाकाळात दागिण्यांचे विविध प्रकार आढळून येतात. उदा. चिंचपेटी, वज्रटीक, लफफा, चंद्रहार, पुतळ्यांची माळ, जवे, तोडे, बाजुबंद, कमरपट्टा, नथ, झुबके, पाटल्या, मस्तकाभरणे, अंबाड्यात खोवण्याचा आकडा, बिजवरा, जोडवी, मासोळ्या, मोहनमाळ, बोरमाळ, पैंजन अशाप्रकारे जवळपास ३२ प्रकारचे दागिने त्याकाळात वापरीत असत.

सगनभाऊच्या एका लावणीत त्याचा ओझरता उल्लेख येतो तो असा -

बिंदा, सिसफूल गळ्यामध्ये रत्ने
नयनी बुलाख सुढाळ वदने
गळ्यात चिंचपेट्या मनगट्या मणि
कुसुंबी जरी पिस वाजेल जरित कंठि
रुणझुण पारि पोल्हारे जोडवे बोटी
वरकड दागिन्यांची घेतली पेटी
बत्तीस आभरणे अवचळ द्रव्य गणि'

यावरून स्त्रियांच्या अलंकाराचे बत्तीस प्रकार होते हे स्पष्ट दिसते.

या बत्तीस अलंकारात शरीराच्या सप्तभागवर जे अलंकार वापरीत ते असे -

**मस्तका भरणे :** श्रीमंत घराण्यातील स्त्रिया केसांच्या अंबाड्यात सीसफूल, खोचून बसविता येईल अशी सोन्याची वेणी घालत.

**हस्तालंकार :** हातातील अलंकारात वाकी, जपे, दाळेबंद, पाटल्या, बांगड्या, बाजूबंद इ. प्रकारचे

दागिने वापरीत असत.

**गळा भरणे :** यात चिंचपेटी, वज्रटीक, पुतळ्यांची माळ, मोहनमाळ, बोरमाळ, साज, तन्मनी इ. प्रकारचे अलंकार वापरीत असत.

**नासिका भरणे :** नाकात घालावयाच्या नथीचे विविध प्रकार त्याकाळात उपलब्ध होते.

**कमरेचे अलंकार :** त्याकाळात सोन्याचे कमरपट्टे स्त्रिया वापरीत असत. किंवा साखळ्याही वापरीत. पायात घालावयाच्या अलंकारात पैंजण, जोडवी, मासोळ्या, तोडे इ. प्रकार स्त्रिया वापरत होत्या.

अशा प्रकारची विविध दागिने पेशवे, सरदार तसेच श्रीमंत वर्गातील स्त्रिया वापरत होत्या. परंतू सामान्य स्त्रियांच्या बाबतीत जेवढे सौभाग्य अलंकार आहेत तेवढेच वापरात दिसत. यामध्ये मंगळसूत्र, नथ, कानातील फूले, बांगड्या, पैंजण व जोडवी दागिने वापरत होत्या. बांगड्यात काचेच्या बांगड्यांना अग्रक्रम असे. त्यालाच सौभाग्याचा चुडा म्हणत असत.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – ४**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) मराठा काळातील वस्त्रावर ................ यांचा प्रभाव दिसतो.

अ) मुस्लिमशैली ब) पर्शियन क) रजपूत ड) गुजराती

२) वस्त्रांना लागणारे मलमल कापड ............ या ठिकाणाहून येत असे.

अ) गुजरात ब) कोकण क) अफगाणिस्तान ड) दिल्ली

३) छ. शिवाजी महाराज ............. टोप वापरीत होते.

अ) जिरे ब) पगडी क) पुणेरी ड) शिंदे

४) ............ हा व्रताच्यावेळी १६ प्रकारच्या भाज्या करीत.

अ) मंगळागौरी ब) सोमवतीव्रत क) श्रावणी ड) पिठोरी व्रत

५) ............. हा हातामध्ये घालण्याचा अलंकार आहे.

अ) नथ ब) व्रजटिक क) पाटल्या ड) जोडवी

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) पैठण हे ठिकाण कोठे आहे.

२) महिलांमध्ये पैठण साडी प्रकारामधील कोणता प्रकार लोकप्रिय होता ?

३) पेशवा दुसरा बाजीरावाने कोणत्या ब्रिटिश अधिकाऱ्याला जेवणाचे आमंत्रण दिले?

४) पुरुष कमरेला कोणते अलंकार वापरीत होते ?

५) मासोळ्या हा अलंकार स्त्रिया कोठे घालत होत्या ?

**४.४ सारांश :**

एकंदरीत मराठाकालीन कला, स्थापत्य आणि वास्तू यामध्ये विविधता आढळून येते. मराठी साम्राज्याचा जसजसा विस्तार होत गेला तसा त्याचा प्रभाव येथील सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर पडलेला दिसून येतो. मराठा कालखंडामध्ये युद्धकला पद्धतीमध्ये बदल होत गेल्यावर येथील किल्ल्यांच्या वास्तू रचनेमध्ये सुद्धा बदल झालेला दिसतो. किल्ल्यांवरील वास्तूमध्ये प्रकाशनाच्या व संरक्षणाच्या गरजेनुसार विविध वास्तूशिल्पांची निर्मिती केलेली आढळते. तसेच मराठा कालखंडामध्ये राज्यविस्तार झाल्यावर इतर भागात सहसंबंध प्रस्तापित झाल्यावर त्याचा प्रभाव येथील चित्रकलेवर झाला. यातून विविध चित्रशैली निर्माण झालेल्या आढळतात.

मराठाकाळातील नगरांवर भारतीय आणि इस्लामी परंपरांचा प्रभाव दिसून येतो. या प्रभावातून नगरांची व येथील घरांची निर्मिती झालेली आढळून येते. तसेच या नगरांना पाणी पुरवठा करण्यासाठी येथील राज्यव्यवस्थेने हौद व तलावांची निर्मिती करून लोकउपयोगी कामे केलेली आढळतात.

मराठकाळातील पेहराव, आहार व अलंकारांवर सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा प्रभाव दिसतो. तत्कालीन आर्थिक परिस्थितीनुसार अलंकार व पेहरावांची निर्मिती झालेली आढळते.

**४.५ पारिभाषिक शब्द :**

जोडवी : हिंदू स्त्रियांचा सौभाग्य अलंकार होय.

तोडे : पायात घालण्याचे अलंकार

मुंडासा : डोक्यावर गुंडाळणचा फेटा

**४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-**

● **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - १**

**अ)** १) - ब) नळदूर्ग　　२) - ब) बाल्लेकिल्ला　　३) - क) वाठार

४) - जाधववाडी,　　५) - क) सातारा

**ब)** १) रंगमहल

२) किल्ल्याच्या पठारावील सुळक्यासारख्या भागांना माची असे म्हटले जाते.

३) पन्हाळा

४) पुणे.

५) वाई

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

**अ)** १) – ब) पटचित्र  २) – अ) अनूपराव  ३) – क) गुलाबी

४) – ड) सोमेश्वर  ५) – क) योगीनी

**ब)** १) पेशवेकाळामध्ये जेम्स वेल्स, डॅनियल या युरोपियन चित्रकारांना निमंत्रित केले होते.

२) गुजरात जैन मठ

३) चित्रसंग्रह

४) चित्रसंग्रह

५) पौराणिक

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ३**

**अ)** १) – ड) कात्रज  २) – क) शिखर शिंगणापूर  ३) – क) निरा

४) – अ) आड  ५) – अ) धर्माची

**ब)** १) पर्शियन

२) गुजरात व मुघल

३) गुजरात

४) आंबील

५) टोके

- **स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ४**

**अ)** १) – अ) मुस्लिमशैली  २) – क) अफगाणिस्तान  ३) – अ) जिरे

४) – अ) मंगळागौरी  ५) – क) पाटल्या

**ब)** १) औरंगाबाद

२) असावली

३) बारी क्लोज व लॉर्ड व्हेलेटिया

४) करदोरा

५) पायातील बोटात

**४.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) किल्ल्यांच्या अनुषंगाने मराठकालीन स्थापत्याची माहिती द्या.

२) मराठाकालीन अलंकाराची माहिती द्या.

३) मराठाकालीन पेहरावाची माहिती द्या.

४) मराठाकालीन भित्तीचित्राची वैशिष्टे सांगा.

**ब) टीपा :**

१) मराठाकालीन गढी

२) मराठाकालीन अलंकार

३) मराठाकालीन पाणी पुरवठा

४) मराठाकालीन चित्रकला.

**४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**


१) भावे वा. कृ, पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन.

२) डॉ. शुभांगना अत्रे, कल्पना रायरीकर, महाराष्ट्र संस्कृती, १८१८ पर्यंत, डायमंड प्रकाशन, पुणे.

३) अ. रा. कुलकर्णी आणि ग. ह. खरे, मराठ्यांचा इतिहास भाग २, काँटीनेंटल प्रकाशन, पुणे.

४) म. श्री. माटे, मराठा वास्तूशिल्प, कॉटीनेंटल प्रकाशन, पुणे.

५) ग. का. माने, शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास, शिवनेरी प्रकाशन.

६) डॉ. निरंजन कुलकर्णी (लेख) कला आणि स्थापत्य, मराठ्यांचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

७) डॉ. दीपा दिनेश साबळे, मराठेकालीन दागदागिने आणि अलंकार, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

८) डॉ. म. वि. सोवनी, आपले मराठी अलंकार, भारद्वाज प्रकाशन, पुणे.

९) डॉ. म. श्री. माटे व डॉ. कमल कृष्णराव चव्हाण, मध्ययुगीन कलाभारती (इ.स. ११.०० ते इ.स. १८५०) कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.


❑❑❑